साहामाही ,, ३ ,, ८८
सालअखेर ,, ७ ,, १८८
किरकोळ अंकास ..................... 8

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......०।

Annum in arrears] 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy..................................4as

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII AKOLA MONDAY 6 FEBRUARY 1893 NO. 6

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख ६ माहे फेब्रुवारि सन १८९३ अंक ६

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरीक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उवड्या हवेंत राहणे, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गुण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें तावडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अन्यत्र तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्र शय यांची आग होणें लघवी पांढरि होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरीक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टॉनिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे. हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते म्हणतात कीं, ह्याच्या प्रत्येक मात्रानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारें टॉनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्माच्या योगें शरिरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जेंवर ज्ञानतंतूची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोंपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळेंत F. Moor Clements ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधगिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक' नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कँप आणि को, ट्रेचर आणिको मुंबै, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकानें.

F. M. Clements, Inventor Sydeny, Australia.

## बक्षीस. ( रु० ५० )

खालीं सही करणार याजकडून सर्वत्रांस जाहिर करण्यांत येतें कीं, माझे दुकानदारीच्या वह्या संमत १९४३।१९४४ या दोन सालच्या वह्या पांच त्यांत कीर्द, २ खतावण्या २, व संमत १९४१ ची हिशोब वही १, असे पांच वह्या. आणि सोन्या वा॥ रावो महार, जानक्या वा॥ रामा महार, हासम वा॥ शामहमंद यांचे हुकुमनाम्याची नकल व रामजी वा॥ वाहदन तेली व सिताराम वा॥ रूपचंद पाटील यांचे हुकुमनाम्याची नकल व याशिवाय दस्तऐवज वगैरे चोरीस गेले आहेत तर सदर्हू कागज जो कोणी आम्हास आणुन देईल अगर याचा पत्ता सांगेल त्यास आम्ही ५० रुपये इनाम देऊं म्हणून दिल्हा तारीख २६।१।९३ इ०

( सहीं )

हिऱ्या वलद चांगो माहार
पिंपळगांव काळे
दस्तुर खुद.

### नोटीस

रा. रा. बिजाराम व ओंकार रहाणार मंगळवारा शहर अकोलें यांस मन्नाबाई मर्द हन्नुसिंग यांचे तर्फे मुख्त्यार किसनसिंग घाशीराम रजपूत रहाणार हिंगणे तालुके अकोलें यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी उभयतां ज्या घरांत रहातां आहां त्या कोठड्या २ मयत भवानसिंग जमादार यांच्या घरापैकीं आहेत. आह्मी जमादार यांचे सर्व घर खरेदी घेतलें आहे. ही गोष्ट तुह्मास माहित आहे. याजकरितां तुह्मांस असें कळविलें जातें कीं सदर्हू दोन्ही कोठड्यांचें भांडे प्रत्येकीं दरमहा १ रु. प्रमाणें रु.२ या दरानें तुह्मां उभयतांकडे मिळून भाड्याचे रुपये येणें ६ सहा हे रुपये तुह्मी हा नोटीस पावल्या पासून ३ दिवसांचे आंत भाड्याचे रुपये सदरील लिहिल्या प्रमाणें आणून देऊन पावती घ्यावी. व सदर्हू जागा आमची आह्मांस खाली करून द्यावी. असें केलें नाहींतर रुपये वसूल करण्या करितां व कोठड्या खाली करून देण्या करितां रीतीं प्रमाणें काम चालवून अखेर निकाल होई पर्यंत या नोटिशींचे खर्चा सुद्धां सर्व नुकसान भरून घेतलें जाईल. कळावे तारीख ३० माहे जानेवारी सन १८९३ इ०

( सही )

सहीची निशाणी किसनसिंग वाशीराम कुलमुखत्यार तर्फे मन्नाबाई मर्द हनुसिंग यांचे हातची असे.

### नोटीस

राजश्री रामजी टिकमजी भाटीये दुकान मलकापूर यांसी खाली सही करणार याजकडून नोटिसीने कळविण्यांत येतेंकीं तुमचेकडेस आमचे खातेबाकीवरून रुपये मुद्दल २२९ अक्षरी दोनसे पंचवीस येणे आहेत या शिवाय तुह्मी कापूस खंडी २०१ दर ३०। सवातीस रुपये खंडी प्रमाणें साल्मजकूरचे कार्तीक शुद्ध १ रोजीं आह्मास दिला त्याचा करार कार्तिक शुद्ध १५ पासून ते मार्गशीर्ष शु॥ १ पावेतो सर्व कापूस मोजून द्यावा असा होता त्या पैकीं तुह्मी कापूस खंडी ८२॥।०१०५ आह्मास मोजून दिला बाकी कापूस खंडी ११८०३०७ तुमचे कडेस येणे राहिला आहे तो तुह्मास मोजून देण्या विशई फार तगादा केला असतां तुह्मी मोजून देत नाहीं त्याच प्रमाणे आमचा अडतिया गुरू मूलराय सखानंद याजला कापूस खंडी १०० शंभर दर ३१ प्रमाणे विकला तो हीं अद्यापी तुम्ही मोजून दिला नाहीं करिता ह्या नोटिसीने तुम्हास कळविण्यात येते कीं तुम्ही वरील प्रमाणे आमचे मुद्दल रुपये व्याजा सुद्धा आणि राहिलेला कापूस नोटीस पावल्या नंतर आठ दिवसाचे आत. त्याच प्रमाणे आमचे आडतिये याचा कापूस वरील प्रमाणे द्यावे या प्रमाणे न केल्यास तुमचेवर दिवाणी कोर्टीत दावा करून आमचे खातेबाकीचे रुपये आणि कपासीचे नफ्या बद्दलचे रुपया सुद्धा व ह्या नोटिसीचे खर्चा सुद्धा रुपये भरून घेण्याची तजवीज केली जाईल. कळावे तारीख २८।१।९३ इ०

( सही )

श्रीराम शंकरलाल दुकान
मलकापूर दस्तुर गोविंद
पंढरीनाथ

### नोटीस.

दतु अवचार राहाणार दसाळे नजीक उंद्री तालुके चिखली जिल्हा बुलढाणा यास नोटीस देणार गुंजी मर्द दतु अवचार राहणार कोळासे तालुके बाळापुर इजकडून नोटीस देण्यात येतें कीं तु माझा लग्नाचा नवरा असोन तुझे माझे लग्न जाल्यावर दोन वेळ घरी नेले त्या नंतर माझे बापाचे घरी पोहचून दिले त्यास सुमारे १०।१२ वर्षे जालीं असोन अद्याप पर्यंत नेत नाहीं मी तुजला दोन तीन वेळ पत्र पाठविले, व मनुष्य पाठविले, नाईलाज होऊन मी स्वताः आठ दिवस जाले तुझे गावी आली असतां तु माझी भेट न घेता निघुन गेलास व छगणाजी सवडतकार याज कडून देखील तुजला दोन गोष्टी सांगितल्या असतां त्याचे ही ऐकिले नाहीं सबब या नोटिशीने कळण्यात येते कीं मी माझे बापाचे घरी राहुन निरवाह केला त्याचे १०।१२ वर्षांचे अन्नवस्त्राचे पैसे ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आत त्याजला द्यावे व मजला घेऊन जाऊन रिती प्रमाणें नांदवावे तसें न केल्यास फारकती द्यावी व माझे बापाचे पैसे त्याजला द्यावे तुझे कडून जबाब न आल्यास ही तुझी फारकती आहे असें समजून मी दुसरा घरठाव करीन व पैशा बद्दल रिती प्रमाणें दावा होईल कळावे.

( सही )

सहीची निशानी बांगडी गुंजी मर्द
दतु अवचार राहणार कोळासे
ता० बाळापूर इच्या
हातची असे.

दृष्टं किमपि जगत्यस्मिन्
निर्दोषं निर्गुणं हिवा॥

( ५ व्या अंकावरून पुढें चालूं. )

हजारो लोक उदरपोषणाच्या पाठीमागे लागले आहेत. कोणत्यानां कोणत्या तरी उपायानें ते आपल्या पोटाची व्यवस्था लावीत

आहेत. परंतु या पोटाच्या खटपटींत कोणी पापमार्गांचें सेवन केलें नाहीं, धर्मबंध व नीतिबंध हा तोडला नाहीं, मायापाशांत व स्वार्थसंपादनांत गुंग होऊन गेल्यामुळें अश्लोक कर्मे कोणाच्या हातून झालीं नाहींत? असा मनुष्यच विरळा. परंतु तारुण्याच्या मानें मुसमुसलेले, सुलभ कोपी, असे जे लोक आहेत त्यांना या गोष्टींचें कांहींच वाटत नाहीं. त्यांना ह्या गोष्टी ह्मणजे भूषणमयच वाटतात. या नित्य व्यवहारांतल्याच अशी त्यांची समजूत असते. आपण स्वतां ह्या गोष्टी करतो, लोक करतांना आपण पहातो व ऐकतों तरी आह्मी आंधळे ते आंधळेच. व अनुभविक जे लोक आहेत त्यांचा सदुपदेश न ऐकतां, किंवा ऐकल्यास त्याकडे कानाडोळा करतां, आपण बेधडक व्यवहारांत शिरतो व "महाघोर पातकमाला" जी जगांत आहे ती हातांत घेऊन तिचा रात्रंदिवस आपण जप करित असतो व पुढें आपलें काय नुकसान होईल, किंवा आपली काय गती होईल, आपल्यावर कसलीं संकटें अढोवतील, आपण कसल्या कचाट्यांत सांपडू याची आपण कांहींच परवा बाळगीत नाहीं.

ज्याला जगाचा अनुभव नाहीं, जो त्या संबंधानें अगदीं नवशिका आहे त्याला कोणी कोणती ही गोष्ट सांगो ती त्याला खरी वाटते. आणि जगामध्यें दुष्ट व नीच लोकांचा समाज आफाट आहे. त्यांत आमचा हा नवखा मनुष्य सांपडतो. व त्यांच्या संगतीनें आपण ही दुर्गुणी बनतो व व्यसनी होतो. कसा होणार नाहीं! त्याला जगामध्यें मायाजाळ केवढें पसरलें आहे, कपट किती बोकाळतें आहे, लपंडाव किती माजली आहे हें मुळींच माहीत नसतें. अथवा ह्या गोष्टी होतानां आपल्या डोळ्यांनीं बघण्याचा त्याला कधी प्रसंग येत नाहीं. मग मोठ्या सावधगिरीनें जगांत तो एकदम कसा वागू लागणार? त्याच्या हातून प्रमाद हे होणारच. पुढें अनुभवानें तो चांगला निघाला तर भाग्य त्याचें! नाहीं तर जगांत जें चाललें आहे त्यांत तो भर पाडतो.

आतां सृष्टीमध्यें एक चमत्कार होत असतो. आपण असें पाहतों कीं ज्यांना जगांतील दुष्ट लोकांपासून कधींच त्रास होऊं नयें अशी ज्यांची योग्यता ते सुद्धां या दुष्टांच्या जाळ्यांत सांपडतात ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. परोपकार करणें हाच ज्यांचा स्वार्थ व परमार्थ, परहिता साठींच आपलें सर्वस्व वेचिलेंलें ते दुर्जनांच्या मृगजळांत बुडावेत ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. पण असा प्रकार होतो हें आपण प्रत्यक्ष पाहतों. यांतील बीज हेंच. कीं अशा देवमाणसानां बाबानों हा पहा लुच्चांचा अड्डा येथें कसलाही सवदा करूं नका, नाहीं तर गड्यांत पडाल! बाबानों हें पहा विश्वासघात रूपी वारूळ. या वारूळांत दुर्जन रूपी साप रहाताहेत. त्या वारुळां पाशी गेला कीं ते दुर्जन रूपी साप येऊन तुह्माला न सुटणारीं अशीं वेटोळीं घालतील. त्यांची मिठी ह्मणजे मगर मिठी पेक्षांही जबर आहे असें सांगणारा त्यांना कोणी नसतो ह्मणून त्याची अशी स्थिति होते.

ह्मणून होत करूं जे आहेत त्यांना फार उपयोगी असा उपदेश केला पाहिजे. "खरोखर संसार" किंवा एकंदर आयुष्यक्रम हा एक लांबच लांब रस्ता आहे. तो प्रत्येकास चालावयाचा आहे. त्यारस्त्यानें फार सावधगिरीनें चाललें पाहिजे. त्या रस्त्यानें जातांनां वाटेंत पुष्कळ वाटसरू, पुष्कळ पाथस्थ भेटणार.

( पुढें चालेल )

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ५ शके १८१४

सत्कार्याला विघ्नें अतोनात येतात आणि तोच प्रकार नव्या कायदे कौंसिलाच्या कायद्या संबधानें झाला आहे. आतां एक नवीन बूट निघाला आहे कीं कायदेकानूच्या शास्त्रा अन्वयें त्या कायद्याच्या कलमांत कांहीं दोष दिसून आला आहे. कायद्याचें तत्व कबूल आहे आणि पार्लमेंटाच्या वादांत त्या कायद्याची पुष्कळ भवातेंनभवती झाली आहे तरी देखील संशयास जागा सांपडली हें मोठें नवल होय. आणि या संशयाची निवृत्ति होईपर्यंत स्टेट सेक्रेटरी लार्ड किंबरले हिंदुस्थान सरकारच्या सूचनांस आपली मंजूरात देऊ इच्छित नाहींत असें कळतें.

जूरीच्या न्यायपद्धती संबंधानें स्टेट सेक्रेटरी कडे इंडिया सरकारचा दुराग्रहाचा, अनुदार विचारांचा आणि बाधक तत्वाचा अभिप्राय लिहून गेला आहे त्यावर काय जबाब मिळतो हें पाहण्या कडे सर्व राष्ट्रांचे डोळे विलायते कडे लागले आहेत.

दहा दिवसा पूर्वीं कलकत्ता युनिव्हरसिटीचे पदवीदानाचा समारंभ झाला त्या समयीं व्हाईसराय लार्ड लान्सडाऊन यांचें चान्सेलर या नात्यानें संभाषण झालें तें विशेष खुलावटीचें असून त्यांत अनेक उपयुक्त प्रकरणांचा समावेश झाला आहे. आपलें हें संभाषण बहूतक त्या युनिव्हरसिटीच्या दिवाणखान्यात शेवटलें आहे असें त्यांनीं बोलून दाखविलें तेव्हां नेहमीच्या वहिवाटी प्रमाणें त्यांची मुदत या वर्षीं संपून लाट साहेब हिंदुस्थानास रामराम ठोकणार असें पक्कें वाटतें.

लार्ड लान्सडाऊन बोलले कीं युनिव्हरसिटीचे सिनेट ( मंत्रिमंडळा ) मध्यें लोकांनीं निवडलेले व लोकांच्या विचारांचे प्रतिपादक असे पुढारी पुष्कळ लोक पाहिजेत कां कीं स्वल्प काळांतच सिनेटवर एक नवीन पण जबाबदारीचें काम पडणार आहे. बहुतकरून हें मशहूर आहे कीं आह्मी स्टेट सेक्रेटरीच्या हुकूमाच्या खलित्याची वाट पहात आहों आणि त्यांची मंजुरी मिळाली ह्मणजे हिंदुस्थानांतील कायदे कौंसिलें निराळ्या तत्वावर रचली जाऊन लोकांस त्यांत अधिक अधिकार मिळणार आहेत. या कायदे कौंसिलांतून लोकमतास योग्य आदरस्थान मिळणार असून लोकहिताच्या गोष्टी अधिक सुखावह व लवकर घडून येतील अशी तजवीज करावयाची आहे. व्हाईसराय साहेब ह्मणाले कीं आमची स्टेट सेक्रेटरीकडे धाडलेल्या विनंतीपत्रांत एक सूचना आहे—आणि ती मान्य न होईल तर मला फार वाईट वाटेल— आणि त्या अन्वयें बंगाल इलाख्याच्या कायदे कौंसिलांतील नवीन भरावयाच्या जागा मध्यें एक सभासद युनिव्हरसिटीच्या सिनेटकडून नेमला जावा. कांहीं शिक्षण क्रमा कडील लोक असा आक्षेप घेतात कीं विद्यालयाचा राजकारस्थानाशी कांहीं संबंध असूं नये आणि त्या अर्थीं युनिव्हरसिटीला निराळा राजकीय हक्क दिल्यास मोठी चूक होईल. त्या आक्षेपावर समर्पक उत्तर देतेवेळीं लाट साहेब ह्मणाले कीं प्रथमतः नवीं कायदे कौंसिलें स्थापलीं ह्मणजे त्यांत इंडियांतील शिकलेले लोकांचे निवडलेले प्रतिनिधी असले पाहिजेत आणि त्या साठीं युनिव्हरसिटीतून प्रतिनिधी मागविले नाहींत तर दुसरे कोणत्या स्थलीं त्यांच्या पेक्षां विशेष खात्रीचे व यशस्वी लोक आपणास आढणार आहेत बरें! युनिव्हरसिटीनें या नव्या अधिकाराचा उपयोग मोठ्या तत्परतेनें व दूरदृष्टीनें केला पाहिजे ह्मणजे तेणें करून कायदे कौंसिलाचा व युनिव्हरसिटीचा बहुमान व जयजयकार होईल. शिक्षणक्रमाकडील लोकांनीं राजकीय प्रकरणांत हात घालूं नये असें आमच्या कृतीनें अगर स्वस्थपणानें घडणार नाहीं तेव्हां त्यांस राजकीय प्रकरणांत मुत्सद्दीपणा सरळ व कायदेशीर मार्गानें दिला तर त्या पासून आमचाच फायदा आहे.

# The Berar Samachar

**MONDAY FEBRUARY, 6 1893.**

We are glad to have an opportunity to accord a most cordial and sincere welcome to Mr. T. C. Plowden. However humble or grand his reception may be this week in this town, we shall assure him that it proceeds from the bottom of our hearts and we shall be echoing the one universal voice of welcome throughout the length and breadth of the province. His first return to Berar after his due and merited elevation to the Residentship & to the Companionship of the Star of India is just the thing that we all wished heartily. His services to these assigned districts are quiet in nature, grand in effect and most beneficial to the ryot at large. Though he had to transfer his direct control to the most experienced and deeply interested Nativ- of Berar ( Col. Mackenzie) he never lost hold of the large and wide interests that are entrusted to him. He unites in himself tried abilities, extensive experience, and a conscientious policy of right and honest administration. He is a giant-worker inspite of his old age. He has the good tact of harmonizing all party interets and conflicts. He is a faithful listener to all grievances and complaints. He gives a significant and salutary tone to the working of all departments under his control. Above all, his towering dignity and his high responsibilities do not change him an iota in regard to his care, sympathy and large-mindedness for the good and welfare of the poor ryots. As an illustration of our remarks we shall instance in the successful working of the Local Boards System, the efficient discharge of the valuable and well-defin municipal duties under his supervision, the liberal and generous rules framed to facilitate the utility of the Agricultursts Loans Act applied to Berar, the revised system of the Higher and Lower Standards Examinations and the indirect efforts to reform the judicial system as regards appointments and the regulation of grades.

We are aware that there are many important and instructive subjects that await his consideration and decision. The revenue system is in the process of a change. The new survey and settlement that is in the full swing of operations demands the largest share of thought and action. Berar has grown intelligent and educated and has to put forth for his recognition its claims upon the introduction of the jury system in the province. The lower-grade service under Government is most defective and knows no laws or regulations. If there are circulars and regulations to direct the judgment of big officers and to lay down broad and sound principles in making appointments and giving promotions, we observe, with reluctance that they are more honoured in their breach and total disobedience. If there are procedures to direct the ways and systems of law and justice we question why we should not have a service procedure as well. We may here confess that there was an attempt in that way when Mr. Plowden himself was in the province, and it but needs a hint from him to Col. Mackenzie to formulate the service procedure which we have just suggested. We may not close here without giving expression to the urgent and speedy separation of the judicial and revenue departments the long and continued union of which is clogging the legitimate work either of them and is thus impairing the useful and benificial working of this highly-paid branch of administration.

We shall note here with deep pleasure and satisfaction the cheery welcome and merited applause that has attended his politicel diplomacy at the first and greatest native state in India. He has won the confidence of the people and has directed, indirectly dut ably, the vast and extensive affairs of the Nizam's dominions. In the light and full prospect of his present and probable success as the Resident at Hyderabad we are even prone to give no weight as regards fulness and truth to the calumnies that were afloat about his career at the Kashmir-state. The recent reforms in the administration of the Nizam, the thorough revision of service under that state, and in short the rectitude and honesty that has been set in circulation in all that concerns the treasuries of the state and the interests of the ryots have been applauded with one accord and voice throughout India. And certainly it is for something great and admirable in the traits of Mr. Plowden's character that elicited from the lips of the Viceroy high eulogies and meritorious recommendation of his services that the India-Govt. could spare for His Highness the Nizam.

We welcome Mr. Plowden with all our heart and soul. May he derive great pleasure from his familiar places in Berar. The joys, we are not unmindful, he will have will, no doubt, be like all human joys and pleasures, alloyed with the pain of the loss of the life-longspartner—Mrs. Plowden. We cannot help such misfortunes as these but we are sure that the kind and noble heart of our popular Resident will be more humanized with the sight of misery in the people and will regain with

doubled vitality and energy its original dignity that he may be the trusted guide of the people to live for the people and to die for the people's cause.

## वऱ्हाड

आज रोजीं रात्रीं आकिशान रेसिडेंट मि. डीडन यांची स्वारी आकोल्यास येऊन दाखल होईल. त्यांच्या सन्मानार्थ येथें मोठा दरबार भरणार आहे हें कळविण्यांस आनंद वाटतो. त्यांच्या भेटीसाठीं प्रांतांतील मुख्य मुख्य अधिकारी येथें जमत आहेत.

गेल्या गुरुवारीं निजामसरकारचें नवीन प्रधान मंडळखुद्द निजाम साहेबांच्या अध्यक्षते खालीं भरून राजकार्यास प्रारंभ झाला. ईश्वर करो आणि हें प्रधान मंडळ यशस्वी होवो.

मि. केंवरलीन पोलीससुपरिटेंडेंट उपरावती हे आजारीपणाच्या रजेवर मुंबईस गेले आहेत. रोग मोठा आहे ह्मणून चिंता व काळजी वाटते.

रा. रा. यशवंत मोरेश्वर काळे यांस उमरावतीहून इलिचपुरचे डेपुटी क्लार्क आफ कोर्टचे जागीं बदलून रा. रा. नारायण रामराव यांस उमरावतीस डेपुटी क्लार्क आफ कोर्ट नेमिलें असें कळतें.

अकोला तालुक्यांतील केदारा गांवीं एका महिन्याभरापूर्वी मोठा दरवडा पडला होता तो पत्यांत येऊन १४ आरोपी सेशन कमिट झाले आहेत. या कामाचें श्रेय पोलिस इन्स्पेक्टर मि. थोंडजी कोंडजी यांस आहे आणि इतक्या वर्षाच्या अनुभवावरून आह्मी सांगतों कीं, मि. बोंडजी आपल्या चतुराईनें, मर्दुमकीनें व चाकबगारपणानें एवढ्या मोठ्या हुद्याला चढले. आणि हें त्यांस मोठें भूषण आहे.

## अकोलें बाजार भाव

हुंडी मुंबईची दर्शनी.... .... .... ९९॥=

" १६ दिवसांच्या मुदतीची.... ९९॥=

सुवर्ण २६॥.... .... रुपें....१०९

मीठ....३॥।--.... आळशी मापी ११२॥

जवस बननी ११९ .... चणे ....७०

गहूं काठे....७९..........बनशी....८२॥

बाजरी....६० .... तुर ३।

उडीद.....३०= .... मुंग ....३

ज्वारी ६०..............सर्की....३॥।

तूप....९॥ ... ..........तेल ६।

कापूस....९१--९८..........रुई ७९--८०

सच्याचे भाव ( इंग्रजी. )

गहू वैशाख शुद्ध १९४९ ....... ६६॥

आळशी चैत्र "........"........ ९८

रुई फाल्गुन.........."........ ६१

सर्की वैशाख नवे साळचीं"..........९॥=

ज्वारी.... वसंत........"............४६॥

## जाहिरात

म्युनिसिपल नियमांतील नियम १२ अन्वये जाहीर करण्यांत येतें कीं अकोलें म्युनिसिपल कमिटींतील तारीख ३१।३।९३ इसवी रोजीं ज्या मेंबराच्या जागा सदरहू नियमा पैकीं नियम ३१ प्रमाणें खाली होतील त्या भरण्या करिता तारीख २१ फेब्रुवारी सन १८९३ इ॥ रोजीं सकाळचे ७ वाजल्या पासून सायंकाळचे ५ वाजे पावेतों इलेक्शन ( निवडणूक ) होणार आहे. खालीं दिलेल्या तक्त्यांत प्रत्येक वार्डापैकीं मेंबर निघाले त्यांचीं नांवें त्या वार्डा करितां होणाऱ्या निवडणुकीची तारीख, जागा पोलिंग आफिसरचें नांव व उमेदवारांनीं कोणते तारीख पर्यंत पोलिंग आफिसर कडेस म्युनिसिपाल रूल १३ प्रमाणें आपलें अर्ज द्यावे ही माहिती दिली आहे.

| वार्ड | मेंबरांची नांवें | निवडणुकीची तारीख | निवडणुकीची जागा | पोलिंग आफिसरचे नांव | कोणत्या तारखेचे आंत उमेदवाराचे नांवचा कागद द्यावयाचा |
|---|---|---|---|---|---|
| वार्ड १ | मि. हरी रामचंद्र अनवीकर<br>मि. व्यंकटेश कृष्ण देसाई | २१ फेब्रुआरी ९३ | पाटील चावडी | मि. शमसुद्दीन साहेब | फेब्रुआरी १४ तारखेचे आंत. |
| २ | मि. शंकर गोविंद<br>मि. गोविंद विश्वनाथ | २१ फेब्रुआरी १८९३ | ग्रेनमार्केट आफीस | मि. गणेश बापुजी | सदर्हू. |
| ३ | मि. सुरजमल गोविंदराय<br>मि. व्यंकटेश रा. मुधोळकर<br>मि. फि. थोरीस सा. ( मयत ) | २१ फेब्रुआरी १८९३ | टाउनहाल | मि. कोलंब साहेब | सदर्हू. |

तारीख १६।१।९३ चे पत्रांत दिलेली नोटीस या नोटिशीनें रद्द झाली आहे.

अकोला १।२।९३ } B. M. Sathe सेक्रेटरी. मु. क. अकोला.

NOTICE

Under rule 12 of the Municipal rules, it is hereby published for general information, that elections to fill up the vacancies of members in the Akola Municipal Committee who retire on the 31 st March 1893 under the operation of Rule 31 st of the Municipal rules, shall take place from 7 A. M. to 5 P. M. on the 21st of February 1893. The following table gives for each ward, names of retiring members, date and place of election, names of polling officers and dates before which nomination papers underrule 13 of the Municipal rules should be delivered to the following officers.

| Ward | Name of retiring member | Date of election | Place of election | Name of polling officer | Date before which nomination papers to be submitted |
|---|---|---|---|---|---|
| Ward No 1 | Mr. Hari Ramchandra Anvikar<br>" Vyankatesh Krishna Desai | 21 st February 93 | Patil's chawry | Mr. Shamsuddin | 14 th February 1893 |
| Ward N. 2 | " Shankar Govind<br>" Govind Vishwanath<br>" Surajmal Govindram | | Grain Market office | Mr. Ganish Bapuji | Do |
| Ward 3 | " Vyankatesh R. Mudholkar<br>" P. Thoris (Died) | | Town Hall | Cap. R. p. Colomb | Do |

The notice published in the issne dated 16-1-93 is hereby cancelled. Dated 1-2-93 Akola.

B. M. Sathe.
Secretary
Municipal Committee Akola.

## बक्षीस. ( रु० २० )

जाहिरात.

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार सोनाजी माधव जनरल मुखत्यार तर्फे यशवंतराव गोविंदराव देशमुख रहाणार हातें ता. बाळापूर यांजकडून:—

जाहीर करण्यांत येतें कीं, ता. २२ माहे जानेवारी सन १८९३ इसवीचे सुमारास आह्मी आकोल्याहून हात्यास जाते वेळीं आमच्या जवळचे कागद नाहिसे झाले ते लिहिले प्रमाणें—जनरल मुखत्यारपत्र भाडेपट्टा रामप्रताप पोखरदास यांनीं जागेबद्दल करून दिलेला आणि मोकदम्याचे चिल्हर कागद वगैरे एका सरकारी पाकिटांत असलेले नाहींसे झाले आहेत तर कोणास सांपडल्यास आह्मास आणून द्यावेत अथवा कोणास सदरहू कागदाचा बरोबर तपास लागल्यास आह्मांस त्याचा पत्ता लावून द्यावा. जो कोणी कागद देईल अथवा बरोबर पत्ता लावून देईल त्यास वीस रुपये ( २० ) इनाम दिले जाईल.ह्मणून दिली जाहिरात.

( सही )
यशवंतराव गोविंदराव तर्फे मुखत्यार सोनाजी माधव देशमुख द० खु.

नोटीस

बळवंत विनायक दिगंबर राहणार अकोलें यांस खालीं सही करणारांकडून:—

आमची जमीन मौजे मोरगांव भाकरे येथील नंबर संख्या ३ ह्यांतील आमचे हिस्से तुह्मास गहाण दिले असून रु. २७०॥ घेतले त्यापुढें दोन वर्षे शेतें आह्मी वाहिलीं असून सारा आह्मी देऊन तुह्मास गहूं, कपाशी माल वसूलांत दिला तिसरें सालीं गोविंदा पासून एक दस्तैवज लिहून घेतलांत व शेतें हीं आह्मा पासून घेतलीं तीं संवत १९४३ पासून १९४९ पर्यंत तुमच्या ताब्यांत आहेत. यांत झालें उत्पन्नानें तुमचें कर्ज फिटून आमचे फाजील तुह्माकडे गेले आहे.

ह्यास्तव कळवितों या नोटीशीच्या तारखे पासून ८ दिवसांत आमचा हिशोब खरा व तो लेखी आह्मास द्या न द्याल तर दिवाणींत दावा करूं. ता. ४।२।९३

( सही ) मारुती दिनानाथ व गोविंद दिनानाथ वस्ती मोरगांव भा.

नोटीस

रा. रा. गदाधर जहागीरदार अडगांव ता० अकोट जिल्हे अकोलें यांस—

खालीं सही करणार यांजकडून या नोटीशीनें असें कळविलें जातें कीं, तुमचे जहागीर गांवा खालीं आमची इनामी व खात्याची शेती आहे त्यांचीं भांबें नशीरखा वा मोजमखा यांच्या नांवचें खातें होतें. व हे वमयत झाल्यावर त्यांचे बंधु रुस्तमखा गुलाबखा या नांवानें खातें झालें. रुस्तमखा मयत होऊन आज सुमारें पांच सहा वर्षे झालीं. त्या वेळ पासून आज पावेतों आह्मी आपल्यास कळवीत आहों कीं, आमची इनामी व खात्याची शेती आमच्या नांवांनीं करावी. त्यास आपण आम्हास उगीच आज पावेतों शीण देत आहा. याज करितां आपल्यास या नोटीशीनें असें कळविलें जातें कीं, नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत सदरील लिहिलें प्रमाणे आमची खात्याची व इनामी शेती वडिलोपार्जित आमचे नांवानीं रीती प्रमाणें करून द्यावी. असें केलें नाहीं तर याजबद्दल कायद्या प्रमाणें काम चालवून अखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान व खर्च होईल तो या नोटीशीचे खर्चासह भरून घेतला जाईल. ह्मणून दिली नोटीस ता. ४।२।९३ इ०

( सही )
जयनबी मर्द नशीरखा व मुलगा गुलाबखा वा नशीरखां चांदबी मर्द रुस्तमखा व मुलगा सरदारखा वा गुलाबखा राहणार हल्लीं अकोलें.

## वर्तमानसार.

म्यांचेस्टर येथें जो गलबतें वाहून नेण्यासारखा मोठा थोरला कालवा बांधण्यांत आला आहे. तो कालवा बांधण्यांत एकंदर १२००० माणसें वीस वर्षे काम करीत होतीं व त्यांतून ५००० मनुष्यांस कमी जास्त अपघातानें लहान मोठ्या इजा सोसाव्या लागल्या त्यांत १००० पासून १,१०० पर्यंत अपघातानें माणसें मेलीं. १७०० माणसें कायमच्या इजा होऊन व्यंग झालीं. आणि २९०० जण थोड्या बहुत इजा होऊन सुटले. मोठमोठीं कामें होतात तीं अशीं मनुष्यें बळी पडल्या शिवाय होत नाहींत.

मुंबईचे पार्शी बारिस्टर मि. जमशेटजी रुस्तमजी वाडिया हे ता. २३ दुपारीं बारिस्टर अँडरसन यांस एक कज्या समजून देत होते व संध्याकाळीं साडेपांच वाजतां त्यांचें प्रेत समुद्रांत तरंगत असलेलें सांपडलें. मरणाराचे कपडे काठावरील खडकावर काढून ठेवलेले असून प्रेताच्या खिशांत एक पत्रही सांपडलें.

येत्या वर्षीं हिंदुस्थानांत रेल्वे करण्याकडे सरकारामार्फत २८ कोट रुपये खर्च व्हावयाचे आहेत.

होळकरांचे नायबदिवाण रायबहादूर नानकचंद यांणीं शिरेबंदी खात्याची चांगली व्यवस्था केली ह्मणून होळकरांनीं दरबार करून त्यांस १०,००० रोख, २६०० रुपयांचा कंठा शिरपेच आणि ५०० रुपयांचा पोषाख अशी देणगी दिली. तसेंच असि. इंजनेर मि. मुळे यांस ११०० रुपये आणि मुख्य आकौंटट लाला विश्वंभरनाथ यांस चांगला पोषाख असेंहि दिलें.

ग्वाल्हेरचे महाराज रोमचे पोप बडे पाद्री यांस सोन्याच्या कलाबतूच्या दोन काश्मीरी शाली नजर पाठविणार असून त्या ते आपल्या एका एडीकांगाबरोबर रोम येथें पाठविणार आहेत असें सांगतात. खरें असेल तर या अल्पवयीं राजपुत्रास ही उठाठेव कशी सुचली हें एक गूढ दिसतें.

यात्रेकरू गोळा करणाऱ्या एका परदेशास थोड्या दिवसांवर मनमाड येथें पोलिसानें पकडलें. त्याच्या जवळ सुमारें एक हजारांचे चोरीचे दागिने सांपडले. सातारचे शिरके इनामदार यांचे ते चोरलेले आहेत असें तपासांत आढळलें व शिरके यांणीं ओळखले. त्यावरून खटला पुण्यास रवाना झाला आहे यात्रेस जाऊं इच्छिणारांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवावी.

हिंदुस्थानांत दरएक इलाख्याकरतां ह्मणून जी वेगळाली फौज आहे व त्यावर वेगळाला कमांडर इनचीफ आहे ती रीत बंद करून सगळ्या हिंदुस्थानची ह्मणून एकच फौज करण्याचा व इलाख्याच्या कमांडर इनचीफच्या जागा रद्द करण्याचा विचार सरकारांत पुन्हा चालू झाला आहे.

खाजिने, वगैरे ठिकाणीं जे लश्करी व पोलिस पाहारे असतात त्या त्या ठिकाणीं एकेक कुत्राहि ठेवावा ह्मणजे रात्रीच्या प्रहरीं जास्त बंदोबस्त होईल अशाबद्दल मद्रासरकारचा विचार चालू असून त्याप्रमाणें अनुभव पाहाण्याचें कामही चालू आहे.

हिंदुस्थानांतून विलायतेस जात असलेली कांहीं फौज इजिप्तच्या कामगिरीकरतां वाटेत उतरून घेतली आहे हिंदुस्थानची कांहीं फौज इजिप्तच्या कामगिरीवर जाण्याकरतां लवकरच कराचीहून निघणार आहे. ११,००० फौज जमविण्याचा उद्योग चालू आहे.

विलायतच्या निरुद्योगी लोकांच्या मोठाल्या सभा होत असून पोटाकरतां रोटीबरोबर त्यांस लुटण्याचाही त्यांनीं सपाटा चालविला आहे त्यांच्या बंदोबस्ताकरतां पोलिस आल्यास त्यांच्याशीं लढालढी करण्यासही ते अनार्यी आतां तयार झाले आहेत पोटाची आग मोठी कठीण खरी.

फ्रान्स व जर्मनी यांच्यांत लढाई सुरू झाल्यास रशिया फ्रान्साच्या बाजूस होईल व असें होणें रशियन लोकांस पसंत आहे असें सांगतात.

केटा येथील मुलींच्या शाळेवरील एका गोऱ्या मास्तरणीवर दोघां पठाणांनीं हल्ला करून बराच मार दिला.

सिमा व क्रान यांच्या दरम्यानचा जो रस्ता चिन लोकांनीं अडविला आहे तो खुला करण्या करतां इंग्रजटोळी गेली असतां त्या टोळीवर हल्ला होऊन एक इंग्रजकामदार मरणोन्मुख झाला व सात शिपाई ठार झाले. आतां सिमा रस्ता खुला करण्यासाठीं ४९० ४९० फौज मुद्दाम रवाना झाली आहे.

रशियाचें वकिलमंडळ काबुलास अमिराकडे राजकीय बोलणें करण्याकरतां गेलें कीं नाहीं याविषयीं जरी अजून शंका आहे तरी इंग्रज मिशन जेव्हां जलालाबादेस अमिराच्या भेटी करतां जाईल त्याचवेळीं एक रशियन मिशनही तेथें जलालाबादेसच पाठविण्याची उमरकंद येथें तयारी झालेली आहे. तसेंच मध्यएशियांतल्या रशियन राज्यकारभारांत पुष्कळ ऊजबेग लोक कामदार असून तेही मझार शेरिफ येथें आले आहेत असेंही समजतें. त्यांच्या येण्याचें कारण बाहेर आलेलें नाहीं. ते केवळ नुसते व्यापारीच असतील असें वाटत नाहीं. असें ही इंग्रजपत्रांचें ह्मणणें आहे.

परशत्रूपासून बचाव करण्याच्या रंगून येथील तटबंदीवरील मोठ्या तोफा काढून लहान ठेवण्यांत आल्या.

हल्लीची आपल्यांतली नाचपद्धती बदलली पाहिजे असें एका हिंदुपत्राचें ह्मणणें आल्यावरून त्यास जबाब देताना एक इंग्रज पत्रकर्ता ह्मणतो कीं, तुमच्या बायका बहिणी वगैरे अशल्या नाचांत येऊं लागून अगदीं परक्या व पाहिजे त्या पुरुषाच्या कमरेस मिळ्या मारून त्यांच्या बरोबर नाचूं लागल्याशिवाय ही सुधारणा व्हावयाची नाहीं उपदेश फार चांगला आहे आणि आमचे लोक घेतील तर आमच्या सुधारणेचा कळस झाल्यावाचून राहणार नाहीं आमच्या स्त्रियांस अगदीं स्वतंत्र केल्यावाचून आह्मी इंग्रजांची बरोबरी करण्यास समर्थ होणार नाहीं अशी आम्हा सुधारकांची समजूत असून त्यां दोन्ही गोष्टी आमच्यांत आल्या पाहिजे अशी आमची इच्छाही आहे आणि वर सांगितल्याप्रमाणें नाचण्यांत फरक होणें हें स्त्रियांस स्वतंत्र केल्याचें प्रमाण आहे तेव्हां आमच्या सुधारकांनीं तसें करण्यास कम्बर बांधली पाहिजे यांत कांहीं शंका नाहीं. ठा० अ०

न्यूचमनच्या शेजारी अमीर आपल्या नवीन छावणीची वसहात करीत आहे.

इंग्रज व अमीर यांच्या दरम्यान बुंदेलखंड संबंधानें कांहीं चकमक झडेलसें दिसतें.

रशिया आपल्या मुलखांत जिकडे तिकडे लढाऊ सामानाच्या तयारींत गुंतला आहे.

लखनौ बनारस रेल्वे कंपनीचें काम पैशाच्या कमतरतमुळें चालू सालीं बंद ठेवण्यांत आलें. मा० मि०

इजिप्शियन प्रकरणः—या प्रकरणा संबधानें सध्यां बरीच चळवळ उडाली आहे. केरो येथें लोकांचीं मनें विशेष अस्वस्थ झाल्या कारणानें व इजिप्त मधील इंग्लिश वकिल लार्ड क्रोमर यांचें ह्मणणें तावडतोब तेथील खेदिवांनीं मान्य करावें या हेतूनें हल्लींच्या प्रधान मंडळानें एकदम आसपासच्या लढाऊ जाहाजांस इजिप्त येथें जाण्याचा हुकूम केला होता. त्या प्रमाणें कांहीं फौजेसह तेथें जाऊन दाखल झालीं आहेत. लंडन येथून एक लढाऊ आगबोट २९० लोकांच्या पल्टणीसह निघाली आहे. आस्ट्रिया व जर्मनी यांना इंग्लिशसरकारची वर्तणूक सर्वस्वी योग्य वाटत आहे; परंतु रशिया व फ्रान्स यांना ती अधिक जुलमाची व असह्य वाटते आहे. केरो येथील लोकांत अद्याप शांतता झाली नाहीं; तथापि खेदिवांनीं इंग्रज सरकारच्या ह्मणण्या प्रमाणें मुख्य प्रधानांत फेरफार केला. या वरून इंग्लंडचा हात इजिप्तमध्यें बराच गुंतला असून त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें सर्व घडते आहे. हें प्रकरण कोठवर जाईल याचा नेम आतां सांगवत नाहीं.

टेलिग्राम अगदीं कमी दराचा ह्मणजे आठ आणे पडतात; पण चार आण्याचाही टेलिग्राम करितां यावा असा ठराव हिंदुस्थानांत लवकरच होणार आहे असें समजतें.

रशियन पोलांडमध्यें अतिशय थंडी पडली असतां ही कालरा जारीनें सुरू आहे असें ह्मणतात.

लुसिफर येथें एक योगी आहे. त्यानें आज १२ वर्षें अभ्यास करून असें योग साधन करून घेतलें आहे कीं तो दोन तासपर्यंत जळजळीत विस्तवा मध्यें स्वस्थ बसतो असें ह्मणतात. सु० प०

मंडालें येथें इतकी थंडी आहे कीं, कांहीं माणसें थंडीनें कांकडून मेलीं.

इशापूर येथें लहान लहान दगडांचे बंदुकीची दारु करण्याचा प्रयत्न चालूं होता, त्यांत यश येऊन हल्लीं त्या कारखान्यांत तशी दारु तयार होत आहे.

आसाम व्हॅलेमधून १८९२ सालीं ४, ४६१७,६७६ पौंड चहाचें उत्पन्न झालें.

सिमला गिरीवर फळांची लागवड करण्याकरितां सरकारानें ३,००० रुपयांची मंजुरी दिली.

बलुचिस्थानांत एक अति उंच टेकडी बर्फानें अगदीं आच्छादून गेली आहे

सेक्रेटरी आफ स्टेटला जे इंडियासरकारने पैसे द्यावयाचे ते रुपयांची किंमत कमी झाल्यामुळें ११४ लाख जास्त द्यावे लागतील. क० णू०

रशियाचे लढाईच्या कामांत दिवसें दिवस पुढें पाऊल पडत आहे, ही काळजी उत्पन्न करणारी बातमी हळूहळू बळकावत आहे. हा प्रसंग साधून मार्निंगपोष्टपत्रकार ह्मणतात कीं अशी आणीबाणीची वेळ हिंदुस्थानांवर येण्याची भीति असता कांग्रेसपक्षीय इंडियन यूनियन नामक पत्रांत हिंदुस्थानांतील इंग्रजी लष्कराची संख्या २० हजारां पावेतो येऊन पोंचे अशी वेळ येण्यासाठीं प्रार्थना करीत आहे! ज्या घरदाराची सर्व काळजी रखवालदारांवर सोपवून मालक स्वस्थ बसला, त्या घरादाराच्या पायाचे दगड सुद्धां नाहींसे होण्याची वेळ आली तरी अजून हे रखवालदार पाहिजेत कां!

खिचडी कमिशन--बडोदें येथें आज कित्येक वर्षें सतत चालत आलेल्या खिचडी घमींवर ती पुढें तशीच कायम ठेवावी कीं अजिबात बंद करावी, किंवा तिचें रूपांतर करावें अशा विषयीं विचार करण्याकरितां सरकारा कामिशन बसल्याचें कळतें. खिचडी घेणारांची संख्या पूर्वीं पेक्षां दसपट वाढली, लोक निरुद्योगी झाले, स्वतंत्रता पुष्कळ वाढली, विद्याव्यासंग बुडत चालला, अनाचार वाढत चालला या सर्व कारणामुळें हें कमिशन बसलें आहे असें ह्मणतात. न्या. सु.

---

डा० वामन गोपाळ यांचा
सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह पासून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षघातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणें, सूज येणें सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचें त्वचेचे रोग तसेंच सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरे औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जातंतु याच्या मंद झालेल्य सर्व क्रियाचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा
कल्प

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचेकेस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांतवरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकुर द्वारासमोर.

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साहामाही " ३ " ८८
साळअखेर " ७ " १८८
किरकोळ अंकास ....................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy....................1as

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII AKOLA MONDAY 13 FEBRUARY 1893 NO. 7

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख १३ माहे फेब्रुवारी सन १८९३ अंक ७

CLEMENTS TONIC

दुखणेकऱ्यास संजीवनी

क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचे टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दुर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणनें क्लेमेंट टानिक असें आढळलें. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उबड्या हवेंत राहणें, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें ताबडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेत सळका मारल्या तसेंच पाटींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशयाची आग होणें लघवी पांढरि होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखराच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे. हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणाराची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते म्हणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारे टॅनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्माच्या योगें शरिरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जेंवर ज्ञानतंतूची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हे औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clements. ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांना सावधगिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. ' क्लेमेंटचें टानिक 'नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कँप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बेनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकानें.

F. M. Clements, Inventor Sydeny, Australia.

## बक्षीस. ( रु० २० )

जाहिरात.

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार सोनाजी माधव जनरल मुखत्यार तर्फे यशवंतराव गोविंदराव देशमुख रहाणार हातें ता. बाळापूर यांजकडून:—

जाहीर करण्यांत येतें कीं, ता. २२ माहे जनेवारी सन १८९३ इसवींचे सुमारास आम्ही आकोल्याहून हात्यास जाते वेळीं आमच्या जवळचे कागद नाहिंसें झालें तें लिहिलें प्रमाणें—जनरल मुखत्यारपत्र भाडेपट्टा रामप्रताप पोखरदास यांनीं जागेबद्दल करून दिलेला आणि मोकदम्याचे चिल्हर कागद वगैरे एका सरकारी पाकिटांत असलेलें नहींसें झालें आहेत तर कोणास सांपडल्यास आम्हास आणुन द्यावेत अथवा कोणास सदरहू कागदाचा बरोबर तपास लागल्यास आम्हांस त्याचा पत्ता लावून द्यावा. जो कोणी कागद देईल अथवा बरोबर पत्ता लावून देईल त्यास वीस रुपये ( २० ) इनाम दिलें जाईल.म्हणून दिली जाहिरात.

( सही )
यशवंतराव गोविंदराव तर्फे मुखत्यार सोनाजी माधव
देशमुख द० खु.

## नमुना नंबर १४३.

कोणी स्थानापन्न होतो तेंव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें म्हणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम
६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ पैकीं मि. नंबर $\frac{१}{१८९३}$

स्पे० अ० कमिशनर साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

नांव जनसीलाल व बचुलाल बापाचें नांव गोंदूलाल राहणार अकोला ता० व जिल्हे अकोलें यांस मयत.

गोंदुलाल बापाचें नांव प्रभुदास राहणार अकोला ता० व जिल्हे अकोला. याचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें म्हणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे करितां सदर्हू मयत मनुष्याचें मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचें द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं ता० १८ माहे फेब्रुवारी सन १८९३ इ० रोजीं सदर्हु अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयी लेखी हकीकत दाखल करावी.

आज ता. ६ माहे फेब्रुवारी सन १८९३ इ.

Shamsuddin Alikhan.
सिविल ज्यडज्य.

## मानपत्र.

( आलिशान रेसिडेन्ट मि. टी. सी. क्रौडन यांस. )

हैद्राबादचे रेसिडेंट या नात्यानें आज प्रथमच आपण आमचे शहरांत आलांत याबद्दल अकोलें जिल्ह्यांतील लोकांचे वतीनें आह्मी अकोला म्यु. क. व जि. बोर्डाचे मेंबर आपलें स्वागत करतों.

माजि अलिशान रेसिडेंट साहेब बहादूर सर डेनीस फिटसप्याट्रिक याचे बरोबर आपण १८९१ सालांत येथें आला होतां त्यावेळीं दिलेल्या मानपत्रांत ज्या बंगाल नागपूर रेलवे विषयीं उल्लेख केला होता तो रेलवे हल्लीं सुरूं झाली आहे. परंतु तिजपासून जितका फायदा आमचे शहरचें व्यापारास होईल म्हणून वाटत होतें तितका झाला नाहीं. आमच्या जास्त निकट संबंधाची आणखी एक गोष्ट घडली, ती ही कीं अकोलें शहरास पाण्याचा पुरवठा होण्याकरितां तलावाचें कामास सुरुवात झाली. आपण आमचे प्रांतांत कमिशनर असतांनां ह्या संबंधानें फार कळकळ घेत होतां ह्याची आह्मास आठवण आहे. व त्याबद्दल आह्मी आपले फार आभारी आहोंत. केवळ आपण जोर धरिलात म्हणून जें काम सुरूं झालें त्या कामाचा क्रम कसा काय चालला आहे हें आपण नेहमीं मनःपूर्वक पहात आहा हें आह्मी जाणत आहों.

परमपूज्य व्हिक्टोरिया महाराणी साहेब व हिंदुस्थान सरकार यांनीं आपले उत्तम गुण; आपली हुशारी व उद्योगीपणा यांची योग्यता बरोबर जाणून आपणास हिंदुस्थानांतील पहिले नंबरचे रेसिडेंट नेमिलें म्हणून आह्मास आनंद वाटतो. व आपले कामाची योग्यता वारंवार जाणली जात आहे म्हणून आह्मास जास्त आनंद वाटत आहे. नुकताच जो आपणास किताब मिळाला तो या पुढें जे आणखी मिळतील त्यांचा प्रथम शकूनच आहे असें मानण्यास आह्मास शंका वाटत नाहीं.

नवीन पैमाष व काळीच्या साऱ्यांत फेरफार करण्याचें जें काम ह्या प्रांतांत सुरूं झालें आहे त्या संबंधानें या वेळीं आपल्या नजरेसमोर कांहीं गोष्टी आणाव्या अशी आमची इच्छा आहे. ह्या महत्वाचे कामाचा आपल्याच कारकिर्दीशीं विशेष संबंध आहे म्हणून आह्मास अधिक आनंद वाटतो. कारण या प्रांताची अंतःस्थ माहिती करून घेण्यास येथील लोकांच्या स्थितीची जवळच्या व जुन्या अशा मुंबई इलाख्यांतील लोकांच्या स्थितीशीं तुलना करण्यास आपणास उत्तम संधी होती. मुंबई प्रांतांत शेतकीच्या साऱ्यासंबंधानें आमचे इकडले सारखीच व्यवस्था आहे. परंतु तेथें शेतकऱ्यांच्या संरक्षणाचा कायदा व त्याच्या ऋणमोचनार्थ कमिशनचें काम एका मागून एक चालूच आहेत. आह्माला खात्री आहे कीं, आपलें हातून आमच्या हल्लींच्या व गांवीं रयतेच्या हक्कास धक्का पोचणार नाहीं व जेणें करून आह्मास निरंतर सुख व भरभराट मिळेल अशी आपण होईल तितकी खटपट कराल. तथापि या संबंधानें आह्मी आपणास अति नम्रतेनें एक गोष्ट सुचवितों कीं, या नवीन पैमाषी संबंधानें लोकांचें जें साशंक मत झालें आहे त्याचें मुख्यत्वें करून कारण हें कीं ही व्यवस्था काय चालली आहे हें त्यांस मुळींच कळत नाहीं. सरकार जर प्रत्येक शेतऱ्यांस त्याच्या वर-

चा सारा कां वाढत आहे हे नीटपणें समजावून सांगेल व त्या बाबतींत शेतकऱ्यांचें ह्मणणें काय आहे तें ऐकून घेईल तर रयतेचा सरकारशीं चांगला मिळाफ राहील यांत बिलकुल संदेह नाहीं.

आपणास बहुतकरून ठाऊकच आहे कीं दिवसेंदिवस ब्यागवडी खालीं जमीन ज्यास्त ज्यास्त येत चालली आहे व त्यामुळें गुरांस चरण्याकरिता जमीन नाहींशी होत चालली आहे. वऱ्हाडसारख्या शेतकीच्या प्रांतांत ही मुख्य गोष्ट आहे कीं शेतऱ्याच्या गुराकरितां सरकारानीं पुरेशी जमीन फुकट राखून ठेवलेली पाहिजे. मागले पैमाषीचे वेळीं जी जमीन एव्हढ्याकरितां सरकारानें ठेविली आहे ती पुरेशी नाहीं व ह्मणून आता नवीन पैमाषीचे वेळीं आपण या संबधानें योग्य विचार कराल अशी आह्मास उमेद आहे.

आणखी दुसरी एक गोष्ट आह्मी आपल्या नजरेस आणण्यास इच्छितों ती ही कीं, आलिकडेस गांवसफाई, आद्यशिक्षण व दवाखाने यांचा सर्व बोजा जि. बोर्डावर घालावा असा सरकारचा कल होत चालला आहे. आकोला जि. बोर्डाचें उत्पन्न अगदीं नियमित आहे व आमची अशी विनंती आहे कीं, जि. बोर्डावर अशा बाल्यावस्थेंत एव्हढी मोठी जबाबदारी घालून आपण त्यांचेवर ज्यास्त बोजा पडेल असें करणार नाहीं.

अकोलें येथील बाजारांत कापूस विक्री संबधानें जी एक पुष्कळ वर्षांपासून वहिवाट होती ती नुकतीच येथील म्युनिसिपाल कमिटीनें बंद करण्याची व्यवस्था केली आहे, हें आपणास कळविण्यास फार संतोष वाटतो. परंतु जो पर्यंत ही व्यवस्था अगर अशीच दुसरी व्यवस्था इतर ठिकाणीं सुरूं होणार नाहीं तों पर्यंत आमचे येथील कपास खरेदीदारास आमच्या कडक व्यवस्थे बद्दल कुरकुर करण्याप्त जागा राहील. जी ही व्यवस्था केली आहे ती विशेषें करून रयतेच्या संरक्षणार्थ आहे.

ह्याच वेळीं आह्मी आणखी एका गोष्टीचा उल्लेख करतों ती ही कीं, न्यायखात्याची व्यवस्था. ही व्यवस्था ह्या प्रांतांत १८८९ सालीं सुरू झाली ती अशा करितां कीं, न्याय कोर्टें फिरतीं नसावीं, त्यांवरच्या अधिकाऱ्याकडे सिव्हिल खेरीज दुसरें काम नसावें, व अपील कोर्टांतील काम ज्यास्त चांगलें व्हावें. या शेवटल्या बाबी संबधानें ही व्यवस्था आरंभा पासूनच वाशीम बुलढाणा, व यवतमाळ या जिल्ह्यांत अपूर्ण राहिली आहे. हल्ली जी खरोखर व्यवस्था अंमलांत आहे तिजपासून असें दिसून आलें आहे कीं, उमरावती येथील सिव्हिल. व सेशन जज्जाकडे जें काम आहे तें एका अधिकाऱ्याच्यानें होण्या सारखें नाहीं. आह्माला उमेद आहे की, ही गोष्ट आपले लक्षांत आहे व आपण या संबंधानें विचार करीत अहांत आह्मी विनयपूर्वक एवढेंच सुचवितों कीं, जर एखादें ज्यास्त अपिलेट कोर्ट स्थापावें लागलेंच तर पश्चिम वऱ्हाडचें मुख्य स्थान जें आकोलें व जेथें हल्लीं आपण सर्व्हे व ल्यांड रेकार्डचें आफीस आणलें आहे त्याच्या हक्काकडेस आपण मेहर नजर द्याल.

१८९१।९२ सालच्या शाळाखात्याच्या रिपोर्टावर अलिशान रेसिडेन्ट साहेब बहादुर यांनीं जो ठराव केला आहे त्यांत त्यांनीं अशी इच्छा दर्शविली आहे कीं, २ सरकारी हायस्कुलापैकीं १ बंद करावें. त्या मुळें लोकांची मनें घाबरून गेलीं आहेत. यंदा दोन्हीही हायस्कुलचे म्याट्रिक्युलेशन परीक्षेचे निकाल फार चांगले झाले आहेत. आणि आह्मी अशी विनंती करितों कीं, या बाबतींत लोकांना आश्वासन देणें आता आपल्या स्वाधीन आहे

१८८९ च्या सेक्रेटरी आफ स्टेटच्या पत्र नंबर १०४ वरून सिव्हिल सर्व्हीस मध्यें एतद्देशीय लोकांना मोठमोठ्या जबाबदारीच्या जागा द्याव्या असें ठरलें आहे. या प्रश्नाचा निर्णय करितांना हिंदुस्थान सरकारनें वऱ्हाडांतील लोकांच्या हक्काचा विचार करण्याचें वगळलें ही गोष्ट आह्मी अति नम्रतेनें आपले नजरे समोर आणतों आणि आपणांस अशी विनंती करितो कीं आपण ती हिंदुस्थान सरकारचे नजरेस आणण्याची मेहरबानी कराल. आह्मी येथें एव्हडें सांगतों कीं आमच्या जवळच्या सेंट्रल प्राव्हीन्समध्यें ज्या ७ जागा पूर्वी सिव्हिल सरव्हिस पैकीं असत त्या आतां मागचे साल पासून त्या प्रांतीय लोकांकरितां खुल्या ठेविल्या आहेत.

सरते शेवटीं आह्मी परमेश्वरापाशीं एव्हढेंच मागणें मागतों कीं, तो आपणास यश देवो, आपली तनुदुरुस्ती राखो, आपणास दीर्घायु करो व सरकार व प्रजा या उभयतांचे मनांत आपणाविषयीं ज्यास्त पूज्यभाव उत्पन्न होवो. आह्माला अशी ही उमेद आहे कीं, वऱ्हाडांतील आह्मी लोक आपणास नेहमी स्नेही ह्मणून मानतों व आह्मास आपले भेटीचा लाभ देण्यास आपण सवड करीत जाल.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य १२ शके १८१४

शेतकऱ्यास कर्जाऊ पैसा देण्याविषयींचा १८८४ चा १२ वा आक्ट वऱ्हाड प्रांताला लागूं करून त्या अन्वयें जे नवीन नियम अलिशान रेसिडेंट साहेबांनीं घालून दिले आहेत. त्या नियमांची सरक्युलराच्या रूपानें अंमलबारी चालूं साला पासून सुरूं झाली. १८९१ चें हें पहिलेंच सरक्युलर आहे. गेल्या सप्तम्बर महिन्यांत हे नियम प्रसिद्ध होऊनही त्यांचें सरक्युलर फार उशीरा निघालें ह्मणावें लागतें. आमची इच्छा होती कीं ते नियम मराठींत भाषान्तर रूपानें सत्वर जाहीर व्हावे पण सरकारांतूनें अद्याप तशी तजवीज झाली नाहीं ह्मणून दिलगिरी वाटते. ज्या नियमांचा उपयोग इंग्रजीचें ज्ञान नसणाऱ्या जनसमुदायाला व्हावयाचा आहे ते नियम इंग्रजींत अनेक वेळा प्रकाशित झाले तरी आह्मी त्यांचा तादृश फायदा समजत नाहीं. या नियमांची माहिती आह्मी मराठींत मागेंच दिली आहे तरी विषयाच्या महत्वाकडे नजर देऊन पाहिलें असतां सर्व प्रांतांतून घरोघर दारोदार त्याच्या प्रती सांपडत्या पाहिजेत ह्मणजे लोकांच्या दृष्टीस त्यांतील अनेक गोष्टी सहजी येतील.

वऱ्हाड प्रांतांत तगाई ह्मणून सरकारांतून पैसा कर्जाऊ मिळत असतो तो फार थोड्या बाबी पुरता असल्यामुळें व या इलाख्यांत तगाईची फारशी जरूर लागत नसल्यामुळें तगाईच्या फंडाचा लोकांना विशेष उपयोग करून घेता आला नाहीं. ही गोष्ट अलिशान रेसिडेंट मि. क्रोडन यांच्या लक्ष्यांत आली आणि त्या बरोबर त्यांना असेंही वाटलें कीं शेतकरी फार नादान स्थितींत आहेत आणि ते सावकारी व्याजानें ठार बुडत आहेत तेव्हां त्यांच्या कर्जमुक्ततेसाठीं व तरणोपायासाठीं सरकारी पेढी निघाली पाहिजे. साहेब बहादूर कमिशनर असतांना त्यांनीं या पेढीच्या प्रकरणांत लक्ष्य पोंचाविलें आणि नंतर रेसिडेंट झाल्यावर ते खुद्द व त्यांचे हस्तगत कमिशनर कर्नल मेकंझी यांनीं एक छोटीशी शेतकऱ्यासाठीं सरकारी पेढी स्थापिली आणि तिच्या बहुत प्रसारासाठीं व उपयुक्ततेसाठीं नवीन नियम केले तेही पोक्त विचारांचे, उदारपणाचे व कळकळीचे आहेत. त्या नियमांचा लोक जसजसा उपयोग घेतील तसतशी शेतकरी पेढी मोठी होऊन लोक सुखी होतील व शेती सुधरूं लागेल.

सोन्याची किंमत अतिशय वाढत चालली असल्या मुळें हिंदुस्थानांत रुप्याच्या नाण्यांत पगार, पेनशनें वगैरे मिळणाऱ्या युरोपियन कामदारांनीं एकच कल्लोळ उसळून दिला आहे. त्यांचें म्हणणें कीं मुलाबाळांची विद्या विलायतेंत व्हावयाची असते, पेनशनें तिकडेच उपभोगावयाचीं असतात, आणि तिकडील पदार्थ ऐषआरामा साठीं घ्यावे लागतात आणि त्या बद्दल सर्व खर्च सोनेरी नाण्यांत करावयाचा असतो पण तशीं सोनेरी नाणीं रुप्याचा भाव उतरल्या मुळें आमच्या वेतनाच्या रुपयां बद्दलची उत्तरोत्तर थोडीं मिळतात आणि त्या मुळें आमच्या मनांत भावी भिकारपणाचे विचार रात्रंदिवस घोळतात व त्या विवंचनेंत सरकारची चाकरी बरोबर बजावली जात नाहीं. त्यांचें म्हणणें कीं कसें ही करून, सोन्याचा भाव उतरो अगर चढो, आमच्या वेतना बद्दल आम्हांस एका नियमित सोन्या रुप्याच्या भावा प्रमाणें रोजमुरा भागवून देत जावा. या त्यांच्या सूचनेचा गर्भितार्थ आमचे पगार व पेनशनें वाढवा असें च स्पष्ट म्हणण्याचा आहे. गेल्या ६१ वे तारखेस या असंतुष्ट गोऱ्या अधिकारांनीं वीस स्वरांनीं व आणाभाका घेउन व्हाइसराय साहेबांस त्यांच्या प्रकरणाचा मेहेरबानीनें विचार करण्या बद्दल विज्ञप्ती केली. व्हाइसराय साहेबांचें अंतःकरण त्या प्रसंगीं फार द्रवलें व त्यांनीं त्यांस अनेक प्रकारें आश्वासिलें.

दुसरी बाजू पाहतां हिंदुस्थानदेश अगोदरच राज्यकारभाराचा अवाढव्य खर्चानें भिकार, कर्जदार आणि नादार बनत चालला आहे. खर्चाचा बोजा संभाळण्यास अगदां असमर्थ असतांना त्या देशावर नवीन खर्च वाढणें, सोन्या रुप्याच्या भावांतील फरकाचा बोजा लादणें आणि लष्करी खर्चाची रक्कम फुगविणें वगैरे गोष्टी करण्यास सरकार धजत नाहीं असें नाहीं तर तसें करण्यास त्यांस तिळा एवढा दरकार कोठें सवड नाहीं. आह्माला गोऱ्या कामदारांच्या दुस्सह स्थितीचा माठा कींव येते खरी पण आमचा त्यांना एकच प्रश्न आहे कीं या देशांतील तोट्याचीच नोकरी पतकरून मागाहून कुरकुर करण्यापेक्षां त्यांनीं या देशाचें अगदीं नांव सोडून द्यावें. आणि शिवाय आह्मी ओरडतच आहों कीं युरोपियन लोक नेमल्यानें आमचें फार नुकसान असून आमच्या पोटावर ते पाय देतात. हा खरा प्रकार आहे तर इंडिया वरील विलायतची परोपकारबुद्धी अस्तास कां जात नाहीं!

पार्शी लोक येईल तशी पाठ देऊन आपला उद्योग, विद्या, व ऐश्वर्य वाढविण्यांत कुशल व भाग्यशाली खरे! ते या देशांत नवीन ह्मणून त्यांना आपला पूर्वीचा निराळेपणा किंवा आपलेपणा राखण्याचा नसतो आणि त्यांनीं राजकर्त्या इंग्लिश लोकांच्या चालीरिती, पेहराव, वगैरे सर्व गोष्टींचें अनुकरण केलें आणि ते त्यामुळें राजाश्रयास अधीक पात्र व अधीकसेवादक्ष बनले. नवलाची गोष्ट अशी कीं इंडियांत इंग्रजी झाल्या पासून 'बारोनेट' ही पदवी पावलेले एकच पारशी गृहस्थ होते. हे सर जमशेटजी जिजीभाई बारोनेट आपल्या कर्णासारख्या दानशूरपणामुळें आबाल वृद्धास माहीत होते. त्यांच्या पश्चात ३२ वर्षांनंतर दुसरे पार्शी गृहस्थ उदयास येऊन वैभवशिखरास पोचलेले सर दिनशा माणिकजी पेटिट हे होत. यांच्या नांवापुढें व यांच्या वंशातील मुख्य पुरुषास वंशपरंपरेनें बारोनेट ही पदवी देण्याचा कायदा सरकारच्या कौंसिलपुढें आहे. सर दिनशा माणिकजी पेटिट यांच्या पश्चात् त्यांच्या नांवाचेच जाहीर असणारे बारोनेट पदवीवाले वंशजांची त्या पदवी प्रमाणें संपत्ति, ऐश्वर्य व मानमरातब हीं कायमपणें व सतत चालावीं ह्मणून सालिना सव्वा लक्ष रुपये उत्पन्न होईल आणि 'पेटिट हाल' या नांवानें त्याचा वाडा प्रसिद्ध राहील अशासाठीं मुंबई मुनसिपालिटीच्या फंडात सर दिनशा माणिकजी पेटिट यांनीं पैसा व्याजी लाविला आहे. ईश्वर करो आणि सर दिनशा यांचा वंशवृक्ष बारोनेट पदवीसह चिरकाल वृद्धिंगत होवो.

* डाक्टर मोरेश्वर गोपाळ देशमुख यांनीं आपले असिस्टंट केमिकल अनलायझरचे कामाचा राजीनामा दिला होता तो मुंबई सरकारांतून मंजूर होऊन आला ही गोष्ट मोठी सुमार झाली. डाक्टर मोरेश्वर गोपाळ आपली खाजगी वैद्यकी चालवीत ती गैरकायदा होत होती ह्मणून त्यांनीं राजिनामा दिला असें ह्मणतात तें यथार्थ नाहीं. खाजगी वैद्यकी करूं नये असा हुकुम नव्हता आणि त्यांची गेल्या बारा वर्षांचीं कामें ठिकठिकाण सरकारी रिपोर्टांतून वाखाणलेलीं आहेत. बाकीं हें खरें कीं मुंबईच्या सिव्हील सर्जनला त्यांची खानगी वैद्यकी पाहवत नसे. राजिनाम्याचें कारण। डाक्टर देशमुख हेच लिहितात कीं केमिकल अनलायझर हें रजेवर जात आहेत तेव्हां त्यांच्या रजेंत मला माझी योग्यता व कामगिरी पाहून आफिशीएटींग नेमण्यांत यावें असें असतां मला नेमिलें नाहीं. अनलायझरचें काम फार चाणाक्षपणाचें, विशाल विद्वत्तेचें व दीर्घ अनुभवाचें असतें आणि तें करण्यास लायक [पुढे पहा.]

असा सध्यां मनुष्य नाहीं तेव्हां खात्याच्या नियमाअन्वयें ही जागा मला देता येत असे त्यांचे ह्मणणें होतें आणि तें बरोबर व रास्त होतें. त्यांच्या अर्जावर ननाचा पाढा लिहितांना सिव्हिल सर्जन ह्मणाले कीं ज्या कमिशनेड मेडिकल आफिसरास सही ठोकतां येते व हाता खालील लोक कामें करितांना पाहतां येते त्यांच्या अंगीं केमिकल अनलायझर होण्यास अधीक गूण नसले तरी हरकत नाहीं. डाक्टर देशमुख यांचा फार फार हेतु होता कीं मुख्य अनलायझर होऊन मेडिकल कालेजांत त्या हुद्या प्रमाणें प्रोफेसरें काम सर्वोत्कृष्ट करून दाखवावें आणि त्या मनोदया वरून त्यांनीं बारा वर्षांवर सरकारी चाकरी उत्तम प्रकारें केली पण शेवटीं मुंबई सरकारानें नेटिवांच्या योग्य हक्काविषयीं कृपणता व डोळेझांकपणा दाखविला हें त्यांच्या नांवाला कालिमा आणणारें उदाहरण होय. परंतु विषाद मानण्यास खरोखर कारण नाहीं कांकीं नेहमीचेच सरकारचें वर्तन नेटिवा संबंधानें मत्सरबुद्धीचें, हेकेखोरपणाचें व अनुदार दृष्टीचें आहे.

## पानसुपारी.

( आलिशान रेसिडेन्ट मि. टी. सी. होडन सी. एस. आय. यांस )

गेल्या मंगळवारीं येथील टौनहालांत आलिशान रेसिडेन्ट मि. टी. सी. होडन सी. एस. आय. यांच्या सन्मानार्थ मोठ्या थाटमाटाची पानसुपारी अकोला मुनसिपालिटी आणि जिल्हा बोर्ड यांजकडून देण्यात आली. सभागृह उत्तम प्रकारें शृंगारलेलें व शोभायमान बनविलें होतें. होडन साहेबांच्या आदरसत्कारासाठीं या जिल्ह्यांतील बहुत ठिकाणचे गृहस्थ जमले होते. युरोपियन व नेटिव अधिकारी पुष्कळजण या समपास हजर होते. पानसुपारी सारखीं मंगलकार्यें करण्यांत आमच्या शहरचीं मंडळी मोठी तरबेज झाली आहे तेव्हां परिपाठाप्रमाणें वर्णन करीत न बसतां सर्व गोष्टी यथास्थित व वाखाणण्या सारख्या झाल्या हें लिहिलें ह्मणजे पुरें आहे व्यवस्थितपणा, टापटीप, व बंदोबस्त चांगला दिसून आला आणि कांहीं एक कमीपणा ठरावीक बातबेतांत दिसून पडला नाहीं हें कळवितांना आह्मी व्यवस्थापक मंडळीचे फार फार आभार मानतों. आलिशान रेसिडेंट आदिकरून सर्व लोक आपापल्या अधिकारा प्रमाणें आंखून ठेविलेल्या खुर्च्यांवर विराजमान झाल्या नंतर आरंभीं फोटो घेण्यांत आला आणि नंतर रावसाहेब देवराव विनायक यांनीं मानपत्र वाचून दाखवून मि. होडन यांस अर्पण केलें. मानपत्रावर साहेब बहादुरांनीं समर्पक, संक्षिप्त आणि कलमवार जबाब दिल्या नंतर मंगलवाद्यें वाजत असतांना हारतुरे, अत्तर, विडे वगैरे वाटल्या नंतर सर्वजण मोठ्या हर्षयुक्त व आनंदित अंतःकरणानें परस्परांचा निरोप घेते झाले. सभा पांच वाजतां भरून साहा वाजतां बरखास्त झाली.

कर्नल मेकेंझी आदिकरून जमलेल्या गृहस्थांस संबोधून आलिशान रेसिडेंट मानपत्रावर उत्तर देतांना बोलले कीं प्रस्तुतसारख्या महत्वाच्या विषयांनीं ओतप्रोत भरलेल्या मानपत्रावर जबाब द्यावा लागेल असें मला वाटलें नव्हतें. मानपत्रांतील मुख्य विषयांचा योग्य विचार होण्या साठीं मला त्यांचा मागाहून विचार केला पाहिजे

( १ ) जमिनी वरील साऱ्याच्या फेरतपासणीच्या प्रकरणाला मानपत्रांत आदिस्थान दिलें आहे तें आपण बरोबर केलें. डायरेक्टर आफ लॅंड रिकार्डस व अग्रिकल्चर यांचे अध्यक्षते खालीं तें काम चाललें आहे. आणि मला वऱ्हाड प्रांताची आपण वर्णिल्या प्रमाणें संपूर्ण माहिती नाहीं तरी वऱ्हाड सारख्या ज्या प्रांताचें वैभव व कल्याण शेतकीवर अवलंबून आहे तेथें सध्यां चाललेल्या पैमाषीच्या कामावर लोकांचें हिताहित केवढें अवलंबून आहे तें मी पक्कें जाणतों. आणि सध्यांच्या धाऱ्यांत कितपत फेरबदल करितां येईल या बद्दलचा माझा अभिप्राय मला अद्याप उघड करितां कामा नये तरी मी हें खात्री पूर्वक कळवितो कीं स्थानिक सरकारचा संकल्प जमिनीवर योग्य व वाजवी सारा ठेवण्याचा आहे. आणि त्या संबंधाच्या खऱ्याखऱ्या गोष्टी कळून घेण्या साठीं लोकांचा सल्ला घेण्यास व डायरेक्टरांच्या सूचनांवर भवतिनभवति करण्यासाठीं पूर्ण सवड देण्यास मी फार खुषी आहे आणि तसेंच तुमचे कमिशनर व त्यांचे हाता खालील अधिकारी हो तत्पर आहेत. मलकापूर तालुक्यांतील मोजणीचीं कामें पूरीं होऊन त्याज विषयीच्या सूचना कमिशनर कडे आल्या असाव्यात आणि कर्नल मेकेंझी त्यांवर सूज्ञ लोकांचे अभिप्राय मागविणार आहेत.

( २ ) मानपत्रांत गुरांच्या कुरणा संबंधानें उल्लेख केला आहे त्याचा विचार सध्यांच्या तरमबंदीच्या वेळीं केला जाईल. माजी सुप्रसिद्ध रेसिडेंट सर फिट्झ प्याट्रीक यांनीं या प्रकरणांत चौकशी केली आहे. प्रश्न मोठे आहे तरी त्या चौकशी अंतीं खालील माहिती कळून आली आहे. जंगल खात्यांतील पहिले भागांतील ( क ) सर्वांत गुरांस चरण्या साठीं जीं प्रांव्हीशिअल गवताचीं रानें आहेत तीं ६४५००० एकर, मोफत कुरणें ३९८००० एकर मारवेल गवता साठीं रमणे १६००० एकर, आणि खाजगी गुरें चारणीचीं शेतें १०२४००० एकर आहेत. या आकड्यांत मेळघाट तालुक्यांतील जीं मोठीं कुरणें इलिचपूर, अंशतः आकोला व उमरावती या जिल्ह्यांत गुरांच्या उपयोगीं पडतात त्यांचा समावेश नाहीं, तसेंच फारेस्टांतील अ भागांतून ज्या कांहीं ठिकाणीं गुरें चारण्यास परवाना मिळतो तीं ठिकाणें या आकड्यांत सामील नाहींत, आणि जनावरांस कडबी पासून जो मोठ्या पुरवठ्याचा चारा मिळतो त्यांचा या आकड्यांत अगदीं संबंध नाहीं. आणि शेंकडा ३३ प्रमाणानें वहित जमिनींतून ज्वारी पिकते या गोष्टी वरून या कडबीच्या पुरवठ्याची कल्पना होईल. तेव्हां वरील माहिती वरून असें कळतें कीं, जनावरांस चारा वऱ्हाडांत कमी नाहीं आणि मोफत कुरणासंबंधाची ओरड खरोखर तीं सर्व प्रांतसारखीं बरोबर विभागली नसल्यामुळें आहे आणि या गोष्टीला काय उपाय केला पाहिजे त्या बद्दल कमिशनरांस विचारलें आहे.

( ३ ) जिल्हा बोर्डस नुक्तेंच स्थापले आहेत तेव्हां त्यांच्यावर जबाबदारीचा विशेष बोजा लादणें चांगलें नाहीं हें मला पूर्ण संमत आहे. विशेषेंकरून या जिल्ह्यांतील जिल्हा बोर्डाचें काम प्रशंसनीय आहे हें मला ठाऊक आहे. आणि मला एवढेंच उपदेशपर सांगितलें पाहिजे कीं, डे० कमिशनर तुमच्या अडचणीच्या वेळीं कर्तबगारीनें व कळकळीनें तुह्मास मदत देत जातील.

( ४ ) कापशीच्या सौद्या मधील वहिवाटी ज्या आकोल्यांत मोडल्या आहेत त्या संबंधाच्या प्रश्नांत सरकारनें हात न घालणें बरें असें मला वाटतें. कापसाचे विक्रीदार व खरेदीदार या उभयतांस त्यांचा फायदा कळतो तेव्हां त्यांच्या त्यांनीं भानगडी उलगडून टाकाव्या.

( ५ ) नवीन न्यायकोडतांची रचना होऊन फार काळ लोटला नाहीं तेव्हां तिजमधील उणेपणा अद्याप कळत नाहीं. आणि या कोडतांच्या रचने विषयीं वरिष्ठ अधिकारी दक्षतेनें शोध करीत असतात.

( ६ ) वऱ्हाडांत दोन्ही हायस्कुलें पाहिजेत किंवा नको या प्रश्नाविषयीं माझें ठाम मत नाहीं; आणि रावबहादूर श्रीराम भिकाजी जठार सारखे प्रांताच्या शिक्षणविषयक अवश्य गोष्टीचे संपूर्ण वेत्ते आणि मोठ्या कळकळीचे हितकर्ते डायरेक्टर असतांना प्रांताला अहितावह असा कांहीं निकाल होईल अशी तिळमात्र भिती नको ( टाळ्यांचा गजर ) एक हायस्कूल पाहिजे अगर दोन पाहिजेत-हा मुळ प्रश्न नसून तो असा आहे कीं खाजगी उद्योगाला उत्तेजन देण्या साठीं दोहों पैकीं एखादें हायस्कूल सरकारें काढून टाकण्याची वेळ आली आहे कीं नाहीं. जर एक हायस्कूल खाजगी झालें तर सरकारी हायस्कूल त्याच्या स्पर्धेनें व ईर्षेनें उर्जित दशेस पावेल. आणि शाळाखात्यानें सर्व प्रांताच्या मानानें ज्या हयत्ता घालून दिल्या आहेत त्याहून विशेष सोयस्कर अशा हयत्ता पुढें सरसावलेल्या लोकां साठीं खाजगी शाळेच्या व्यवस्थापकांस सुरू करितां येतील.

( ७ ) उच्च प्रतीच्या अधिकारावर नेटिवांस नेमण्या संबंधानें नेटिवांचे हक्क बाजूस सारले आहेत हें ह्मणणें या प्रांता विषयीं यथार्थ व वास्तविक नाहीं. कांहीं अंशीं अमानी मुलुखांतील ब्रिटीश राज्यकारभाराची गोष्ट अगदीं निराळ्या स्वरूपाची आहे, आणि कांहीं अंशीं प्रांताचा विस्तार फार लहान असल्यामुळें वऱ्हाड प्रांताला 'प्राव्हींशिअल सर्व्हिस'ची पद्धत लागू केली नाहीं हें खरें तत्रापि प्रांताचे क्षेत्रफळ व उच्च प्रतीच्या माफक जागा या मानानें पाहतां उच्च प्रतीच्या अधिकारावर वऱ्हाडांत बरेच नेटिव आहेत. १९ असिस्टंट कमिशनरा पैकीं सातजण नेटिव असून तीन वेळा नेटिव गृहस्थांनीं डेपुटी कमिशनराचें काम केलें आहे आणि वारंवार इतर स्थानिक सरकार आमच्या कडील आफिसर मागून घेत असतात. तेव्हां जरी 'प्राव्हिनशिअल सर्व्हिस'ची पद्धत वऱ्हाडाला लागू केली नाहीं तरी नेटिवांचे योग्य हक्क पाहिले जातील.

( ८ ) मानपत्राच्या आरंभीं आपण मजसंबंधानें स्नेहसंबंधाचे उद्गार काढले आहेत आणि माझें अभिनंदन केलें आहे. आपल्या मित्रत्वच्या विचारा बद्दल मी कृतज्ञ आहे आणि आपण ज्या इच्छा प्रगट केल्या त्याबद्दल मी आपला आभारी आहे. अमानी मुलखांशीं माझा संबंध जडल्या पासून खाजगी व सरकारी लोकांपासून जो राजनिष्टपणाची मदत व प्रोत्साहन मिळालें आहे त्याबद्दल मी त्यांचा कसा अत्यंत ऋणी आहे हें मजहून इतर कोणी जाणत नाहीं.

सुधारक पक्षाचे मुगुटमणि नामदार काशिनाथ त्रिम्बक तेलंग सी. आय. इ. यांनीं आपल्या अल्पवयस्क कन्येचा 'अष्टवर्षाभवेत्कन्या' या सूत्रा अन्वयें विवाहसमारंभ करून टाकला असें 'केसरींत' वाचून मोठा विस्मय वाटला. सुधारणे विषयी बोलतांना बृहस्पति पण कृतीनें सुधारणेचे हितशत्रु! सुधारणेच्या किल्याला तेलंगा सारखे भुईनळे व सुरंग लागल्या नंतर तो केव्हां जमीनदोस्त होईल न कळे!

## हरास.

खालीं सही करणार या जाहिरातीनें सर्वत्रास जाहीर करतो कीं, अकोला ताजनापेठेंत शिवबकस रामचंद्र मारवाडी तर्फे मुखत्यार वहिवाटदार लक्ष्मी नारायण हरी बक्स ब्राह्मण याच्या मालकीची ताब्यांतील दुकानें ३ तीन. कागजी लोकांच्या मशीदी जवळचे कवेलूचीं, एका एका आड्याचीं, एकमेकांस लागून आहेत. त्यांची चतुःसीमा पूर्वेस सरकारी सडक व पुढें मशीदीचें दुकान. पश्चिमेस पडीत जागा आहे. दक्षिणेस दयादखा याचे हराशींत घतलेलें दुकान. उत्तरेस जिवनखा व मोतीसा याचें दुकान. यांतील जागा पूर्व पश्चिम लांब फूट २० वीस दक्षिण उत्तर रुंद फुट ३५ सुमारें सदरील उभीं असलेली दुकानें त्याची किंमत ८०० आठशे आहे. सदरहू दुकानें ता० २० माहे फेब्रुवारी रोजसोमवार दिवशीं दिवसाचे चार वाजतां आह्मी हरास करणार आहो. तर ज्यास घेण्याची जरूर असेल त्यानीं मेहेरबानीं करून त्यावेळीं यावें व हरास घ्यावे. जो जास्त रुपयास हरास मागेल त्यानें हरासाचे किंमतीचा एक चतुर्थांश रुपये त्यावेळीं रोख द्यावे ह्मणजे त्याचे नांवानीं हरास कायम होईल. व बाकीचे राहिलेले रुपये तीन चतुर्थांश पंधरा दिवसांचे आंत आमचे पासून खरेदीखत करून घेऊन रजिष्टर करून घ्यावें व रुपये तीन चतुर्थांश राहिलेले रजिष्टर कामगारा समोर द्यावेत. रजिष्टर वगैरेचा सर्व खर्च घेणारावर आहे. सदरी लिहिले प्रमाणें हरास घेऊन मुदतींत रुपये न दिल्यास हरासाचे वेळीं दिलेले एक चतुर्थांश रुपये परत मिळणार नाहींत. व सदरहू हरासाचे दुकानावर कोणच्याही प्रकारचा हक्क राहणार नाहीं. ह्मणून दिली जाहिरात. कळावे तारीख १० माहे फेब्रुवारी सन १८९३ इ.

( सही मारवाडीत )
रामचंद्र शिवबकस
राहणार शेरी माळेगांव
दस्तुर खुद्द.

☞ पुरवणी पहा.

हैद्राबादचे निजाम यांनीं आपल्या नोकरांच्या पगारांत व संख्येंत खूपच काटाकाटी चालविली आहे. दरबारचा एकंदर खर्च ९ लाख रुपये आहे, त्यांत दोन लाख रुपये कमी करावयाचे आहेत. खुद्द दिवाण सर अस्मानजहा यांचा पगार आजपर्यंत दरमहा १५,००० हजार होता तो आतां १२,००० केला व त्यांची तैनात अजी बंद केली. चार नायब दिवाणांपैकीं एक नायब दिवाणाची जागा कमी केली आणि बाकीच्या तिघांचा पगार प्रत्येकी २५०० रुपये ठरविला. दरबारचे ३ सेक्रेटरी, १७ अंडर सेक्रेटरी आणि १२ सर कारकून व डायरेक्टर जनरल आफ माइन्स इतक्या जागा अजीबाद बंद केल्या. तसेंच मुख्य दिवाणाचा अधिकार कमी केला. आणि खात्याखात्यांत दिवाणांना नियमीत अधिकार दिले. इतकें सर्व कशा करितां? तर देशांत जिकडे तिकडे जीवित आणि वित्त सुरक्षित करून राज्यकारभार व्यवस्थित करण्या करितां निजाम साहेबांचें हें करणें आमच्या सरकारला पसंत पडत आहे असें दिसतें. मग असली सुधारणा इंग्रजी राज्यांत कां होऊं नये बरें! क.

सरकारनें मंगलोरची छावणी अजी बंद करण्याचा ठराव केला व त्या ठिकाणची फौज बेळगांवास आणण्याचा लष्करी अधिकाऱ्यांचा विचार आहे.

रशियाच्या मध्यएशियांतल्या प्रदेशांतला कापूस जर्मन देशांत येत असून तो जवळच्या वाटेने आणण्याची नवीन तजवीज करण्यांत आली आहे.

निझामाच्या हैद्राबादेस मेधी हसनच्या गोऱ्या बायकोच्या संबंधाचा अब्रु घेतल्याचा जो आत बीभत्स खटला चालू आहे त्यांत निझामांचे हल्लींचे मुख्य प्रधान सर अस्मान जाहा यांची ही कमिशन पुढें जबानी झाली.

सरकारच्या टांकसाळींत जें नाणें पाडलें त्यांत लवकरच फरक होणार आहे व त्यावर इंडया इम्पिट्रिक्स असे लिहिलें जाणार आहे असें सांगतात.

निझामसरकारची राज्यव्यवस्था कौंसलामार्फत सुरू झाली. हें कसें झालें हें समजत नाहीं, पण गव्हरनर जनरल यांणी निझामांस कानमंत्र सांगितल्याचा हा परिणाम आहे असें ह्मणतात. परिणाम कशाचाही असला तरी निझामाची राज्यव्यवस्था म्हैसुरासारखी होईल तर फारच चांगलें होईल.

तरुण शिंदेमहाराज मुंबईच्या नाचरल हिस्टरी सोसायटीचे तहाहयांत मेंबर झाले.

येत्या वर्षी सगळ्या हिंदुस्थानांत पाटबंधाऱ्याच्या कामाकडे पाऊणकोट रुपये खर्च होणार आहेत.

हिंदुस्थानची एक पलटण इजिप्तदेशांत जाऊन दाखलही झाली.

हायकोर्टासारखें एक अपील कोर्ट ब्रह्मदेशाकरतां वेगळे असावें अशी ब्रह्मदेशांतील वकील वगैरेनी ओरड चालविली आहे.

इजिप्त देशांत नवी नवी फौज रवाना होतच आहे.

इजिप्तदेशांतील बखेडा शांत झाला असें ह्मणण्यास अजून जागा नाहीं असें इंग्रजीपत्रें ह्मणतात.

मुंबईसरकारानें एका कंपनीस विजापूरच्या हद्दींत हिरे वगैरे काढण्याची परवानगी दिली असून स्लेटी पाट्या काढण्याचीही दिली.

गोमाळ खिंडीच्या शेजारच्या विघनी प्रांतांतल्या लोकांची हाल चाल बिघरल्या सारखी दिसत असल्यामुळें जाटा येथील फौज तिकडे रवाना झाली आहे.

चिनहिलच्या कामावर जी वेगळाल्या ठिकाणी वेगळाली फौज आहे त्यांच्या करतां बराकी वगैरे बांधण्यासाठीं साडेपांच लाख रुपये खर्च करण्याची हिंदुस्थानसरकारची मंजुरी झाली.

लार्ड राबर्टच्या मिशनाबद्दल काबुलाहून आलेल्या पत्रांत कांहींच लिहिलेलें नाहीं. जें कांहीं सामानसुमान जलालाबादेस रवाना केलें होतें. तें परत काबुलासही नेलें व त्यावरून तूर्त काबुलाहून निघण्याचा अमिराचा इरादा नाहीं असें दिसतें.

कचीन डोंगरावर चिन लोकांशीं इंग्रजी फौजेच्या टोळ्यांची पुन्हा लढाई झाली १५० फौजेच्या एका टोळीने एका तोफेसह हल्ला करून शत्रूचें एक ठाणें घेतलें; त्यांत इंग्रजांचे दोन लोक ठार झाले व ले. मास्तर व दुसरा एक असे घायाळ झाले. क्या. अलनच्या ताब्यांतली दुसरी टोळी कुबजावर चाल करून जात आहे त्या त्यांच्या प्रयाणांत वाटेंत जो सामना झाला त्यांत इंग्रजांचे पांच ठार झाले तरी ले. गार्डन याणें १२० लोकांसह तें कुमजा ठिकाण आपल्या ताब्यांत घेतलें. तिसरी क्या. अटाकिन्सनची २०० लोकांची टोळी तिसऱ्याच वाटेनें चाल करून जात आहे. ठा. अ.

जि. आय. पी. रेल्वेची मुद्दत पुरी होण्याच्या पूर्वींच सरकार ती रेल्वे विकत घेणार आहे असें ह्मणतात.

विलायतेंत नवें छापण्याचें एक यंत्र तयार केलें आहे त्याच्या योगानें ४ तासास २॥ लक्ष प्रति छापून, मोडून चिकटवून व कापून देतां येतात! !

युनायटेड स्टेट्स मध्यें दोन आगबोटी एवढ्या मोठ्या आहेत कीं त्या इंग्लंडच्या २०८ आरमारांच्या बोटीची बरोबरी करूं शकतील.

राक्षसी गुलाबः—व्हिट्बाय येथील नव्या बागेमधें एक गुलाबाचें झाड आहे, याचा विस्तार एवढा मोठा आहे तो ऐकून कोणास खरेंहि वाटणार नाहीं. त्याच्या मधल्या खोडाची उंची १०२ फूट आहे ह्या झाडाच्या डाव्या बाजूचा विस्तार ४८ फूट व उजव्या बाजूचा ५४ फूट आहे. सन१८८१ सालीं २५०० फुलें ह्याच्यावरून काढली होती. ह्याला मार्शालनाल जातीचा गुलाब असें ह्मणतात.

लहोरच्या किल्याच्या उत्तरे कडील बाजूस ३०–३५ स्त्रियांची प्रेतें मिळालीं आहेत. ह्यांस ह्यांचे गळे दाबून मारलें असावें असें त्यांच्या मानेवर पडलेल्या खुणाखाणांनीं समजतें.

बांबूचा व्यापार करणें हल्लीं फायदेशीर आहे. कारण बांबूचा उपयोग युरोपामध्यें भाल्याच्या काठ्या करण्याकडे फार करूं लागले आहेत. सु० प०

धान्याची बंदी— अफगाणिस्थानांतून हिंदुस्थानांत धान्य पाठविण्याची अमिरानें बंदी केली आहे. शु० सू०

हिमालय पर्वतावर थंडीच्या दिवसांत बर्फ पडून त्याचीं तळीचीं तळीं बनतात व तीं उन्हाळ्यांत वितळून गंगा वगैरे नद्यांना महापूर येतात. १८९२ सालीं कानेव नांवाचा गृहस्थ कांहीं मंडळी बरोबर घेऊन हिमालयावर शोध करण्याकरितां गेला होता. त्यानें काराकोरमपर्वतापर्यंत हिस्पार खिंडींतून प्रवास केला. ही खिंड ९० मैल लांब आहे. या खिंडींतून जाण्यास त्यास २७ जून १८९२ ते जुलई १८ तारीखपर्यंत दिवस लागले. त्या ठिकाणीं सभोंवार टेंकड्या असलेलें असें तीनशे चौरस मैल ज्याचें क्षेत्रफळ आहे असें एक बर्फाचें सरोवर आहे. अशाच तऱ्हेचें सरोवर अमेरिकेंत ॲन्डीज पर्वतावर ही आहे.

बटाट्याच्या एका डोळ्याची लागवड चांगली झाल्यास ती पासून दहा वर्षांत १०००००००० बटाटे उत्पन्न होतात.

मग्युई बेटांतील मोतीं काढण्याच्या संबंधानें कांहीं लढा उत्पन्न होऊन हिंदुस्थान सरकार कडे तें प्रकरण गेलें अहे

नायगाराच्या धबधब्याच्या जोरावर कांहीं कारखाने सुरू करण्याचा विचार आहे.

फ्रान्सांत पत्रें पोंचविणाऱ्या खबूतरांची खानेसुमारी होणार आहे.

उटाकामंड व कुन्नूर यांच्या दरम्यान रेल्वे सुरू होणार आहे, त्याची पहाणी झाली.

लंडन शहरांतील दुमजली गाड्यांत विजेचे दिवे आहेत.

आस्ट्रेलियांतून तीस चाळीस हजार पौंडांचें लोणी इंग्लंडांत रवाना झालें आहे. हिंवाळ्यांत इंग्लंडांत लोणी फार मिळत नाहीं ह्मणून बर्फांच्या पेट्यांतून हें लोणी नेलें आहे. काय व्यापार आहे पहा!

ग्रेटब्रिटनमध्यें गेल्या सालीं गव्हाचें उत्पन्न ... शानें कमी झालें म्हणून तिकडे गव्हाला तेजी आली आहे.

नेव्हा नदीवर पूल बांधण्याची मंजुरी मिळाली.

इंग्लंडांत ४०००००००० पौंड साबण दर वर्षास खपतो.

एकंदर जगांत १३००० टिकिटांचे प्रकार आहेत.

इंग्लंडांत तीस चौरस मैल जागा स्मशान भूमीनें व्यापली आहे.

ब्राझिल देशांतील अरण्यवासी, मुंग्याच्या वारुळांत काठीचें एक टोंक घालतात व दुसरें टोंक तोंडांत धरतात. त्या काठीवरून वारुळांतल्या मुंग्या तोंडांत पुष्कळशा आल्या ह्मणजे त्या खाऊन टाकतात.

ऐर्लंडांत एका वर्षांत ५०,००,००० पौन्ड किंमतीची व्हिस्की दारू खपते.

ग्रीनलंडमध्यें सांपडणाऱ्या देवमाशाचें काळीजाचा व्यास एक यार्ड असतो.

फ्रान्सांत ११२ शहरांत टेलिफोननें व्यवहार चालतो.

पारिस शहरांत हल्लीं फार बंडाळी माजली आहे.

ईस्ट कोस्ट रेल्वेचा कृष्णा नदी वरील पूल येत्या महिन्यांत सुरूं होईल.

बंगाल्यांत मिदनापूर जिल्ह्यांत फक्त चार आणे पीक आलें, यामुळें दुष्काळ पडेल अशी भीति आहे.

पंजाबांत "जॅक् वि रिपर" या नांवाची एक रामोशी उठला आहे तो, देखतां देखतां रावळपिंडीस एका बाईचा गळा कापून तिचे दागिनें घेऊन पळाला.

काश्मिरांत सर्व गोष्टींची महागाई झाली आहे. खाण्याचे जिन्नस व इतर किरकोळ जिनसा सहा महिन्या पूर्वींच्यापेक्षां दुप्पट तिप्पट महाग मिळतात. केरोसिन तेलाच्या पेटीला १२ रुपये पडतात, आणि जास्त पडूं लागतील असा अजमास आहे. कर.

डा० वामन गोपाळ यांचा
सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह पासून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचें त्वचेचे रोग तसेंचें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्काळ नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जातंतु याच्या मंद झालेल्य सर्व क्रियाचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून त्रिती ही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा
कलप

हा कलप प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचेकेस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्हि. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY, 13 1893.

The following is the full text of the speech which the Resident delivered at the Town-Hall meeting in reply upon the Address of the Akola Municipality and the District Board:—

"Colonel Mackenzie and Gentlemen. I did not expect to have to answer an address so full of important matter as the one which has just been read and I must reserve any thing like adequate treatment of the principal subjects dealt with for further consideration. You have rightly given a foremost position in the address to the revision of the assessment on the land now proceeding under the immediate supervision of the Director of Land Records and Agriculture. I can not justly lay claim to that intimate knowledge of Berar with which you have been good enough to credit me; but I know enough to be aware of the deep interest which the operations in question arouse in the minds of the inhabitants of a province, the welfare and prosperity of which is almost entirely dependent upon agriculture. And though I must for the present absolutely reserve my opinion as to the extent to which the existing assesment is susceptible of revision. I am able to say that the aim and object of the Local Administration is to deal with the land justly and fairly. And in order to ascertain what the facts really are I am quite willing—and I am sure that I can speak with equal confidence about the view of your Commissioner and the officers who assist him—to accept the suggestion in the address to take the people of the land into our confidence and to afford them a full opportunity of examining and criticising the Director's propesals. The first instalment of these proposals relating to that portion of the Malkapoor Talook the Settlement of which has expired is I believe, now with the Commissioner and Colonel Mackenzie is about to take steps to obtain a full expression of instructed unofficial opinion upon it.

The question of free grazing touched upon in the next para of the address is one which must certainly be dealt with in the course of the present revision. You are aware that my distinguished predecessor Sir Dennis Fitzpatric examined this question together with the cognate one of the total supply of grazing and fodder available for cattle in Berar and I have recently had before me the results of some of the inquiries instituted under his orders. The question is so largely one of detail that I cannot attempt to deal with it here but the following figures are suggestive;—

I find that in round figures the Provincial grazing lands what are known as C. Forest Division I measure 645000 acres; the free grazing lands 358000 acres; the Rumnahs for the supply of long grass 36000 acres. and the private grazing land 1024000 acres.

The foregoing figures take no account of the Melghat Taluka which provides valuable grazing ground for the District of Ellichpur and for part of Akola and Amraoti, nor of the A Forests in which under certain circumstances grazing is permissible, nor of the large store of food supplied from Kurbi. What this supply amounts to may be gathered from the fact that 33 percent of the cultivated land is cropped with Jowari. It seems to me that the foregoing figures indicate that the provision of food for cattle in Berar is not inadequate and that as regards free-grazing lands a more real cause of complaint is the inequality of their distribution. What remedy should be applied to this state of things is a question which I have recently remitted to the Commissioner and the Settlement and District officers for consideration.

I can only touch very briefly on the other matters mentioned in the address. I quite agree that it is not advisable to overburden the District Boards in the days of their infancy with too heavy responsibilities. I know very well that in this district in particular the District Board has made praiseworthy endeavours to carry out the work intrusted to it and I do not think that I need do more than advise you to have recourse in your difficulties to the Deputy Commissioner from whom I am sure you will obtain able and sympathetic guidance.

With regard to the practice in connection with the sale of cotton which you say has been abolished in Akola I am inclined to think that this is not a matter in which the executive authorities can wisely intervene. I suspect that the buyers and sellers know their own business better than we do and I should prefer to let them settle their difficulties between themselves.

Turning next to the new Judicial scheme I am of opinion that it has not yet been long enough in operation to justify any certain conclusion as to the points in which it is defective and as to the remedies that ought to be applied. All that I can say at present is that the working of the scheme is being watched by the responsible officers.

On the question whether Berar really requires two High schools I have an open mind and with a Director of Public Instructions so thoroughly acquainted with and so deeply interested in, the educational requirements of Berar as Rao Bahadur Shriram Bhicaji Jathar there is no likelihood of any decision being arrived at really adverse to the interests of the Province(loud cheers.)The main question is not so much whether one or two High Schools are wanted as whether the time has not arrived when Government might withdraw its agency from one or other of these schools in favour of private enterprise. If one High-School were taken over as a private institution it would have the effect of putting the other High School very much on its mettle and the managers might also see their way to introducing a course of study more specially adapted to the needs of the advanced classes in Berar than is perhaps possible in a Government school in which the instruction given must conform to the requirements of the people as a whole.

On the question of the admission of Natives to higher employment in this province the statement that the claims of the people of Berar have been overlooked, does not, I think, fairly represent the facts. It is true that Berar has not been brought within the scope of the scheme of Provincial service partly because the circumstances under which the British Government administers the Hyderabad Assigned Districts are of a special character and party because the province is too small to admit of the due application to it of the scheme in question. But as regards the actual employment of Natives in the higher ranks of the service it seems to me that considering the size of the province and the comparative fewness of higher appointments Natives have received a large measure of encouragement in Berar. A reference to the Civil List will show that 7 of the 15 Assistant Commissioners are Natives, on three occasions a Native Assistant Commissioner has acted as Deputy Commissioner and we are constantly being asked by other administrations for the loan of our officers. Although therefore it has been decided not to introduce the Provincial Service Scheme into Berar you may rest assured that the due claims of Natives will not suffer in consequence.

You have been good enough to preface your address with some observations indicative of your cordial feelings towards myself and to offer me your kindly congratulations. I reciprocate your friendly sentiments and I thank you heartily for your good wishes. No one knows better than I how deeply I am indebted to the loyal support and assistance which I have been fortunate enough to receive from all classes, private and official, during the whole period of my connection with H. A. D."

## वऱ्हाड

आलिशान रेसिडेन्ट मि. टी. सी. प्लौडन यांची स्वारी गेल्या सोमवारीं रात्रीं येथें दाखल झाली. बुधवारीं त्यांच्या सन्मानार्थ येथील टौनहालांत म्युनसिपालिटी व जिल्हा बोर्ड यांनीं टोलेजंग पानसुपारी दिली. बाहेर गांवचे थोरथोर गृहस्थ बरेच जमले असून पश्चिम वऱ्हाडांतील युरोपियन सरदारही आले होते.

आलिशान रेसिडेन्ट साहेब गुरुवार रोजीं दिवसाच्या गाडीनें उमरावतीस रवाना झाले. बरोबर कर्नल मेकंझी साहेब फिरत आहेत. रेसिडेन्ट साहेब उमरावती, इलिचपूर वगैरे कडे जाऊन नंतर ता० १७ स परत मुंबईस जाऊन पुढें हैद्राबादेस जाणार आहेत.

आलिशान रेसिडेंट साहेबांस उमरावतीस गेल्या शुक्रवारीं म्युनसिपालिटी, जिल्हाबोर्ड व सार्वजनिक सभा या तीन संस्थाकडून मानपत्रें देण्यांत आलीं आणि त्यांवर त्यांनीं एकच समग्र उत्तर दिलें.

मि. शापूरजी वीरजी आफि० एक्स्ट्रा असि० कमिशनर वर्ग ५ यांस वाशिमाहून आकोल्यास बदललें.

रा. रा. विष्णू हरि तहशिलदार मलकापूर यांस माजिस्टेट वर्ग २ चे अधिकार फटक्याची शिक्षा देण्या संबधानें मिळाले.

वऱ्हाड प्रांताला 'बाम्बे बायलर इनस्पेक्शन आक्ट १८९१' हा लागूं केल्या विषयीं गेल्या इंडिया गाझीटांत हुकूम आहे.

रा. रा. त्रिम्बक गणेश तहशिलदार मूर्तिजापूर व रा. रा. नारायणसिंग तहशिलदार मोर्शी यांस तहशिलदाराचे मुलकी अधिकार संपूर्ण मिळाले.

आह्मास कळविण्यास दुःख वाटतें कीं रा. ब. गोविंदराव यशवंतराव राजुरकर पेनशनर–तहशिल्दार यांस गेल्या ५ वे तारखेस देवाज्ञा झाली. हे गृहस्थ थोर घराण्यातील व जुन्या खानदानींतले असून बहूत लोकप्रिय होते. त्यांच्या मागें त्यांचे बंधु व आप्त आपल्या घराण्याचा लौकिक राखतील असें आह्मी इच्छितों.

रा. रा. गंगाधर नारायण घाटे बी. ए. हे येथील हायस्कुलांतील आपल्या जागेवर रुजू होणार आहेत ह्मणून रा. रा. महादेव काशिनाथ ओक यांची बदली उमरावती हायस्कुलांत झाली.

रा. रा. बळवंत यादव खोलकुटे बी. ए. यांची उमरावती हायस्कुलांतून ज्युडिशिअल कमिशनर कचेरीत ६० रुपयावर सध्यां आक्टिंग बदली झाली आहे

## अकोला बाजार भाव

हुंडी मुंबईची दर्शनी.... .... .... ९९|||≡

" १५ दिवसांच्या मुदतीची.... ९९||≡

सुवण २६.... .... रुपें...१०८||

मीठ....३|||=.... आळशी मापी ११६||

नवस वजनी ११५ .... चणे ....६०

गहूं काठे....७२||..........बनशी ....८०

बाजरी....६० .... तूर २|||

उडीद....३८=.... .... मुग....२||=

जवारी५५--५८..........सर्की....६|=

तूप....९|| ... ..........तेल६८=

कापूस....५२–५५..........रुई ६७–८०

सट्याचे भाव ( इंग्रजी. )

गहू वशाख शुद्ध १९४९ ....... ६६|||

आळशी चैत्र "......."....... ९८||

रुई फाल्गुन........"....... ६२

सर्की वैशाख नवे सालची"..........५।

जवारी.... वसंत......."........... ४६||

## वर्तमानसार.

रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांच्या अध्यक्षते खाली काल संध्याकाळीं मि. पाल साहेबांच्या सिव्हील सरव्हीस परीक्षे विषयीं सूचने संबधानें पार्लमेंट सभेस अर्ज धाडण्या साठीं एक नंगी जाहीर सभा भरली होती.

---

वाशिम तारीख २४।७।९३.

पाऊस न पडल्यामुळें लोक चिंताक्रांत आहेत. बाजारभाव तेजीवर आहेत. सरासरी १४।१९ इंच पाऊस झाला.

रा. रा. गणेश गोपाळ दहिगांवकर क्लार्क आफ कोर्ट यांनीं प्रकृति नादुरुस्त असल्यामुळें तीन (अगर सहा) महिन्यांची रजा घेतली आहे. या रजेंत डेपुटी क्लार्क रा. रा. शिवराम कावळे यांस त्यांची हुषारी व वाकबगारा पाहून आक्टिंग बढतीवर नेमलें तर लोकांस मोठा आनंद होईल.

पुरुदचे तहशिलदार रा. रा. गणेश गोविंद हे आपले कामाचा चार्ज नायब तहशिलदार रा. रा. नारायणजी शिंदे यांस देऊन चिखलीस गेले. पावसाळ्यांत बदली झाली ह्मणजे बदलेल्या आफिसरांस किती त्रास, हाल व यातायाती काढाव्या लागतात याची वरिष्टास काय कल्पन! राजश्री गणेशपंत वर्तनानें चोख, व कामांत कलमबहादर खरे पण त्यांचा गावांतील लोकांशीं बराच लढा पडला होता. त्यांचा सरळपणा बाधक ह्मणा किंवा त्यांस सामोपचारानें लोकांस आपलेसें करणें ठाऊक नाहीं ह्मणा, बदलीच्या ठिकाणीं मागील अनुभावानें मनुष्य निवळतो त्या प्रमाणें हे चिखलीस लोकप्रिय होवोत असें आह्मीं इच्छितों.

खामगांवचे पोस्ट मास्तर रा. रा. वासुदेराव यांची बदली इंगोलीस झाल्यावरून ते मार्गांत येथें मित्रमंडळी साठीं उतरले आहेत. येथील असिस्टंट इंजिनिअर मि. चतरजी याची बदली बुलढाण्यास झाली ह्मणून लोक नाखूष आहेत. यांच्या महिना भराच्या वास्तव्यातच हे गृहस्थ आपल्या धार्मिक वृत्तीनें व प्रेमळ वागणुकीनें सर्वांस अत्यंत प्रिय झाले आहेत.

मोहरमच्या मजलसी चालूं दिल्या आहेत पण आषाढ मासच्या दिंड्या काढणारांस रिसोडाहून वाशिमापर्यंत कां वृथा हिसका दिला! राम जाणें आणि खुदा पछाने.

——:0:——

नोटीस.

यशवंता वल्लद महादाजी जात कोळी राहणार पिंपळोद तालूके दर्यापूर यांसः—

खाली सही करणार कळवितो कीं तुह्मी आमचे जावाई असून मी आपली कन्या नामे वाळंबी ही तुह्मास लग्न करून दिली त्यांस १६ वर्षे झालीं अलिकडे दोन वर्षांपासून तुह्मी तिला वागवित नाहीं. तुह्मीं दुसरी बायको तिन वर्षांपासून केली आहे करितां या नोटीसीनें कळविलें जातें कीं ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत आपली बायको वाळंबीबाई इच्या अन्न वस्त्राची बंदोबस्त करावा अगर जाती धर्मा प्रमाणें तिची फारकत करून द्यावी ह्मणजे तिला दुसरा घरठाव करण्याची तजविज केली जाईल. या प्रमाणें मुदतींत कोणतीच गोष्ट कबूल करणार नाहीं तर जाती धर्माप्रमाणें गंधर्व करण्याची तजविज जातीचे पंचानूमते केली जाईल त्यात तुमची हरकत चालणार नाहीं कळावे ता० २७।७।९३.

सही.

बहिराजी वा। योगाजी राहणार पिंपळ खूर्द ता० दर्यापूर.

---

नोटीस

रा. धोंडु वल्लद गोविंदा सोंडकर वस्ती कसबे जळगांव जिल्हे अकोले यांस खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमची जमीन आह्मी संमत १९४४ सालांत २००० दोन हजार रुपयांत दर साल प्रमाणें १०० तुह्मास देण्याचा ठराव करून खरेदी घेतली ती.

१ मौजे चावर प्रगणें व तालुके जळगांव जिल्हे अकोलें येथील सरवइ नंबर ९४ एकर १४॥६ आकार रुपये ३१ सालीम.

२ मौजे मडाखेडे खुर्द ता० जळगांव, जिल्हे अकोलें येथील सरवई नंबर २० पैकीं एकर ८॥३ आकार १६॥८ सालीम.

३ मौजे मडाखेडे बुद्रुख प्रगणें व ता० जळगांव जिल्हे अकोलें येथील सरवई नंबर ३१ पैकीं एकर ७॥२२ आकार १९ सालीम.

येणें प्रमाणें जमीन माझा साक्षात बंधु पंढरी हा जिवंत असतांच खरेदी घेतली त्या दिवसांपासून आमचे ताब्यांत आहे. मैत पंढरी याचे हातुन सन १९४४ ते समत १९४८ पर्यंत सालबंद्या पावल्या त्या पांचशें रुपये ९०० तुह्मास पोहचले आहेत साल मजकुरी माझा बंधु पंढरी मरण पावले कारणानें संमत १९४९ चे सालबंदी बद्दल रु० १०० व तुमचे मनांत कपट असल्यामुळें तुम्ही मडाखेडे खुर्द येथील शेताचा सारा रुपये १७॥१२ भरला ते रुपये व सालबंदी बद्दल रुपये असें एकंदर ११७॥१२ तुमचे दुकानीं जळगाव येथें येथें अंबु बाड असलगांवकर व अंबु निळजकर व लक्ष्मण रंगारी जळगांवकर याचे समक्ष रुपये घ्या आणि पावती द्या असें ह्मटलें परंतु तुह्मी रुपये घतलें नाहीं व पावती दिली नाहीं आणखी असें ह्मणालि कीं, जमीन मुळींच खरेदी दिली नाहीं भाडेपट्टा करून द्याल तर रुपये घेतो असें ह्मटलेवरून आह्मी ता० २६—७—९३ इ० रोजीं आपले गांवीं परत गेलो करितां तुह्मास नोटीशीनें कळविलें जातें कीं, नोटीस पावले दिवसा पासून एक महिन्याचे आंत मजपासून रुपये घेऊन पावती द्यावी असें न घडल्यास सदरील रकमेबदल मी व्याजाचा जबाबदार नाहीं व पुढें ही ह्याच प्रमाणें व्यवस्था होईल कळावें ता० २७—७—९३ इ०

सही.

तुकाराम वल्लद उकडा लाड राहणार मडाखेड बु॥ ता० जळगांव

निशानी खुद्द

---

नोटीस

बेशर्मी यशवंता वल्लद गंभीरजी राणे राहणार कसनापूर यासी खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मला ता. २२ माहे जुलई सन १८९३ इसवी रोजी शेताबद्दल व घराबदल व मान पानाबदल मृत्युपत्र करून दिले आहे परंतु हे मृत्यु पत्र तुझ्या हातीं पडताच माझ्याशीं बेमान राहून माझी अब्रु वगैरे घेतोस या करितां इस्टेट मजला तुला देण्याची इच्छा नाहीं सबब तुजला जें मृत्युपत्र करून दिलें आहे तें आजपासून रद्द आहे असें समजावें ता. २८।७।९३ इसवी दस्तुर सिताराम.

(सही)

बाजुला वल्लद चंद्रभानजी

निशाणी खुद.

---

## वर्तमानसार.

अद्भूत व प्रासादिक

# मांत्रिक भूषणें.

सोनें, चांदी व तांब्याचीं



ताईत्या आंगठ्या पेट्या

हीं भूषणें धारण केल्यानें भूतपिशाच्चादिकांची बाधा होत नाहीं. रोगांचा उपशम होऊन शरीरास आरोग्य आणि सौख्य होतें. विश्वासानें हीं भूषणें धारण केल्यास श्री सिद्धपुरुषाच्या कृपेनें व्यापारधंद्यांत सरशी होऊन संततिसंपत्तीची प्राप्ती होईल व जीवास सुखशांती होऊन सर्व कामांत यश येईल. हीं भूषणें धारण करणारा मनुष्य (स्त्री, पुरुष, मूल) कोणत्याही जातीचा, कोणत्याही धर्माचा व कोणत्याही सांप्रदायाचा असो. त्याच्यावर ईश्वरी प्रसाद होतो. याचा अनुभव अनेक लोकांना आला आहे व पुष्कळांकडून आह्मांस सार्टीफिकिटें (दाखले) मिळालीं आहेत; त्यांपैकीं कित्येक सार्टिफिकिटें आह्मीं लवकरच छापणार आहों. या भूषणांची किंमत:—

| रुपये | | रुपये | | रुपये | |
|---|---|---|---|---|---|
| सोन्याचे आंगठीस किंमत | २५ | चांदिचे आंगठीस किंमत | १८ | पंचरस आंगठीस किंमत | १ |
| सोन्याचे पेटीस किंमत | ८ | चांदिचे पेटीस किंमत | ८ | तांब्याचे पेटीस किंमत | ४ |
| सोन्याचे ताईतीस किंमत | ८ | चांदिचे ताईतीस किंमत | ८ | तांब्याचे ताईतीस किंमत | |

वरील किंमती शिवाय व्हालूपेबल व बंगीखर्चा बद्दल ६ जास्त पडतील, सहा ... दहा नग जातील. यापैकीं कोणतेंही भूषण धारण करतें वेळीं धुपवून धारण करावें. प्रत्येक ... ार रुपये आणि आमावास्या व शनवार या दिवशीं किंवा अस्पर्श दोष झाला असतां धुपवून ध... ...ाळें ना जावें. रजस्वला आणि बाळंतीणी यांनीं शुचिभूत झाल्यावर सदरील वस्तु धुपवून पुनः धारण...

सदरहू नग अलीबाग येथें सत्यसदन छापखान्यांत एल्. आर. आणि कंपनीकडे ...

प्रत्येक वस्तूवर L. R. & Co. ही खुण असेल. एल्. आर. आणि कंपनी.



## अती स्वस्त!! अती स्वस्त!!

पावणे दोन रुपयांत घर पोंचता

## श्री गुरुचरित्र ग्रंथ

अक्षर ग्रंथाच्या नांवा येवढें मोठें, अध्याय ५३, प्रत्ये... त्यालगतच ग्रंथांतील कथा भागाचा थोडक्यांत सारांश, ... अध्यायाचे आरंभीं चित्र व आद्यंतीं सुंदर रंगाचीं पृष्ठें आहेत. प्रती थोड्या ग्रंथांतील कठीण शब्दांवर टीपा, व मिळतील. व्हाल्यूपेबलनें मागवा. ...सिलक आहेत. लवकर मागवतील त्यांस

रावजी हरी आठवले.

सत्यसदन छापखान्याचे मालक—अलीबाग

SPECIFIC FOR DI-A-BETES.

# मधुमेहावर प्रतिज्ञेचें औषध.

पुष्कळ दिवस शोध करतां करतां या रोगावर रामबाण असें औषध मिळालें. तेव्हां तें रोग्यास देऊन पाहिलें. रोगाचें अगदीं निर्मूळ होतें असा अनुभव आल्यावरून याची प्रसिद्धी करीत आहों. यांत रसायणादिकांचें किंवा विषारी पदार्थांचें बिलकूल मिश्रण नसून हें केवळ वनस्पतीच्या योगानें तयार केलेलें आहे. या औषधानें हटकून गुण येतो.

वैद्यांचीं आणि डाक्टर लोकांचीं औषधें घेऊन कंटाळलेले आणि जिवित्वाविषयीं हताश झालेले रोग्यास आमची अशी विनंती आहे कीं, तुम्ही आमच्या या रामबाण औषधाची एकवार प्रचित पहा. वनस्पतीमध्यें बिघडलेल्या प्रकृतीस दुरुस्त करण्यासारखे अनेक प्रकारचे गुण असतात. या मुळें अमुक रोग अचिकित्स आणि असाध्य आहे असा सर्वसिद्धांत ठरवितां येत नाहीं. या करितां नाउमेद आणि निराश न होतां या औषधाची एक बाटली नेऊन उपयोग करून पहा.

रोग एक वर्षाचे आंतील असल्यास १ महिना औषध घ्यावें लागतें, दोन किंवा तीन वर्षांचा असल्यास दोन महिनें औषध घ्यावें लागतें; याहून कितीही अधीक मुदतीचा असला तर ४ महिनें औषध घेतलें पाहिजे. एकदां प्रकृती साफ बरी झाली म्हणजे पुनः रोगाचा बिलकूल उद्भव होत नाहीं. औषध घेतल्यापासून ८ दिवसांनीं गुण येऊं लागतो.

किंमत—एका बाटलीस ४ रुपये. बंगी व व्हाल्युपेबल बद्दल ८६ आणे जास्त पडतील, एक बाटली एक महिना पुरेल. औषध घेण्याचे माहितीचा कागद बाटली भोंवती गुंडाळलेला असतो.

लक्ष्मण त्रिंबक टिल्लु वैद्य

अलीबाग, सत्यसदन छापखाना.

---

# सद्धर्मदीप.

( मासीक पुस्तक )

यांत पूर्वी प्रमाणेंच वेदांत, सामाजिक व राजकीय विषयांवर निबंध येतात. शिवाय श्रीमद्भगवद्गीता या ग्रंथाचें सुबोध भाषांतर आणि योगशास्त्रा पैकीं हठप्रदीपिका ग्रंथाचेंही स्पष्टार्थासह भाषांतर छापलें जातें. खेरीज मनोरंजनार्थ व्यावहारिक नाटक व सुभाषित वगैरे विषय असतात. पुस्तकाचीं पृष्टें ४० असून वर्गणी वर्षाची ३ रुपये; लायब्रऱ्या, शाळामास्तर व लहान पगाराचे नोकरांस १८८; शाळेंतील विद्यार्थ्यांस १ रुपया आणि माफी विद्यार्थ्यांस (माफी बद्दल हेडमास्तराचा दाखला येईल तर) ८८. टपाल खर्च वर्षाचा ८३ शिवाय पडेल.

☞ या वर्षाचे पहिल्या पासून सर्व अंक मिळतील. व्हाल्यूपेबलने मागविल्यास ८३ जास्त पडतील.

रावजी हरी आठवले.

सत्यसदन छापखान्याचे मालक—अलीबाग.

याजवर हा कर ५०० रुपयांहून अधिक किंवा आठ आण्याहून कमी बसविला जाणार नाहीं.

सदर २– कर बसविण्याचे उत्पन्नांतून खालीं दिलेल्या रकमा वजा केल्या जातील.

( १ ) ह्या नियमाप्रमाणें कर बसविण्यास सर्वांत कमी असें अयोग्य उत्पन्न. रुपये ९९

( २ ) लाईफ इन्सुअरन्स, पेन्शन किंवा प्राव्हीडंटफंड याबद्दल आलिशान रेसिडेंट साहेब जे नियम किंवा अटी ठरवितील त्याला अनुसरून सदर्हू फंडाकडेस भरलेली सर्व रकम ( सदर्हू रकम पुरे उत्पन्नाचे $\frac{1}{6}$ पेक्षां ज्यास्त नसावी. )

( ३ ) इनकम ट्याक्स ( उत्पन्ना वरील सरकारी कर )

सदर ३– दर शेकडा पट्टी बसविण्या जोग्या उत्पन्नाच्या रकमेवर जो एक रुपया बसवावयाचा तो कराचा भग केव्हां अपूर्ण असेल ह्मणजे आठ आण्यापेक्षां कमी असेल त्याबद्दल आठ आणे बसवावे. व तो अंश जर आठ आण्या पेक्षां ज्यास्ती असेल तर एक रुपया बसवावा.

२ म्युनिसीपाल कमिटीनें मुद्दाम नेमलेले सब कमिटी वडून कराची आकारणी केली जाईल व सदर्हू आकारणी म्युनसिपल कमिटीचे मंजुरातीं करितां जनरल कमिटी पुढें ठेवण्यांत येईल.

३ कराच्या आकारणीच्या याद्या या गांवांत प्रसिद्ध ठिकाणीं लाविल्या जातील आणि म्युनिसीपल आफीसांत पाहण्यास मिळतील. कर देणाऱ्या प्रत्येक इसमास कराच्या आकारणीची नोटीस दिली जाईल.

४ सदर्हू आकारणी संबंधी ज्याची तकरार असेल त्यानीं नोटीस पावल्या दिवसा पासून एक महिन्याचे आत लेखी तक्रार केली तर म्यु० कमिटी त्याचा विचार करील. जर एखादा इसम, किंवा दुकानाचा म्यानेजर गैर हजर असेल आणि दुसरा कोणी योग्य एजंट नसेल सबब नोटीस बजवतां येत नहीं तर तकार दाखल करण्याची तारीख सदर्हू इसम परत आले तारीख पासून एक महिना समजली जाईल.

५ आकारणी विरुद्ध आलेल्या तक्रारीवर म्युनिसीपाल कमिटी जो ठराव देईल तो शेवटचा आहे परंतु कमिटीचे चेअरमन साहेब जर परवानगी देतील तर मि. कमिशनर साहेब याजकडेस स्पेशल अपील करितां येईल.

## NOTICE

(UNDER SEC. 44 (2) OF BERAR MUNICIPAL LAW.)

It is hereby published for information that the Akola Municipal Committee have, in their special meeting held on 11th September 1893 adopted the retention of the Townfund tax under sec 41 (1)(b) of Berar M. Law 1886 in lieu of Town fund assessed under Act IV of 1873, and the following rules for the assessment of the same. Those who wish to object to these rules, are requested to submit their objections in writing in the Municipal Office before the expiry of 30 days from the date of the notice.

Dated Akola 14th September 93 } B. M. Sathe Secretary Municipal Committee Akola

Rules

1 The Town fund tax shall, subject to the following provisos, be assessable on every person dwelling or practising any profession or art or carrying on any trade or calling within the limits of the municipality the whole or any part of whose income derived from any source other than agriculture is not less than Rs. 100 per annum at the rate of one per cent on the taxable portion of his estimated income, derived from any source other than agriculture.

Proviso I—Provided that no person or firm shall be assessable to the said tax at a sum exceeding Rs. 500 per annum or less than annas 8.

*Proviso* II—That in the computation of the income to be assessed, there shall be deducted from the full annual income of the assessee.

(*a*) The sum of 99 rupees, the minimum nontaxable income under these rules; and (*b*) subject to any conditions and restrictions which the Resident may prescribe in this behalf, such portion, if any, not exceeding one-sixth of the full annual income as is paid by the assessee in respect of Life insurance, pension, or provident funds and (*c.*) Income tax. (Imperial).

Proviso III—That when one percent on the assessable portion of the income, involves a fractional part of a rupee which is less than 8 annas then 8 annas shall be the amount of the fractional part to be collected and when one per cent on sub portion of the income involves a fractional part of a rupee which is greater than 8 annas, then one rupee shall be collected.

2 The assessment shall be made by a sub-committee specially appointed by the Municipal Committee and shall be submitted for confirmation to a general meeting of the Municipal Committee.

3 The list of assessment shall be cospicuously posted in the Town and shall be open to view at the Municipal Office. Notices of the assessment payable shall be issued to tho tax. each person assessed to the tax

4 Objections to assessment shall be received and considered by the Municipal Committee if presented in writing within one month of the receipt of the notice. Provided that if any person or manager of a firm be absent and unrepresented by duly empowered agent, so that the notice cannot be served, the period for the filing of objections shall be extended to one month from the date of the return of such person or manager or the duly empowered agent of the same.

5 The decision of the Municipal Committee on objections against assessments shall be final except in cases where the Chairman of the Municipal Committee shall grant permission for a special appeal to the Commissioner of the Province.

## नोटीस

मि. महिपतराव राघोजी देशमुख राहणार निंबी तालुके बाळापूर यास खाली सही करणार याजकडून नोटीसनें कळविलें जातें कीं तुह्मांकडे आमचें कर्ज रुपये येणें आहेत त्या बद्दल रिती प्रमाणें कागदपत्र वगैरे आहेत. तुह्मांकडे जे रुपये आमचे आहेत तें आह्मी बहुता वेळा मागितले परंतु तुह्मी देत नाहीं याजकरितां असें कळवितों कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत जितके रुपये तुह्मांकडे येणें आहेत ते सर्व व्याजासुद्धां वसूल वजा जाता आणून देवून ह्या नोटीसीच्या खर्चा सुद्धा सर्व रुपयेचा निकाल करावा असें केलें नाहीं तर रिती प्रमाणें फिर्याद करून अखेर निकाल होई पर्यंत जो खर्च वगैरे होईल तो सर्व भरून घेतले जाईल ह्मणून हा दिल्ही ही नोटीस सही ता. १६ माहे सपटंबर सन १८९३ इसवी.

सही

सही जैयराम अभिमान देशमूख वहिवाटदार दत्तपराव अभिमान देशमूख दस्तूर खुद्द राहणार निंबे ता. बाळापूर.

## नोटीस

रा. रा. व्यंकटेश कान्हेर भेदी राहणार वणी यांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मारुती दिवटाजी पाटील राहणार अंबिकापूर यानें सन १८९३।९४ सालाकरितां ता० अकोले येथील अफूगांजाचा मक्ता २४००० चोवीस हजारास घेतला त्याजबद्दल तुह्मी व आह्मी उभयतां जामीन होऊन एकमेकांचे आपसांत रिती प्रमाणें कागद वगैरे करारनामे करून घेऊन मक्त्याची जामीनकी करून दिली त्या मक्त्याचे बारमहा व त्या प्रमाणें माहे ऑगष्ट सन १८९३ ची एक महिन्याची माहावारी अद्याप पावेतो भरली नाहीं याजकरितां ही नोटीस पावल्या पासून चार दिवसांत रुपये २००० दोन हजार रुपये भरणेसाठीं पाठवून द्यावेत. असें झालें नाहींतर तुह्मांवर रिती प्रमाणें काम चालवून सर्व प्रकारचे नुकसान मक्त्या संबंधी अखेर निकाल होईपर्यंत जें होईल तें व ह्या नोटीसीचा खर्च व कोर्ट खर्च सर्व भरून घेतलें जाईल.

आह्मी आपली जामीनकी रद्द करण्या विषयीं मे० दिपुटी कमिशनर साहेब यांचे हुजूर अर्ज दिला आहे व आपण अर्ज दिल्या तारखे पासून जबाबदार मक्त्या संबंधी नाहीं ह्मणून लिहिलें आहे परंतु मक्ता त्याचा माहे आगष्टची महावारी दोन हजार रुपये २००० व सपटंबर ता०१५ पावेतों १००० एक हजार रुपये व मक्तेदारास नवीन जामीन न मिळाल्यास जर मक्ता फेर लिलाव झाला तर त्यांत जें नुकसान येईल असें सर्व नुकसानीत १००० एक हजार रुपये आमचे वजा जातां बाकी जें नुकसान राहील तें तुह्मास द्यावें लागेल व तुह्मी करारनाम्यांत शर्तही त्याच प्रमाणें लिहून दिली आहे. सदरहू मक्तेदाराकडे राहिलेली माहावारी त्याची जिनगी जप्त व लिलाव करून द्यावी असा मे० दिपुटी कमिशनर साहेब यांनीं हुकूम दिला आहे परंतु वसूल वजा जातां जी रकम केवळ त्याज पासून निघत नाहीं व ती द्यावीच लागते असें झाल्यास सर्व गोष्टी लिहिलेल्या अमलांत आणाव्या लागतील. तुह्मास ज्यास्ती पैशाची जोखीम लागून तुह्मी डुबू नये ह्मणून आह्मी अर्ज जामीनकी रद्द करण्या बद्दल दिला आहे ह्मणून नोटीस दिली सही ता० १४।९।९३

सही

बाबुरावजी सखारामजी देशमुख राहणार लैतांग तर्फे कु० मुखत्यार गोविंद अंताजी चितळे दस्तूर खुद्द.

## NOTICE

The following rules for the regulation and inspection of serais, meat and vegetable markets and burning and burial grounds within the limits of the Akola Municipality having been made under sub-sections (1) (e), 1 (g), and (2) of section 116 of the Berar Municipal Law, 1886, at a special meeting of the Municipal Committee, have been confirmed by the Resident under section 116 (3) of the said Law and are published for general information as required in rule 48 of rules made under the B. M. L. 1886.

Akola, Date 12—9—93. } B. M. Sathe Secretary. A. M. C.

### (1)—Serais.

1. All public serais, under the management of the Municipal Committee, may be used by *bona fide* travellers only.

2. No traveller shall be allowed to reside in a serai for more than 72 hours continuously, except by the express permission of the Chairman or the Vice-Chairman, or in his absence the Conservancy Superintendent or Secretary, who will grant permission on such conditions as he may deem fit to impose, subject to the confirmation and sanction of the Municipal Committee.

3 The Committee reserve power to themselves to temporarily close a serai to the public and divert it to a temporary special use [ *vide* Proceedings No. 24, dated 3rd November 1892 ].

4 Any person found in a public serai suffering from an infectious disease, or miscoducting himself, may be removed theretrom by the Conservancy Inspector, under the orders of the Conservancy Superintendent.

5 Serais under municipal management will be supervised by the Conservancy Superintendent, who will primarily be responsible for their proper sanitation and upkeep and for the due observance of these rules.

6 Any person committing a nuisance, or wilfully damaging municipal property within a serai, shall be liable, on conviction, to the penalty hereinafter prescribed.

### [2]—Meat Markets

1 The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commissioner, from time to time, appoint a place or places to be used as a meat market or meat markets.

2 A meat market may be used for exposing for sale the following articles only:

[a] Animal flesh, intended as human food

(b) Fish—fresh or dried.

Nothing not intended for sale shall be admitted to the market.

3 Sites within a market will be allotted to vendors, within which they must keep their shops: and no chabutra or building shall be erected without the sanction of the Municipal Committee.

4 A meat market may be open daily from 4 o'clock a. m. to 9 o'clock p. m. and shall be closed after the latter hour.

5 Lepers, beggars and any persons who misconduct themselves may be ejected from a meat market by any Municipal officer or servant.

6. Persons committing a nuisance, or wilfully damaging municipal property, within the limits of a market, shall, on conviction, be liable to the penalty hereinafter prescribed.

7. Any article, exposed for sale, pronounced by the Civil Surgeon, Akola, or by the Medical Officer in charge of the Charitable Dispensary, Akola, to be unfit for human consumption, shall be seized, and may, under the direction of a Municipal officer, be destroyed or otherwise disposed of.

8. Meat markets shall be under the management and supervision of the Conservancy Superintendent, who shall be primarily responsible for their maintenance and sanitation, and the due observance within them of these rules.

### (3)—Vegetable Markets.

The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commissioner, appoint a place or places to be used as a vegetable, fruit and flower market or markets.

2. The vegetable market shall be used only for exposing for sale the following articles:—

[a] Vegetables—fresh or dried.
[b] Fruits and roots—fresh or dried.
[c] Plantain and other leaves.
(d) Flowers.

Nothing not intended for sale shall be admitted to the market.

3. Sites within the market will be allotted to vendors, within which they must keep their shops, and no chabutra or building shall be erected without the sanction of the Municipal Committee.

4. A vegetable market may be open daily from 4 o'clock a.m. to 9 o'clock p.m., and shall be closed after the latter hour.

5. Lepers, beggars and any persons who misconduct themselves may be ejected from a vegetable market by any Municipal officer or servant.

6. Persons committing a nuisance, or wilfully damaging municipal property, within the limits of the market, shall, on conviction, be liable to the penalty hereinafter prescribed.

7. Any article exposed for sale pronounced by the Civil Surgeon, Akola, or by the Medical Officer in charge of the Charitable Dispensary Akola, to be unfit for human consumption, shall be seized, and may, under the direction of a Municipal officer, be destroyed, or otherwise disposed of.

8. Vegetable markets shall be under the management and supervision of the Conservancy Superintendent, who shall be primarily responsible for their maintenance and sanitation and the due observance within them of these rules.

### (4)—Burial and Burning Grounds.

1. The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commissioner, from time to time fix sites for public burial and burning grounds.

2. No person shall, save by special permission of the Municipal Committee, bury or burn a human body elsewhere than in ground set apart for such purposes.

3. Every body buried must be completely covered with earth to a depth of not less than six feet, or if burnt, completely reduced to ashes.

4. The erection of a tomb or monument withen the area of a public burning or burying ground is forbidden, save with the permission of the Municipal Committee.

5. Any person committing a nuisance, or damaging municipal property or tombs, or monuments, within the limits of any such ground, shall be liable, on conviction before a Magistrate, to the penalty hereinafter prescribed.

6. The management and supervision of such grounds shall vest in the Conservancy Supreintendent, who shall be primarily responsible for the upkeep and sanition and the enforcement of these rules.

### Penalty

Infringement of any of the foregoing rules relating to serais, meat markets, vegetable markets, and burial and burning grounds shall, on conviction before a Magistrate, make the person convicted liable to a fine extending to Rupees fifty (50).

(By order)
O. V. BOSANQUET,
*Secretary for Berar*

## जाहिरात

( म्युनिसिपाल कायदा कलम ४४
( २ ) प्रमाणें )

हल्लीं १८७३ च्या ४थ्या आक्टान्वयें असलेल्या टाउनफंडकरा ऐवजी १८८६ चा वऱ्हाड म्युनिसिपाल कायदा कलम ४१ ( १ ) ( व ) अन्वयें टाउनफंड कर बसविण्याकरितां आकोलें येथील म्युनिसिपल कमिटीनें तारीख १२ माहे सप्टेंबर सन १८९३ इसवी रोजीं भरलेल्या स्पेशल कमिटींत खालीं दिलेले नियम पास केले आहेत. सदर्हू नियमा बद्दल ज्यांची तक्रार असेल त्यांनीं सदर्हू जाहिरातीचे तारखे पासून ३० दिवसांचे आंत म्युनिसिपल आफिसांत लेखी कैफीअत दाखल करावी. पुढें तक्रार ऐकिली जाणार नाहीं. कळावे.

म्यु. आफिस. ता. १४ माहे सप्टेंबर १८९३ } B. M. Sathe सेक्रेटरी.

## नियम

१ खालीं दिलेलीं कारणें खेरीज करून आकोलें म्युनिसिपालटीचे हद्दींत राहणारा एखादा धंदा, कलेचें काम, उदीम, किंवा उद्योग करणारा प्रत्येक इसम ज्याचें शेतकी खेरीज करून इतर सालिना सर्व किंवा कांहीं उत्पन्न १०० शंभर रुपयांपेक्षां कमी नाहीं. अशा प्रत्येक इसमावर त्याचें शेतकीचें उत्पन्न खेरीज करून इतर ( सालिना ) उत्पन्ना पैकीं हा कर बसविण्यास योग्य अशा उत्पन्नावर शेकडा एक रुपया प्रमाणें हा कर बसविला जाईल.

प्रोव्हीजो १ कोणताही इसम किंवा दुकान

शा नरा
योग्य–अ
रच थोक

साहामाही " ३ " ८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास ................... ४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .......०१

Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..............................1as

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII AKOLA MONDAY 20 FEBRUARY 1893 NO. 8

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २० माहे फेब्रुवारी सन १८९३ अंक ८

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग,मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणे, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें तावडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लवकी पांढरि होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते म्हणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारे टॅानिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायुंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्माच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जेंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हे औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clements.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांना सावधागिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. ‘ क्लेमेंटचें टानिक ’नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—केंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकानें.

F. M. Clements, Inventor Sydeny, Australia.

दृष्टं किमपि जगत्यस्मिन्
निर्दोषं निर्गुणं द्विजा ॥

(६ व्या अंकावरून पुढें चालूं.)

त्यांत कोण कसा असतो; कोण कसा असतो. कधीं भल्याशीं गांठ पडेल. कधीं लफंगे, सोदे अशाशीं गांठ पडणार. कोणी दगा देणार नाहीं. कोणी फसविणार नाहीं. कोणी एखाद्या कत्रांटांत घालणार नाहीं. सर्वच विश्वासूक असतील. सर्वच नीतिमान् असतील असें समजून चालणें म्हणजे फार धाडसाचें आहे. असें समजणें म्हणजे विस्तीर्ण महासागरावर सुकाणूं शिवाय एखादें तारूं ढकलावें व नेहेमी वारा अनुकूळच वाहील व जेव्हां जेव्हां किनाऱ्याला तारूं लागेल तेव्हां तेव्हां एखादें सुंदर बंदर लागेल असें समजणें या सारखेंच होय. सारांश सांगावयाचें एवढेंच कीं ज्यानीं हा रस्ता चालण्यासाठीं कंबर बांधून तयारी केली आहे त्यानां त्या रस्त्यावर लुटारू लोक आहेत, ते दरोडा घालतील, डाका घालतील हें त्यांनां पूर्णपणें समजून दिलें पाहिजे.

कपटाचरण, वंचना हीं सर्वत्रच आहेत. त्यांचीं कारणें काय हें येथें सांगणें म्हणजे मनुपुत्रांच्या ज्या कामना आहेत, ज्या आशा आहेत त्यांच्या नामावळीचा जपच करण्या सारखें होईल. प्रपंचामधें आकांक्षा ही सर्वांना असतेच. मग ती थोडी असो अगर फार असो. ती किती ही न्यायविरुद्ध असो ती आपला पगडा बसविणार. व सद्गुण जो आहे त्याला झुगारून देणार. तसेंच कोणाला कसली ही यत्किंचितही इच्छा नाहीं असा मनुष्य त्रिभुवनांत तरी आढळेल काय? प्रत्येकाचा कांहींना कांहीं तरी मनोरथ असताच. मग तो कितीही अनुपपन्न असो तो आपला अंमल गाजविणार. कधीं सोडावयाचा नाहीं. आणि नीति किंवा साधुता म्हणून जो कांहीं आहे. तिला साफ गुंडाळून बगलेंत मारणार. धनतृष्णा ज्यांना आहे असें या पृथ्वीवर एक दोन कां आहेत! कैक आहेत. पुन्हा ती धनतृष्णा लहान सहान कां असते? अति जबर! धनलोभ म्हणजे कैकांची वृत्ती बनून रहाते. कैकांची उपजीविका निव्वळ द्रव्यलाभावर असते. “पैसा, पैसा ” करीत करीतच कित्येकांनीं राम म्हटलें आहे.

खरोखर पैशाचा ज्यांना हव्यास लागला आहे ते वेळेस काय करतील याचा नियम कांहीं नाहीं. कोणाला कसल्या कचाट्यांत घालतील याचा निर्बंध नाहीं. यांचे इतके घातुक व दुष्ट दुसरे प्राणी कोणी नसतील. सांसर्गिक रोगयुक्त जे प्राणी आहेत ते हेच. सांसर्गिक रोगाचें जाळें पसरून त्यानीं ठेविलेलें असतें. त्यांत जो सापडेल त्याला अडकविण्याचें यांचें व्रत असतें. लोकानीं त्यांचा कितीही पाण उतारा केला, छी, तूं, केली, फजिती केली तरी ते बिनघोर रहातात. आज एकाला लुबाडून लुबाडून त्याला एकदां लक्ष्मीची जी थोरली बहिण तिच्या ओटींत घातलें म्हणजे त्यांनीं दुसऱ्याला घरलाच म्हणून समजावें. असा त्यांचा नित्यक्रम चाललेला असतो.

वर जे धनलोभी सांगितले ते पहिल्या दर्जाचे लोक होत. पहिल्या दर्जाचे म्हणजे दुष्टपणामधें! यांच्या खालोखाल कांहीं लोक असतात यांना स्वतां कांहींच करण्याची ताकद नसते. परंतु एखाद्याचा दिवसेंदिवस जर उत्कर्ष होत असला तर तो त्यानां पाहवत नाहीं त्यांच्या कपाळास सतरा आठ्या पडतात प्रत्यक्ष भावा भावामध्यें–सावत्र नव्हे सारख्या भावांमध्यें–ह्या असल्या गोष्टी दिसून येतात. एखादा भाऊ जर हुशार असला, लोकां मधें त्याचा मोठ गौरव होत असला, किंवा तो एखाद्या मोठ्या हुद्यावर असला तर या दुसऱ्या भावाला तें खपत नाहीं, त्याच्यानें तें सहन करवत नाहीं. माझ्या सारखा हा केव्हां होईल हा त्याची उत्कटेच्छा असते असला प्रकार घरांत होतो. तो किती घातुक आहे. घरामध्यें जर असें चालतें तर मग जनांमधें होते यांत नवल तें कोणतें? समाजामध्यें तर अनेक स्वभावाचे लोक असणार. सारांश समाजामध्यें अशी कांहीं मंडळी असते कीं त्यानां एखाद्याचा उत्कर्ष, एखाद्याची संपत्ती वाढत असल्यास ह्या गोष्टी बिलकुल पाहवत नाहींत आणि म्हणून त्यांचा छीतू करण्या साठीं, त्यांचा पाणउतारा होण्या साठी त्यांची आंतून—स्वतां जरी नाहीं तरी–दुसऱ्या कडून खटपट चाललेली असते.

आतां दुसरे असे पुष्कळ लोक असतात कीं ते दुष्टपणाच्या इतक्या पायरीला येऊन पोंचले नसतात. ते अजून धूळपाटीवरच असतात. परंतु त्यांच्याशी विशेष सलगी ठेवतां कामा नये, त्याचपाशीं प्रेमभावानें वागतां कामा नये, त्यांच्याशीं विशेषें दळणवळण ठेवणें उपयोगी नाहीं.

स्वार्थापुढें ज्याला दुसरें तिसरें कांहीं दिसत नाहीं, त्याच्याशीं नुसती संगत करणें-म्हणजे आपल्या सुखाचें मातेरें झालेंच समजा. मग जे अगदी स्वार्थाचे बंदे गुलाम झालेले आहेत, कांहीं हीं होवो, कसलाही प्रसंग येवो परंतु दुसऱ्याचें वाईट होईल तितकें करण्याचा ज्यांनीं विडाच उचलेला आहे, साप एक वेळ बरा परंतुत्याच्या पेक्षां हा कुटिल व दात धरणारी अशी ज्यांची वृत्ति व म्हणून जे अतिभयंकर आहेत, पोकळ गर्वानें फुगलेले व म्हणून आपल्या दुष्ट कृत्यांस मोडा घालणारे जे कोणी असतील ते आपले अगदीं प्रतिस्पर्धी व शत्रु व म्हणून त्यानां पाण्यांत पाहणारे, तिखटमीठ लावून बोलणारे व त्या योगानें आपल्या भोवतीं बरेंच मित्र मंडळ जमविणारे व आपल्यावर त्यांचा पुर्ण विश्वास एकदा बसला म्हणजे मग आपल्या कार्यसिद्धीसाठीं त्यांचीं जीं रहस्यें तीं विश्वास घातानें बाहेर फोडणारे, व आपल्या हातून हा अपराध झाला तो लपविण्या साठीं “काय करावें चुकून तोंडांतून गोष्ट निघून गेली “ म्हणून बतावणी करणारे एकदां याचा गळा कापला म्हणजे दुसरा, त्याचा कापल्यावर तिसरा असा ज्यांना नित्यक्रम, व कांहीं तरी बहाणा करून आपल्या अति चांडाल, अति निंद्य, विश्वासघातकी पापमय, अघोर अशा कपटकर्मजालावर पांघरूण घालणारे–अशा नराधमाशीं, नरकच रहाण्यास ज्यांना योग्य–अशाशी व्यवहार करणें म्हणजे फारच धोक्याचें व भयाचें

आहे. सारांश व्यवहारांत वागतांना जे जे एकेक दुष्टपणाचे मासले उडतात त्यांतील प्रत्येकाचें जर येथें तपशीलवार वर्णन करूं ह्मटलें तर पानेंच्या पानें पुरणार नाहींत परंतु ज्या मनुष्यानें दुष्ट लोकांच्या मायावी, वेवक, भुलथापा देणारीं भाषणें ऐकून त्यांच्या जाळ्यांत न सांपडतां आपणास पार पाडून नेलें त्यानें मिळविली. कारण.हे दुष्ट लोक ह्मणजे दुरून साजरे दिसणाऱ्या डोंगराप्रमाणें आहेत. ह्मणून ज्याला व्यवहारांतला मुळींच अनुभव नाहीं त्यानें वरील सिद्ध पुरुषांचें जें वचन आहे "जेथें तेथें दुष्टपणा आहे" तें चांगलें लक्षांत बागवून पुढें चालावें ह्मणजे त्याचा हरहमेश निभाव लागेल.

---

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध ४ शके १८१४

---

श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांनीं आपल्या राज्यांत शाळा खात्याचा बिस्तार फार केला आणि त्या योगें प्रजाजन विद्यामृतानें सुशिक्षित, व्यवहारदक्ष, नीतिसंपन्न व बहुसाळ कार्यकर्ता असा बनत चालला आहे ही अभिनंदनीय गोष्ट पाहून संतोष व अभिमान वाटल्या वाचून राहणार नाहीं..विद्या ज्या स्थळीं नांदतात तेथें सुखसंपत्ता व सुधारणा पाणी भरतात आणि आणि तीच सुस्थिति गायकवाडशाईला येत चालली आहे पाहून परम आल्हादकारक गोष्ट नेटिवांस दुसरी विरळा आढळेल. राजा लोककल्याणकारी, सत्यप्रतिज्ञ व गुणग्राही असावा तसा बडोदे संस्थानाच्या प्रजेला लाभला आहे आणि त्यामुळें ते संस्थान कांहीं कालें करून इंग्रसरकारास राज्यनिष्ठे मुळें अत्यंत प्रियकर, लोकांच्या उन्नतीमुळें उद्यम व व्यापार यांचें वास्तव्यस्थान आणि वैभव व लक्ष्मी यांचें माहेरघर होईल अशी आम्ही उत्कट इच्छा धरितों.

बडोदे शहरीं गेल्या पहिल्या तारखेस मुलामुलींच्या शाळेंत वार्षिक बक्षीस समारंभ झाला. हा समारंभ फार वर्णनीय झाला. खुद महाराज व महाराण्या व इतर थोर गृहस्थ व स्त्रिया पुष्कळ जमल्या होत्या. बडोदे संस्थानेथ डायरेक्टर रा. रा. हरगोविंददास द्वारकादास यांनीं शाळाखात्याचा इतिहास ह्या समयीं वाचून दाखविला आणि त्या वरून केवढा भगिरथ प्रयत्न प्रजेला विद्यामृत पाजण्या साठीं श्रीमंत महाराजांनीं आरंभिला आहे.त्याची कल्पना होईल. गायकवाडांच्या राज्यांत १८७१ सालीं विद्याखातें संस्थापित झालें. गेल्या बावीस वर्षांमध्यें पूर्वस्थितीशी जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे. १८७५ त ७० शाळा व १००० विद्यार्थी होते त्या ऐवजीं १८९२ सालीं १०८६ शाळा व ७१७९६ विद्यार्थी होते. अलिकडील चार पांच वर्षांत बहुतेक सुधारणा व नव्या व्यवस्था झाल्या आहेत. हल्लीचे महाराज गादीवर बसल्या पासूनच शाळांची संख्या सहापट वाढली व विद्यार्थ्यांची चौपट झाली आहे. ही गोष्ट देशी भाषेंतील शिक्षणा संबंधानें होय खेड्यापाड्यांतून शाळा स्थापण्याची नवी योजना सर्वोत्कृष्ठपणें फलद्रूप झाली आहे आणि ही पद्धत इंग्रजी अमलाखालीं चालू होईल तर फार बरें. आणि डायरेक्टर साहेबांनीं कळविलें कीं शिक्षण देशी भाषांतूनच अत्यंत सुलभ व सत्वर असें मिळतें. शास्त्रोय तत्वावर गायनवादनही शिकविलें जातें. तसेंच मुलांच्या व मुलींच्या शारीरिक शिक्षणाच्या व नीतीच्या शिक्षणाच्या संबंधानें विशेष काळजी घेतली जाते. यांत्रिक ज्ञान करून देण्या साठीं धंदे शिक्षणाचा प्रसार होत आहे.

स्त्री शिक्षणाची अभिवृद्धी उत्तरोत्तर होत आहे. आजमितीला ४९ कन्याशाळा आणि ५६९० विद्यार्थिणी शिकत आहेत. स्त्रीशिक्षणाचा विस्तार व्हावा म्हणून मुलांच्या शाळांतून ही मुली घेण्याचा परवाना कित्येक शाळांस दिला आहे. उपवर मुलींनीं शाळा सोडूं नयेत ह्मणून दहावे वर्षां नंतर शिकणाऱ्या मुलीस स्कालरशिपा दिल्या जातात. जनान्यांतील ह्मणजे 'भार्या' पदाला पोचलेल्या स्त्रियांस विद्या शिकवावी ह्मणून सूक्ष्म प्रयत्न चालू आहेत कशीदा, वीणकाम पाकशास्त्र, आरोग्यशास्त्र, व संस्कृत हेही विषय कन्याशाळांतून शिकविले जातात. अंत्यजासाठीं शाळागृहें स्वतंत्र असून त्यांच्या ज्ञातीचीं भोजनगृहेंही स्थापिली आहेत. या शिवाय देशीभाषांमधून नवीन ग्रंथसमुदाय महाराज साहेबांच्या उदारपणानें बहुत बहुत वाढत चालला आहे.

इत्यादि गोष्टी सविस्तर कथन झाल्या नंतर श्रीमान सयाजीराव महाराज यांनीं मराठींत संभाषण केलें तेंही फार उत्तम झालें. ते ह्मणाले कीं, शाळेस जाण्या सारख्या शंभर मुलांपैकीं ४० मुलें विद्या शिकतात हें पाहून आह्मी आनंद मानतो. परंतु मुलींचें शेंकडा प्रमाण ४ आहे हें सुमार होय. मुलामुलींना शिक्षण देणें हें कायद्यानें भाग केलें पाहिजे असा विचार प्रगट करिते वेळीं महाराजांनीं आपले उदात्त व संस्कृत विचार मोठ्या पोक्तपणानें दर्शविले. मुलींच्या शिक्षणा बद्दल ते बोलले कीं, मुली शिकल्यानें अधीक वाईट निघतात हा समज खोटा आहे. कांहीं मुली शिकून कुपथगामी निघतात तशा न शिकलेल्या मुलींमध्यें ही कित्येक आढळतील. विद्येवरच सद्गुण अवलंबून नसतात पण विद्येनें मनुष्य अधीक सद्गुणी निघून त्याचा मोठा फायदा होतो. महाराजांनीं सभेंतच डायरेक्टर साहेबांस आज्ञा केली कीं, स्त्रीशिक्षणाच्या मार्गांतील अडथळे हरप्रयत्न करून दूर करावे आणि शिक्षकांचें सदाचरण व नीतीमत्ता यांजविषयीं विशेष दक्षतेची पैरवी ठेवावी. अंत्यजासंबंधानें बोलतांना महाराजांनीं संशय घेतला कीं अत्यंज या संज्ञेचा बोधच बरोबर होत नाहीं. मनुष्य बरा अगर वाईट आहे आपल्या गुणांनींच होतो. अंत्यजांस शिक्षण अत्यंत अवश्यक आहे. श्रीमंती अगर गरिबी या उपाधींचा शिक्षणाशीं कांहीं संबंध नाहीं. सर्वच मुलांवर सारखी समदृष्टी असली पाहिजे आणि शिक्षणाचा लाभ सर्वांस सारखा मिळावा. तरी या सामाजिक गोष्टींत पाऊल मोठ्या बेतावातानें पुढें टाकलें पाहिजे असें सांगतांना महाराजांनीं मोठ्या विनयानें जमलेल्या लोकांस थोर उपदेश केला. सामाजिक विषयांत जी गोष्ट ज्याला नीट वाटते त्यानें ती धैर्यानें करून दाखविली पाहिजे. आपल्या देशांत जातीचे भेदाभेद दूर करण्यास आमचे लोक हिंमतबहाद्दर नाहींत. जी गोष्ट आपणास सरळ व चांगली वाटते ती न करण्या पासून मोठे तोटे होत असतात. आपल्या विचारा प्रमाणें वागण्यास प्रत्येकाचा मानसिक दृढनिश्चय पाहिजे. जातीचा भिन्नपणा व त्यांचे पोटभेद यांनीं आपल्या देशाच्या कल्याणाला अपाय घडला आहे त. सामाजिक प्रकरणांतील अडथळे आपले आपणच दूर केले पाहिजेत. आणि आपण तें केलें ह्मणजे विद्या लोकांस लाभतील व आपलीं मुलें चांगलीं व शहाणीं निघतील. असें आढळेंत कीं, अंत्यजाच्या मुली कन्याशाळांतून शिकणाऱ्या इतर मुलींपेक्षां अधीक आहेत. या गोष्टी पासून वरिष्ठ जातीच्या लोकांनीं धडा शिकावा. लोहार शिंपी वगैरे धंदेवाल्याच्या मुलांनीं शिकलेंच पाहिजे. सर्वांनीं विद्या शिकून ज्ञान वाढवावें. कांकी विद्या शिकल्यानें सर्व मनोरथ पूर्ण होतात.

सारांश बडोदे संस्थानांत विद्याखात्याचें पाऊल पुष्कळ पुढें असून त्याच्या अभिवृद्धीचा कित्ता आमच्या इंग्रजसरकारनेंही गिरविण्यासारखा आहे.

---

नव्या कायदे कौन्सिल आक्टा प्रमाणें तीन गोष्टी आपणास मिळावयाच्या आहेत. कायदे कौंसिलांतील सभासदांची संख्या वाढवून ते सभासद लोकमतानें निवडले जावे ही पहिली सुधारणा होती पण कायद्याच्या शास्त्राचा तथा सुधारणेच्या नियमास बाध आला ह्मणून ते नियम अद्याप अमलांत येऊं शकत नाहींत. दुसरी सुधारणा वार्षिक जमाखर्चाच्या बजेटावर चर्चा करण्या विषयीं कायदे कौंसिलदारास हक्क देणें ही होय. या पूर्वीं फक्त नवा कर बसविण्याच वेळीं बजेटावर वादविवाद करण्यास परवानगी असे ती या नव्या कायद्यानें प्रत्येक बजेटा संबंधानें मिळाली. तिसरा हक्क व्हाइसराय लांसडाऊन यांनीं दिला तो असा कीं, राज्य कारभारांतील माहिती मागण्याचा प्रत्येक सभासदास हक्क आहे. हा हक्क दिला पण त्याला अपवाद, अटी, व मर्यादा फार बिकट घालून ठेविल्या आहेत. प्रश्न विचारावयाचा तो वादविवादाचा किंवा अपमानकारक नसून फक्त माहिती विचारण्या पुरता असावा आह्मी एवढेंच समाधान मानतो कीं, राष्ट्रीय सभेनें हा काळ पर्यंत जी मोठी खटपट केली ती अंशतः तरी सुफल झाली आणि तिच्या मुळें कायदे कौन्सिलांतून अधिकाधिक हितावह फेरफार करण्याविषयीं घाटत आहे.

इंडिया सरकारच्या कायदे कौन्सिलांत या नव्या हक्का प्रमाणें पहिला प्रश्न नामदार राजा उदेप्रतापसिंग सी. एस. आय. यांनीं विचारला आहे. तो फार उपयुक्त व हितकारक आहे. त्याची मातबरी प्रत्येक स्थानिक सरकारनें लक्षांत घेतली पाहिजे.प्रश्न असा कीं सरकारी अमलदारांस शिधासामुग्री, वैरण, दाणापाणी, लांकूडफाटा वगैरे पुरविण्या संबंधानें तहशिलदार मार्फत शेतकरी व दुकानदार यांस किती जांचणी व त्रास होतो याजकडे सरकारचें लक्ष्य पोंचलें आहे काय आणि हा जांच व छळ नाहींसा करण्याचे उपाय योजण्या साठीं चौकशी करणें कायद्याचें होईल कीं नाहीं. आह्मी मोठ्या उत्सुकतेनें पण नम्रतेनें आलिशान रेसिडेन्ट व कमिशनर साहेब यांस याच प्रश्नाचा मुद्दाम वऱ्हाड प्रांतासंबंधानें विचार करण्याविषयीं विनंती करितों. वरील प्रश्नांत ज्या गोष्टी उजेडांत येत आहेत त्या वऱ्हाडांत पदोपदीं लोकांच्या नजरेस दृष्टीस पडतील तेव्हां या प्रांतस्थ प्रजेची दाद लागणें फार आवश्यक आहे.

---

## गैरसमज

( आकोला काटन मार्केट कमिटीच्या बलाबला विषयीं )

रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर एक्स्ट्रा असि० कमिशनर यांच्या अध्यक्षतें खालीं येथील काटन कमिटीनें कापसाच्या व्यापारा संबंधानें नवीन नियम घालून दिले आणि त्यांवर मुनसिपाल कमिटीची मंजुरात मिळून ते अमलांत ही येऊन दोन महिने होऊन गेले. हे नियम करितांना केवढा मोठा प्रयत्न पडला, व्यापारी लोकांनीं दोन दिवस बाजार कसा बंद पाडला, मुनसिपाल कमिटीनें नफ्या नुकसानीची पर्वा न बाळगतां सत्यमार्गानें तेच नियम कसे चालूं केले आणि अखेरीस वितंडवादी व स्वार्थपरायण व्यापारी कसे शरणगत होऊन नवीन नियमा प्रमाणें वागूं लागले हें तेव्हांच आह्मी विदित केलें आहे. काटन मार्केटांत रुई अगर कापूस नेणाऱ्या विक्रीदारांस वजनमापांत, दलालींत, नमुन्याच्या मासल्यांत, व अवान्तर बनावाटींत व्यापारी व त्यांचे साथीदार अडते, मापारी, व पाणीवाले इत्यादिक नेहमीं बुडवितात आणि ही वहिवाट पुष्कळ वर्षांपासून चालत आली आहे. तेव्हां ती वहिवाट अजिबात बंद करावी, न्यायानें विक्रीदारांचा माल विकला जावा आणि त्यायोगें काटन मार्केटाचा लौकिक वाढून व्यापार फैलावला जावा ह्मणून मुनसिपालिटीच्या काटन कमिटीनें सभा भरवून, वादविवाद करवून व सर्वांची खात्री करून नंतर उभयपक्षास हितावह असे नियम अमलांत आणिले.

पण गेल्या ८ वे तारखेस येथील मुनसिपालिटीच्या मानपत्रावर उत्तर देतेवेळीं आलिशान रेसिडेंट साहेब या नियमांच्या संबंधानें जें कांहीं बोललें त्यावरून येथील व्यापारी लोकांत असा चमत्कारिक गैरसमज उद्भवला कीं विक्रीदार व खरेदीदार यांनीं आपले आपण नियम करून त्या प्रमाणें वागावें सरकार त्यांत हात घालणार नाहीं आणि त्या अर्थीं काटन मार्केट कमिटीचे नवे नियम त्यांच्या अधिकारा बाहेरचे असल्या कारणानें व्यापारी लोकांस ते नियम बांधू शकत नाहींत. गैरसमज झाल्या नंतर काटन कमिटीच्या बलाबला विषयीं योग्य शहानिशा न करितां कांहीं व्यापाऱ्यांनीं आपसांत कांहीं ठराव करून नव्या मार्केटच्या नियमा विरुद्ध बेबंदशाही चालूं केली. नियमांस हरताळ लावला व मार्केट कमिटीचा हुकूम तोडला ह्मणून त्या व्यापारी लोकांचा जाबजबाब मुनसिपालिटी घेत आहे. मु०

नसिपालिटी आपला अधिकार सत्वस्थपणें बरोबर बजावील आणि वारंवार ताकिदा देऊन हा नवा बखेडा मोडील अशी आमची पूर्ण खातरी आहे. आणि आतां असें कळतें कीं सर्व व्यापारी केलेल्या चुकी बद्दल पश्चात्ताप पावून पुन्हा नियमा प्रमाणें वागूं लागले.

वर झालेला गैरसमज मानपत्रांतील विनंती व त्या वरील उत्तर एकत्र केलें म्हणजे दूर होण्या सारखा आहे. मानपत्रांत मुनसिपालिटी म्हणते कीं "अकोलें येथील बाजारांत कापूस विक्री संबंधानें जी एक पुष्कळ वर्षांपासून वहिवाट होती ती नुकतीच येथील म्युनिसिपाल कमिटीनें बंद करण्याची व्यवस्था केली आहे. हें आपणास कळविण्यास फार संतोष वाटतो. परंतु जो पर्यंत ही व्यवस्था अगर अशीच दुसरी व्यवस्था इतर ठिकाणीं सुरू होणार नाहीं तों पर्यंत आमचे येथील कपास खरेदीदारास आमच्या कडील व्यवस्थे बद्दल कुरकुर करण्यास जागा राहील जी ही व्यवस्था केली आहे ती विशेषें करून रयतेच्या संरक्षणार्थ आहे"

आणि त्यावर अलिशान रेसिडेंट साहेब म्हणाले कीं 'कापसाच्या सौद्यांतील जी वहिवाट आकोल्यांत मोडली म्हणून आपण म्हणता तिज संबंधानें राज्यकर्त्या सरकारनें हात न घालणें बरें असें मला वाटतें. मी शंका घेतो कीं आपल्या पेक्षां खरेदीदार व विक्रीदार या उभयतांस त्यांचा फायदा चांगला कळतो तेव्हां आपसांतील भानगडी त्यांच्या त्यांनीं भागवाव्या हें मी पसंत करितो'

प्रथमतः विनंती ही कीं आकोल्याचे नियम इतर काटन मार्केटांस लागू करावे आणि त्यावर जबाब असा कीं इतर ठिकाणीं ते नियम लागूं करण्या विषयीं सरकार हात घालीत नाहीं कां कीं इतर ठिकाणचे व्यापारी व विक्रीदार आपपापल्या हिता विषयीं काळजी घेतील. दुसरी गोष्ट, आकोला काटन मार्केट कमिटीनें केलेल्या नियमा विषयीं अलिशान रेसिडेंटांनीं कांहींच अभिप्राय दिला नाहीं आणि ते नियम रद्द करण्या विषयींही ते बोलले नाहींत. आणि तिसरा मुद्दा, नियम यथाशास्त्र, कायद्यास अनुसरून, व अधिकाराला धरून झाले आहेत तेव्हां ते रद्द होई पर्यंत ते मोडण्याचा अधिकार कोणास पोंचत नाहीं. चवथा अपवाद असा कीं अलिशान रेसिडेंट साहेबांच्या म्हणण्या प्रमाणें विक्रीदार व खरेदीदार यास स्वतां संबंधानें हक्क असले तरी ते मार्केटाच्या नियमांला उल्लंघतील असें असतां कामा नये. पांचवी गोष्ट अशी कीं मुनसिपालिटीस हात न घालण्या विषयीं उत्तरांत उपदेश होता असें मानलें तरी उपदेशा पलिकडे आलि० रेसिडेंट यांच्या म्हणण्याचा अर्थ घेणें चुकीचें आहे.

आलिशान रेसिडेंट साहेबांनीं म्हटलें कीं कापसाचे विक्रीदार व खरेदीदार यांनीं आपापल्या हिता विषयी काळजी ठेवावी. हा त्यांचा अभिप्राय तात्विकदृष्ट्या चांगला आहे तरी वऱ्हाडांत विक्रीदार किती कमसमजूत, एकटे दुकटे, आणि गैरवाकब असे असतात आणि व्यापारी किती धूर्त, कटवाले व डोळ्यांत धूळ घालणारे असतात हें मि. प्लोडन साहेबांनीं लक्ष्यांत घेतलें असतें तर त्यांना ये[illegible] मुनसिपालिटीच्या विज्ञप्तीची मातबरी कळून आली असती तरी आकोल्याचें उदाहरण इतर ठिकाणचीं काटन मार्केटें उचलतील आणि काटन मार्केटचा व्यापदरबार आकोल्या प्रमाणें पद्धतशीर, सरळ, व लोकहिताचा करितील अशी आम्ही उमेद बाळगतों.

---

# The Berar Samachar

MONDAY FEBRUARY, 20 1893.

The first and foremost topic of the day is the probable revision of the assessment on land. The question is one of the most vital importance and upon its solution rests mainly the good and welfare of the people. They looked expectantly to the day when Mr. Plowden would come to the province. But pleasures of realization are never so great as those of anticipation. He admitted the deep interest which the operations of the new survey arouse in the minds of the people but he reserved silence in regard to his views upon the question. He did not explain the 'just and fair' way in which the local administration will deal with the land nor did he expound the principles which ought to regulate the measures and proposals that are before the Commissioner. However Mr. Plowden promised us one thing and that is of the greatest value we have had. He bound himself with the Commissioner that no means will be spared to consult the wishes of the people. Such an assurance will never be lost upon the people. They will dispel the anxieties that lie deep in their hearts and will gladly seek to reach the ears of the responsible officers in the administration. If the assurances in the frank speech of the Resident prove true to the word we cherish great hopes that nothing will be hastily done so as to affect the interests of the ryot. What ever follows will receive full, deliberate, and thoughtful consideration of the matter; and it is certainly prudent and wise to express a hope that the "two officers both intimately acquainted with the province that are now in authority at Hydrabad and Amraoti" will deal with the subject in a nice, indulgent and scrupulous manner.

The first instalment of the proposals of the Director of Land Records with respect to the Malkapur Taluka is with the Commissioner and we request Colonel Mackenzie to make these proposals as public as possible and the sooner it is done the better. The Resident has wished him to do it and Colonel Mackenzie will therefore give full effect to his own policy of calling men to criticize the *pros* and *cons* of the proposals before him. He is reported to have a liking for fair and honest criticisim, nay he often courts criticism. With Mr. Plowden and Colonel Mackenzie we shall not be chary in the least for not having a legislative Council for the province but we shall ever remain proud that we are on the eve of being taken into the confidence of the local Government and of thus enjoying the liberties and freedom of the new Councils Act of 1891

Before we are allowed a view of the new proposals about revision of the assessment of land we may first question whether there is any necessity of enhancing the tax on land. If no imperative justification of the enhance ment come forth we shall say that the increased rate of land-rent means an imposition of a new tax that solely falls to the lot of the agriculturists. That will be burdening to the utmost the already overburdened class in the community. Besides the annual revenue of the present day is more than enough for the expenses of the highly paid administration. Every year some fifteen lacs of Rupees are remitted to the treasuries of His Highness the Nizam. The total sum that is left to accumulate to the credit of the Nizam is moreover some 45 lacs of rupees. Under these circumstances we do not think any increase in the land revenue a necessary matter of compulsion and we are therefore puzzled as to why it is that the present assessment is under a revision.

## CORRESPONDENCE

To,
The Editor, Berar Samachar
Dear Sir,

Stringent orders, it appears, were issued last year prohibiting heavy traffic passing on the road lying between the Temple Garden and the Married Men's Quarters at this station; and, if this be true, it is strange to observe that these mandates should be violated in the manner they are at present. The only remedy feasible is to prosecute the parties concerned for disobidience of orders when matters will probably be mitigated to a great extent. It would seem that this road was constructed solely for general traffic, but this surely is not what was intended. Heavy laden carts can with impunity travel on the Akola—Medsi road leading on to the Railway-station and other light vehicles on this particular road. This arrangement will not only prevent this road in question from being cut up, but would save the Municipality the expenses of repairing it so often; besides this would also stop the occupants of adjoining buildings, especially of those residing in the Married Men's Quarters from complaining of the dust that enters their dwellings occasioned by this heavy traffic. It is sincerely hoped that the Deputy Commissioner of this District will kindly move in the matter and take such remedial measures as he may deem proper.

'One Interested'

---

## वऱ्हाड

उद्या मंगळवारीं आकोला मुनसिपालिटीच्या तीन वार्डी साठीं मिळून सात सभासदांची निवडणूक होणार आहे तेव्हां मताधिकारी लोकांनी उमेदवारांची वजनदारी निस्पृहपणा, व विद्वत्ता हीं नीट पाहून व सार्वजनिक कामाचें स्वरूप ध्यानांत घेऊन आपापलीं मतें प्रांजलपणें देण्यास प्रत्येकीं विसरू नये अशी आह्मी विनंती करितों.

रा. रा. उत्तमराव यशवंत नायब तहशीलदार, इलिचपूर यांनीं एक महिन्याची रजा घेतल्या वरून त्यांच्या जागीं रा. रा. नारायण पांडुरंग देशपांडे यांस नेमिलें.

आलिशान रेसिडेंट मि० प्लोडन साहेब हे तारिख १२ रोजी ११ वाजतां इलिचपुरास गेले आणि क्याप्टन वारन हेस्टींग डेपुटी कमिशनर यांच्या बंगल्यावर उतरले. दुसऱ्या दिवशीं १३ तोफांची सलामी झाली. जिल्ह्यांतील शिष्ट संभावित लोकांच्या भेटी प्रत्येकीं मिनिटभरांत घेऊन रा. रा. श्रीकृष्ण नरहर खापर्डे यांच्यापाशीं बराच वेळ बोलले. वकील लोकांच्या डेपुटेशनला आकोल्याच्या मानपत्रा वरील उत्तराचा हवाला दिला. आणि बुधवारीं साहेब परत निघून गेले व गेल्या बद्दल पुन्हा धाड धाड अशा तेरा तोफा प्रातःकाळीं सात वाजतां सुटल्या.

---

## जाहिरात.

अकोलें म्युनिसिपाल हद्दींत राहणारे सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येत आहे कीं, आलिशान रेसिडेन्ट साहेब बाहादूर हैदराबाद यांनीं रेसिडेन्सी आरडर जाहिरात नंबर ३ तारीख १०।१।९३ यांत सन १८८० चा १३ वा आक्ट (देवी काढण्यासंबंधी कायदा) आकोलें मुनसिपल हद्दीस लागूं करण्यांत येईल असें प्रसिद्ध केलें आहे सबब ज्या कोणाची या संबंधी हरकत असेल त्यांनीं सदर्हू नोटीस प्रसिद्ध झाल्या दिवसापासून ६ आठवड्याचे आंत आपली हरकत आलिशान साहेबाकडेस लेखी दाखल करावी. कळावें.

अकोलें म्यु. आफिस ता० १८।२।९३. — Gopal Hari. सेक्रेटरी म्यु. क. आ.

---

### नोटीस.

राघ्या वल्लद पुन्या माहार राहणार गोरेगांव ता० व जि० आकोलें यांसी खाली सही करणार इजकडून कळविण्यांत येतें कीं मी तुमची गंधरवाची बायको असून आज अजमास बारामहिने झाले तुम्ही मला नांदवित नाहीं. दरम्यान हल्ली मला माझ्या जावायानें तुमचे येथें आणून घातलें असतां मी तुमचे जवळ राहाण्यास कबूल असून तुह्मी मला घरांत घेतलें नाहीं यामुळें मी आज बारामहिने झाले सावकाराचे कर्ज काढून जांवायाचे घरीं राहिलें आहे व आतां मला जांवाई पाळीत नाहीं व सावकार हि कर्ज देत नाहीं तर ८ दिवसाचें आत माझें बारामहिन्याचे चोळी लुगडे व पोटगी खर्च वगैरे सुद्धां झालेली रकम ६० रुपये देऊन मला नांदविण्यास घेवून जावे. मी नांदन्यास कबूल आहे तर ८ दिवसाचें आत तह्मी सावकाराचें पैसे देऊन मला नांदविन्यास नेणें. असें जर न झाल्यास मी गंधरवाचा दुसरा नवरा करीन मग मजवर तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं हें आपणास कळावें तारिख १८।२।१८९३ इ.

सही निशानी-बागही सही सारजी मर्द राघ्या माहारिण मुकाम आकोलें इच्या हातची असें.

---

## अकोला बाजारभाव

हुंडी मुंबईची दर्शनी.... .... .... ९९॥।=
" १५ दिवसांच्या मुद्दतीची.... ९९॥
सुवर्ण २६॥=.... .... रुपें ....१०९
मीठ....३॥।~ .... आळशी मापी १२५
जवस वजनी ११५ .... चणे ...६०
गहूं काठे....७२॥..........बनशी....८६।
बाजरी....६० .... तूर २॥=
उडीद....३०=.... .... मूंग ....२॥=
जवारी ५५....५८ ........सर्की....६
तूप....९०= ... ............ तेल६।=
कापूस....५२-६०...........रुई ७४-८०

सट्याचे भाव (इंग्रजी.)

गहू वैशाख शुद्ध १९४९ ....... ६६॥
आळशी चैत्र "......."........ ९९
रुई फाल्गुन............"....... ६४
सर्की वैशाख नवे सालची"...........५।
जवारी.... वसंत........"........... ४६॥

---

## वर्तमानसार.

कायदे कौन्सलांबद्दलच्या नवीन आक्टाप्रमाणें मुंबई सरकारानें जे गव्हरनरजनरलांच्या मंजुरीनें नियम केले आहेत त्यांचा मतलब पुढील प्रमाणें आहे.:—

इलाख्याच्या जमाखर्चाचा तपशील दरसाल कायदेकौंसलापुढें स्पष्ट करून सांगितला जाईल व जमाखर्चाच्या तपशीलाची छापील प्रत प्रत्येक मेंबरास दिली जाईल.

तो तपशील वाचल्यावर त्याबद्दलचें आपलें ह्मणणें कौंसलापुढें ठेवण्याचा प्रत्येक मेम्बरास अधिकार आहे.

नंतर त्यांच्या ह्मणण्यास उत्तर देण्याचा खर्डा पुढें ठेवणाऱ्या मेंबरास अधिकार असून नंतर प्रेसिडेन्ट त्याचा निर्णय करतील.

जमाखर्चाच्या बाबींवर इलाखेसरकारचा ताबा आहे त्यांस मात्र हा वरील नियम लागू आहे, इम्पेरियल बाबींबद्दल बोलण्याची मनाई आहे.

प्रश्न करावयाचे ते टीका करण्यासारखें नसून मुद्यापुरतेंच असावे आणि सर्वांशीं इलाखे सरकारच्या ताब्यांतलीं जीं खातीं असतील त्य पुरतेच असावे.

जे प्रश्न करावयाचे असतील ते सहा दिवसपूर्वी कौंसलाच्या सेक्रेटरीस लेखी कळवावे व ते सूचनेदाखल असावे तकरारीसारखे असू नयेत.

सार्वजानिक हितास प्रतिकूळ असा कोणताही प्रश्न नाकबूल करण्याचा प्रेसिडेन्टास अधिकार आहे व सहा दिवसांची मुदत नसली तरी ही प्रश्न करूं देण्याचा प्रेसिडेन्टास अधिकार आहे. आणि प्रश्न करण्यास प्रेसिडेन्टची मंजुरी मिळेल तेव्हांच तो कामाच्या यादींत दाखल होईल.

प्रश्न मेंबरांनीं वाचावा व त्याचें उत्तर प्रेसिडेन्ट किंवा इंनचार्ज मेंबर देईल.

प्रश्न नाकबूल झाला तरी त्यास उत्तर देवूं देण्याचा प्रेसिडेन्टास अधिकार आहे व जें उत्तर मिळेल त्यावर वादविवाद चालविण्याची मनाई आहे.

प्रश्न व उत्तर हें कामांत दाखल करून ठेवलें जाईल.

कलकत्यापासून मद्रासपर्यंत समुद्रकिनाऱ्यानें एक रेल्वे पाहिजे आहे असें गव्हरनरजनरलांच्या मनांत फार भरलें असून तशी रेलवे करण्याचा विचार चालू झाला आहे.

मथुरा येथें असलेल्या कांहीं फौजेस इजिप्त देशांत जाण्यास तयार असण्याचा हुकूम झाला आहे.

हिंदुस्थानांतली कांहीं फौज अफ्रिकेतल्या कामगिरीवर जाण्याच्या तयारींत आहे.

ब्रह्मदेशांतील बनार्डमो ही लहानशी इंग्रजी छावणी आग लागून बहुत्येक जळून गेली.

हिंदुस्थानसरकारचा येत्या वर्षाचा बजेट छापून त्याच्या छापील प्रती ता. २३ मार्च रोजीं कायदेकौसलाच्या मेंबरांच्या हातांत दिल्या जातील आणि ३० मार्च रोजीं कौंसल भरून त्याचा विचार होईल.

वृत्तप्रसाद छापखान्यांतून छापखान्याचें नांव घातल्या वाचून कांहीं हांडबिलें छापून प्रसिद्ध करण्यांत आल्यावरून छापखान्याच्या मालकास २५ रुपये दंड झाला.

रशियाच्या मध्यरशियाच्या राज्यांत व्यापार करणारी एक रशियन व्यापारी मंडळी स्थापन झाली असून तिला रशियन सरकारचा चांगला आश्रय मिळाला आहे व त्यामुळें पर्शियाच्या राज्यांत रशियाचा व्यापार फार झपाट्यानें वाढत आहे.

अतिवृष्टीनें बोलन रेल्वे कित्येक ठिकाणीं वाहून गेल्यामुळें गाड्या जाण्याची बंदी झाली आहे.

चीनच्या राज्यांत लोखंडाच्या खाणी सुरू करण्याचें काम एक जर्मन व्यापारी सुरू करणार आहे. ठा० अ०

तुळशीचा चहा करण्याची कृति— सर्व प्रकारच्या प्रकृतीस मानवेल अशा रीतीचा हा चहा आहे. अद्मासें पावशेर पाण्यांत १५ किंवा २० तुळशीचीं पानें व त्या बेतानेंच खडीसाखर किंवा पिठी साखर आणि दुध घालून खूप उकळ्या फुटेपर्यंत शिजवून नंतर गाळून घेणें. जास्त आटविल्यास तितका गुण जास्त येऊन तो ताप पडसें वगैरे विकारावर उत्तम उपयोगी पडतो.

तेजस्वी झाड—हुसकाराराच्या उत्तरेस एक झाड सांपडतें. तिकडचे लोक याला जादूची कांडी ह्मणतात. झाड पाहण्यासारखें मोठें नाहीं. पांच सात फूट उंच. बुंधा माणसांच्या मांडी इतका. फांद्या मात्र अतिशय. परंतु याच्या ठिकाणीं असें तेज आहे कीं, काळोख्या रात्रीं सुद्धां हें मैलावरून दिसतें. यांच्या प्रकाशांत छापील प्रत वांचतां येते. हें तेज या झाडाच्या चिकास आहे. हा चीक काढून हाताला चोळला तरी सुद्धां हातावर चकाकतो.

सोलापुराकडे शेतांत उंदरांनीं प्रळय मांडल्याचें समजतें.

औषधी माहिती—पपई—( कोंकणांत ज्याला पोपया ह्मणतात त्याचा औषधी उपयोग- किडे व गजकर्ण वगैरे जाण्यास— पपईच्या कच्च्या फळास चाकूनें ओरबाडलें असतां जो चीक निघतो लावावा. तो मूळव्याधीवर—पपयाच्या कच्च्या फळाचा चीक मूळव्याधीस तीन दिवस लावावा; ह्मणजे मोड जळून जातील अगर गळून पडतील. प्लीहा रोगावर—पपईच्या फळाचें पोटीस करून प्लीहेवर बांधावें व पोटांत पपईचें दूध ( चीक ) चमचाभर साखरे बरोबर दिवसांतून तीन वेळ द्यावें. कृमीवर—पपईचें दूध एक चमचाभर साखरे बरोबर द्यावें. मुलांस देणें तर एक दोन थेंब द्यावे. जळवातावर हिरव्या पपयाचा कीस पातेल्यांत घालून त्यास वाफ देऊन तो तळपाय व तळहात यांस पांच दिवस बांधावा.

आपटा, बाभूळ, आंबा आणि जांभूळ या झाडाची साल सुकवून ती निरनिराळी कुटून बारीक करावी आणि प्रत्येकांतून दोन दोन तोळे चूर्ण घेऊन तें एक मण पाण्यामध्यें भिजवावें व त्यांत चार तोळे कात टाकून दोन शेर पाणी राही पर्यंत उकळावें नंतर धूत वस्त्र भिजविलें असतां त्यावर पक्का खाकी रंग चढतो.

श्राद्धास साहेब—हुगळी ( कलकत्ता ) चे युरोपियन माजिस्ट्रेट मि. ड्यूक यांच्या हाताखालील एका हिंदु क्लार्कच्या बापाचे थोड्या दिवसांपूर्वीं मासिक झालें त्याला सदर्हू साहेब गेले होते व श्राद्धास लागणारा खर्च ही त्या क्लार्कला साहेबांनीं दिला असें समजतें. न्या० सिं०

आयर्लंड बेटांत स्त्रिया व पुरुष या दोघांना राजकीय हक्क सर्व तऱ्हेनें सारखे आहेत. या राष्ट्रांत लोकसंख्या ७३,००० आहे. याचा कारभार स्त्रिया व पुरुष या उभयतांना निवडून दिलेले लोक चालवितात. लोक शिक्षणाचें काम सगळें स्त्रियांच्या हातीं आहे. शिक्षणखात्यांतील सगळी कामें ( शिक्षकापासून तों तहत डायरेक्टरा पर्यंत ) स्त्रियाच करितात, सगळ्या बेटांत एक सुद्धां अशिक्षित मनुष्य नाहीं. हें लोकशिक्षणाचें काम स्त्रियांच्या हातीं दिल्यामुळें तें राष्ट्र असें बनलें आहे कीं, त्यांत तुरुंग नाहींत. पोलिस नाहीं, चोर नाहीं, सैन्य नाहीं, न्यायकोर्टें नाहींत, कांहीं नाहीं. हा स्त्रीशिक्षणाचा प्रभाव इतर ठिकाणीं दृष्टीस पडत असतां आमच्या इकडे स्त्रियांना शिक्षण द्यावें कीं नाहीं हाच वाद सुरू आहे. चालू द्या!

मिचिगान संस्थानांत दारूला कधींही स्पर्श न करणाऱ्या लोकांनाच फक्त एंजिन ड्रायव्हरच्या वगैरे कामावर नेमावयाचें असा कायदा आहे. फार चांगलें!

डाका येथें मुसलमान व हिंदु यांच्यातील तंटेबखेडे नाहींसे व्हावे ह्मणून एक 'युनिअनक्लब' स्थापन झाला आहे. हेतु चांगला आहे, सफल होवो!

रशियानें सैन्यांत २,६२,००० लोक नवीन ठेविले.

ब्रांझिल देशांत एक बाई तान्ह्या मुलाला पाजीत असतां झोंपी गेली इतक्यांत एक भूकेनें व्याकूळ झालेला साप आला. त्यानें मुलाला तेथून उचलून त्याच्या जागीं आपण दूध पिऊं लागला व मुलानें रडू नये ह्मणून त्याच्या तोंडांत शेपटी दिली.

आयर्लंडमध्यें आगगाडीचे एक इंजिन तयार झालें आहे, त्यांत कोळशाच्या ऐवजीं तेलाचा उपयोग करूं लागले आहेत.

बर्मिंगह्याम येथें एक वर्तमानपत्र विजेच्या योगानें छापलें जातें. कापलें जातें व त्याच्या घड्या घातल्या जातात. अशा तऱ्हेनें विजेच्या योगानें छापलें जाणारें हें पहिलेंच पत्र आहे.

लंडन येथील जनरल पोष्टआफिसांत एक यंत्र आहे, तें खालीं लिहिलेलीं कामें करितें:—तिकिटांवर छाप मारून त खोडून टाकतें; पोस्टाचा शिक्का मारतें, पत्र वेडे वांकडें पडलें असेल तर टिकीट वर येईल अशा बेतानें सरळ करितें; टिकीट भलत्याच बाजूला लावलें असेल तर टिकिट छापाखालीं येईल अशी तजवीज करतें; पत्रें मोजतें; व त्यांचीं सोईवार पुडकीं बांधतें. क० णू०

जहागीरदारास संस्पिड केलें— काठेवाडांतील ह्मालियाच्या ठाकूर साहेबांच्या संस्थानांत फार अव्यवस्था आहे. ह्या अव्यवस्थेमुळें लेफ्टनंट गार्डन आणि दोन पोलिस आफिसर मारले गेले असें सरकारास वाटून सरकारानें सदर जहागीरदार साहेबांस त्यांच्या अधिकारा पासून संस्पिड केलें आहे असें समजतें. दरोडेखोर आणि रेसिडेन्सीचे पोलिस यांच्या मध्यें लढाई होऊन ले० गार्डन आणि पोलिस आफिसर मरतात, आणि त्यांच्या बद्दल प्रायश्चित्त संस्थानिकास हा खासा न्याय!

ग्रेटब्रिटनचा व्यापार पुष्कळ कमी झाल्यामुळें इंग्लिश आणि स्काच बंदरांत माल नेणारीं आणणारीं ४०९ जहाजें पडून राहिलीं आहेत असें इंग्रजी पत्रावरून समजतें.

एक कायद्याचा प्रश्न— चांगली वर्तणूक ठेवण्या बद्दल इंग्रजी हद्दींत एका मनुष्यानें जामीन मुचलका लिहून दिला होता. त्याच मनुष्यानें नेटिव संस्थानांत अपराध केल्यामुळें त्याच्यावर खटला होऊन त्यास शिक्षा झाली, तेव्हां त्या मनुष्याचा मुचलका अमलांत आणिता येईल कीं नाहीं असा एक महत्वाचा प्रश्न उत्पन्न झाला आहे शु. सु.

तेजःपुज रत्न – बुखाऱ्याचे खानानें रशियाचे झारास थोड्या दिवसां पूर्वीं जो नजराणा अर्पण केला त्यांत एक अमोल्य हिरा आहे. काळोखे रात्रीं ह्या हिऱ्याचा प्रकाश दिव्या सारखा लख पडतो, व त्या प्रकाशांत लिहिणें वाचणें व दुसरीही कामें करण्यास सापडतात, इतका तो विलक्षण दैदीप्यमान् आहे असें ह्मणतात.

मद्रासेंतील दुर्भिक्ष्य— मद्रास टाइम्स वरून समजतें कीं, रामनाद जिल्ह्यांत अनावृष्टीमुळें तूर्त फार हलाकी झाल्यामुळें तिकडील सुमारें ३०००० रयत आपलीं बायका पोरें व गुरें ढोरें व गाड्या वगैरे बरोबर घेऊन देशांतरास निघून गेली!! सन १८७७ सालचा दुष्काळाचा रंग दिसू लागला आहे. गोरगरिबांस अन्न मिळण्या साठीं सौथ इंडियन रेल्वे मद्रासे पासून रामेश्वर पर्यंत वाढविण्याचा कारखाना सरकारानें सुरू करावा अशी शिफारस सदरहू पत्रकर्त्यांनीं केली आहे. मद्रासच्या गव्हनर साहेबांनींही विपत्तिग्रस्त मुलखांत फिरण्यास जाण्याचा विचार केला आहे.

आगबोट बुडाली— आंकरलाईन कंपनीची त्रिनाक्रिया नांवाची आगबोट स्पेनच्या किनाऱ्या जवळ बुडाली व त्यांत सु० ४० मनुष्यें प्राणास मुकलीं, असें लंडनचो तार सांगते.

ह्मैसुरांतील म्युनिसिपालिटीच्या हद्दींत गोहत्या करूनये असें तेथील महाराजांनीं ठरविलें आहे.

अनर्थकारक महापूर— कुइन्सलांड बेटांत गेल्या आठवड्यांत महापूर येऊन कांहीं शहरें जलमय होऊन गेलीं; कित्येक वाडे व पूल पडले, व शेंकडो लोक घरदारांस मुकून अनाथ होऊन गेले, अशी दुःखद बातमी तारेवरून कळते.

काबूलच्या अमिरानें आपल्या राज्यांतील व्यापाराची स्थिति सुधारणे साठीं कंदाहार, जलालाबाद व काबूल येथील व्यापाऱ्यांस व्याजी पैसा देण्याचें ठरविलें आहे. अफगाण व्यापाऱ्यांनीं हें कबूल केलें; परंतु पंजाबी व्यापाऱ्यांनीं हा सवदा नाकबूल केला कारण अमिराचा पैसा घेतला तर तो परत घेण्या साठीं कोणत्यावेळीं काढण्या लावील यांचा त्याला नेम नाहीं. नाकबुलीमुळें पंजाबी व्यापाऱ्यांवर अमिराची नाखुषी झाली आहे असें समजतें. स० शो०

नवीन कायदा—दुष्टबुद्धीच्या कजाक सास्वा आपल्या सुनास व नणंदा आपल्या भावजयास फार गांजतात, त्या योगानें कधीं कधीं फार मोठाले अनर्थ त्या कुटुंबावर येऊन कोसळतात ह्या प्रकार बंद करण्याचा कायदा करण्याचें वाटत आहे. न्या. सु.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साहामाही  ,, ३ ,, ८९
सालअखेर ,, ७ ,, १०८
किरकोळ अंकास ........................ ४

Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy.................................4as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ......०१

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII  AKOLA MONDAY 27 FEBRUARY 1893  NO. 9

वर्ष २७  आकोला सोमवार तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १८९३ इ०  अंक ९

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग,मूर्खपणा अगर अविचार यां पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणे, गुप्तस्त्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाल्लें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें ताबडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेत सल्का मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरी होणें परमा व गुप्तस्त्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणाराची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते म्हणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतुची जबरदस्त शक्ति वाढविणारें टॅनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायुंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्माच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हे औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clements.हीं सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधगिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक 'नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कॅंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकानें.

F. M. Clements, Inventor Sydeny, Australia.

### नोटिस

रा. रा. नथमल हिंमतराम गुलाबचंद मारवाडी राहणार पळून तालुके दारव्हा जि० वणी यांस नोटीस देणार नेतराम मोतीराम मारवाडी राहणार वाहाळा बुजरुख तालुके बाळापूर जिल्हा आकोलें. नोटीसीनें असें कळवितो कीं तुह्मी व आह्मी मिळून पिंपळखुठे ता बाळापूर येथें तकशीम मर्वे नेतराम नथमल या नावाची दुकान दीडवर्ष सुमारें चालविली व नंतर आह्मी देशी गेल्या मागे तुह्मी ती दुकान गोळा करून "पळून" गावीं गेला त्याचा आज पावेतो तुह्मी सदर्हू दुकानचा हिशोब नफा नुकसान वगैरे बद्दल दिला नाहीं करिता ही नोटीस पावल्या पासून १५ पंधरा दिवसाचे आत सदर्हू दुकानचा सर्व हिशोब नफा नुकसानी व ऐनमुद्दासह दाखऊन निकाल करावा असें केलें नाहीं तर रिती प्रमाणें काम चालवून अखेर निकाल होईपर्यंत ह्या नोटिशीचे खर्चा सुद्धा सर्व भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस सही ता॥ २१ माहे फेब्रवारि सन १८९३ इसवी.

सही मारवाडीत
नेतराम मोतीराम मारवाडी राहणार
वाह्याळा दस्तुर खुद

### अर्थ शास्त्र.

ज्या शास्त्रांत ( अर्थ म्हणजे ) संपत्ति, तिची उत्पत्ति, तिची अदलाबदल व तिची वाटणी ह्या गोष्टीचा विचार केला असतो त्यास अर्थशास्त्र असें म्हणतात. येथें अर्थ म्हणजे काय हें बरोबर समजलें पाहिजे. पूर्वी अर्थ आणि पैसा ह्यांचा अभेद समजत असत, त्या मुळें एखाद्या देशाच्या संपत्तीची गणती त्या देशांत जें सोनें रुपें असे, त्या वरून करीत असत आणि म्हणूनच देशांतील पदार्थ बाहेर जाऊ नयेत ह्या साठीं व्यापारावर कांहीं कृत्रिम दाब ठेवण्यांत येत असत. आतां असा समज होण्यास कांहीं सबबीही होत्या कारण एखाद्या श्रीमंत गृहस्थाची प्राप्ती सांगावयाची असली म्हणजे, इतके रुपये किंवा इतक्या मोहरा असें सांगण्याचा प्रचार सर्वत्र होता. परंतु थोडासा विचार केला असतां समजून येईल कीं, हा समज चुकीचा होता. प्राचीन इतिहास पाहिला म्हणजे असें दिसून येतें कीं, कांहीं देशांत पूर्वी पैशाचा म्हणजे नाण्याचा मुळींच उपयोग करीत नसत. परंतु प्राचीन काळीं चीन देशांतच चहा दाबून त्याचे गोळे करीत व त्यांचाच नाण्या ऐवजीं उपयोग होत असे. अमेरीकेंत इंडीयन लोक शिंपासच नाणीं समजत. तसेंच ग्रीस व अरबस्थान ह्या देशांत क्रयविक्रय जनावरावरच होत असे. फार काय आरंभीं सर्वच देशांत, देवघेव नाण्या शिवाय इतर पदार्थांनींच होत होती; व अझूनही अगदीं खेड्यांत पुष्कळ पदार्थ, धान्य किंवा दुसरी जिन्नस देऊनच विकत घेण्याची वहिवाट आहे. आतां ह्या देशांत नाणीं उपयोगांत नव्हती म्हणून संपत्ती मुळींच नव्हती असें म्हणतां येईल काय? अर्थात नाहीं. तेव्हां अर्थ व पैसा यांचा अभेद मानितां येत नाहीं. पैसा हा खरोखर क्रय विक्रयाचें साधन व किंमतीचें परिमाण आहे, व हें साधन व परिमाण सर्वानुमतें पाहिजे त्या पदार्थाचे करितां येईल ह्मणून पैसा हा अर्थ ह्मणजे संपत्ती नाहीं हें उघड झालें. तर मग संपत्ती कशाला ह्मणावें? संपत्तीची व्याख्या अशी करितां येईल कीं ज्याची अदला बदल करिता येते, ज्यास किंमत पडते असा कोणताही पदार्थ. ह्मणून ज्यास किंमत नाहीं अशा पदार्थांची गणना संपत्तींत होत नाहीं; मग तो पदार्थ कितीही उपयोगी किंवा जरूरीचा असेना? उदाहरण, हवा, उजेड व पुष्कळ ठिकाणीं पाणी ह्या पदार्थांस कोणी किंमत देत नाहींत कारण ते फुकट पाहिजे तितके मिळतात.

आतां हा अर्थ ह्मणजे संपत्ती उत्पन्न करण्यास कोणकोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे हें पाहूं. आपल्या उदरनिर्वाहास जेवढे ह्मणून उपयुक्त पदार्थ लागतात ते सर्व प्रत्यक्ष किंवा परंपरेनें जमिनी पासून उत्पन्न होतात ह्मणून प्रथम जमीन पाहिजे. कोणी ह्मणेल कीं शुद्ध लोकरीचें कापड, मांस वगैरे पदार्थांस जमीन कशाला पाहिजे तर ह्याचें समधान असें आहे कीं, हे पदार्थ जरी प्रत्यक्ष जमीनी पासून होत नाहींत तरी ज्या प्राण्यापासून ते आपल्यास मिळतात त्यांचा निर्वाह जमिनीवर होतो. येथें हें ही सांगितलें पाहिजे कीं जमिनीची उत्पादक शक्ति, खतांनीं व यंत्रांनीं वाढविता येते. खताच्या योगानें जमीन ज्यास्त सुपीक होते हें तर सुप्रसिद्धच आहे. जमिनीची लागवड करण्यांत यंत्राचा उपयोग केला तर माल थोडक्या किंमतींत तयार होतो ह्मणून यंत्रांस उत्पादक शक्ती वाढविणारी असें ह्मटलें आहे. तसेंच शेतीचा मोठा कारखाना घातल्यानेंही जमिनी पासून ज्यास्त फायदा होतो. जसें १०० एकर जमिनीची किस्तगरी करण्यास जितका खर्च व मेहनत लागते त्या मानानें १००० एकर जमिनीस लागत नाहीं. दुसरें, मोठ्या शेतींत यांत्रिक शक्तीचा उपयोग करून घेतां येतो. तरी लहान शेतींत जितक्या काळजीनें शेतकरी काम करितो तितकी काळजी त्याच्यानें मोठ्या शेतींत घेववत नाहीं. तसेंच कांहीं पदार्थ लहान शेतींतच जसे चांगले होतात तसे मोठ्या कारखान्यांत होत नाहींत. ह्या अडचणी आहेत.

वर सांगितलें आहे कीं, बहुतेक निर्वाहाचे पदार्थ जमिनीपासून होतात ह्मणून संपत्ती उत्पन्न करण्यास जमीन पाहिजे. परंतु नुसती जमीन असली ह्मणजे आपणांस सर्व पदार्थ मिळू शकतील असें नाहीं तर जमिनीशीं श्रमाचा संबंध असला ह्मणजे पदार्थ तयार होतात. ह्मणून अर्थोत्पत्तीस जशी जमिनीची अवश्यकता आहे तशीच श्रमाचीही आहे हें उघड झालें. आतां श्रमाचे इतके प्रकार आहेत कीं, त्यांची गणती करणें फार कठीण आहे. ह्मणून श्रम ह्मणजे काय हें सांगणें सोपें नाहीं. तरी पदार्थ योग्यस्थळीं ठेवणें किंवा त्यांस गती देणें अशी जर श्रमाची व्यवस्था केली तर तींत श्रमाच्या नानाविध प्रकारांचा समावेश होऊ शकतो. ह्या जड सृष्टींत पदार्थांस गती दिली ह्मणजे झालें; बाकीचे कार्य त्यांत जे नैसर्गिक गुण व धर्म असतात त्यानें आपोआप होतें. उदाहरणार्थ घराचें काम घेऊं. घरास विटा लागतात. त्या

घरांचे काम घेऊं घरास विटा लागतात त्या-करावयाच्या ह्मणजे एके ठिकाणीं माती आणून, ती पाण्यांत भिजऊन विटांच्यांत दाबणें; व मग विस्तवांत भाजणें, ह्या सर्व कृत्यांत पदार्थास गती देण्या पलीकडे दुसरें कांहीं झालें नाहीं हें सहज वाटण्या जोगें आहे.

कौशल्य युक्त श्रमानें पदार्थाची किंमत किती वाढवितां येते, हें पुढील उदाहरणांवरून समजेल. खिशांतील घड्याळाला बारीक अति सुक्ष्म पोलादी स्क्रू लागतात. अशा अच्छेरस्क्रोची किंमत तीन शेर सोन्याचे किंमती इतकी पडते. तसेंच घड्याळांत जी बारीक कमान असते, ती पोलादाचीच असते. अच्छेर पोलादाच्या जर ह्या कमानी केल्या तर त्यांची किंमत ४००० रुपये होते आणि नुसत्या पोलादाची किंमत पाहिली तर एक रुपयापेक्षां फार जास्त पडत नाहीं!!

कांहीं श्रमां पासून अर्थोत्पत्ती प्रत्यक्ष होते, कांहीं श्रमापासून मुळींच होत नाहीं. ह्मणून श्रमाचे दोन प्रकार झाले उत्पादक व अनुत्पादक. सुतार, लोहार, चांभार वगैरे यांचे श्रम उत्पादक आहेत. कारण त्यापासून जरूरीचे उपयुक्त पदार्थ प्रत्यक्ष होतात. धंदे शिक्षण देणारे, व नवीन यंत्रांची युक्ती काढणारे, ह्यांच्या श्रमापासून जरी प्रत्यक्ष कांहीं अर्थोत्पत्ती होत नाहीं, तरी परंपरेनें होते. मास्तर जे कांहीं शिकवितात त्यांच्या योगानें मुलें तयार होऊन पुढें तीं अनेक धंद्यांत पडून, उत्पादक श्रम करणारे बनतात. तसेंच कारागिरांनीं नवीन यंत्र काढिलें तर त्या पासून अनेक लोकांच्या श्रमाची उत्पादक शक्ती वाढते. नाटकांत सोंगें घेऊन नाचणारे, गाणार, धर्मोपदेशक वगैरे लोकांचे श्रम अनुत्पादक आहेत. ह्मणून ह्या लोकांस निरुपयोगी समजून तुच्छ मानावयाचें असें नाहीं, तर अर्थशास्त्र दृष्ट्या मात्र ते अनुत्पादक आहेत.

श्रमाची उत्पादक शक्ति अनेक गोष्टींनीं वाढते, त्यांत श्रम विभाग हा मुख्य समजला जातो. एखादा पदार्थ तयार करण्यास अनेकांचे श्रम अंशतः अंशतः लागतात त्यास श्रम विभाग म्हणतात. जसें भांडी तयार करण्याचे कारखान्यात कोणी पत्रे तयार करतात कोणी त्यांस आकार आणितात कोणी चरकी धरतात व कोणी त्यावर नकशीचें काम करितात. तेव्हा कोठें नकशीचा तांब्या तयार होतो. असो हा श्रमविभागा पासून चार फायदे होतात ते हेः— (१) कारागिरीचें कौशल्य वाढतें (२) वेळ वांचतो (३) नवीन युक्ती निघण्याचा संभव असतो (४) ज्याला जें काम चांगलें करितां येतें त्याच कामावर त्यास लाविता येतें. उदाहरणें दिलीं म्हणजे ह्या गोष्टीचा जास्त खुलासा होईल.

उदाहरण १

१ खिळीण्याचे टाक करण्याचे कारखान्यांत कांहीं मजुरांचे काम फक्त टाक यंत्रांतून बाहेर काढणें, येवढेंच असते. तें हें काम इतक्या आश्रमें कारक शिताफीनें करितात कीं, त्यांचें हातांवर आपली नजर ठरत नाहीं. हीच गोष्ट छापखान्यांतील कंपाझीटरच्या संबंधानें ही दृष्टीस पडते.

२ समजा, एका घरावरचीं कौलें उतरावयाचीं आहेत. त्यास एकच मजुर लाविला तर प्रत्येक पाटी भरल्यावर तो रिकामी करण्या करितां त्यास दर खेपेस खालीं उतरावें लागेल व चढउतारांत त्याचा वेळ मनस्वी जाईल. तेंच दुसरा मनुष्य खालीं पाटी घेण्यास असेल तर पूर्वी पेक्षां चौपट काम सहज होईल.

३ एकाच कामांत मन एकाग्र झालें तर तें काम कमी मेहनतीनें होईल कीं नाहीं, हा विचार करितां करितां कांहीं नवीनयुक्ती सांपडण्याचा पुष्कळ संभव असतो. व ज्या शेकडो नवीन युक्ती निघाल्या आहेत, त्यांतील बऱ्याच अशा प्रकारानें निघालेल्या आहेत.

४ समजा आपल्या येथें दोन कुशल सुतार कामावर आहेत एकास लाकुड करवतण्याचें काम पडलें तर, त्यास मदत साधारण मजुरा कडून न करवितां दुसऱ्या सुतारा कडुन करविली तर तितकें आपलें नुकसान झालें म्हणजे जें काम चार आणे रोजाचे मजुरा कडून होण्या जोगें होतें त्यावर आपण बारा आणे किंवा रुपया रोजाचा सुतार लाविला.

श्रम विभाग पासून फायदा फक्त पदार्थ तयार करण्याचे कारखान्यांतच होतो असें नाहीं, तर व्यापारांत ही होतो निरनिराळ्या देशांशी परस्पर (फ्रि ट्रेड) अनतहित व्यापार चालूं असणें, हा खरोखर श्रमविभागच आहे. म्हणून अशा व्यापारांत ज्या कृत्रीम अडचणी उत्पन्न करून ठेविल्या असतात त्या दूर करून टाकील्या, तर प्रत्येक देशास सर्व पदार्थ, आपल्याच देशांत उत्पन्न करण्याची आवश्यकता राहून, जेवढे पदार्थ आपल्या देशांत स्वाभाविक रित्या, चांगले व विपुल होतात तेवढेच तयार करण्याचे मार्गे जो तो देश लागेल व असें करणेंच हितावह होईल. पुढें चालेल.

## वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध १२ शके १८१४

'पार्टीशन आक्ट' ह्मणजे हिश्या प्रमाणें विभाग करून देण्याचा कायदा हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौंसिलपुढें सध्यां आहे आणि तो बहुतेक करून सर्व पसार होण्या सारखा आहे. भाउबंदांत वाटण्या होऊन होऊन कांहीं पिढ्या लोटल्या नाहींत तोच एखाद्या मोठ्या जिनगीची दुर्दशा व तुकडेच तुकडे होऊन ती इस्टेट नाहींशी होते. असें बहुतेक वडिलोपार्जित इस्टेटी संबंधानें वारंवार घडतें. वांटण्या वारंवार झाल्या आणि हिश्याचे पोट हिस्से होत गेले ह्मणजे कालान्तरानें असला एखादा हिस्सा बिनकिंमतीचा होतो आणि इस्टेट नाहींशीं होऊन ती कोणालाच मिळत नाहीं. हिंदुस्थानांत प्रत्येक इस्टेटीला वांटेकरी फार असतात आणि त्या पैकीं एखाद्या भाऊबंधानें इस्टेटीचा विभाग पाहिजे असें ह्मटलें तर त्याला इस्टेट तोडून देणें भाग होत असे. शिवाय वांटण्या सारख्या सारख्या हिश्याच्या असल्यामुळें कित्येक वेळां जमीनजुमल्याचे फार सूक्ष्म विभाग होऊन सर्व त्यावर इस्टेट गैरसोयीची, निरुपयोगी व कवडीमोल होते. इंग्लंडांतल्या कायद्या प्रमाणें वडील मुलाला सर्व इस्टेटीची मालकी मिळावयाची तशी इकडे मिळाली असती तर आरंभी ती पद्धति अहितावह व निर्दयपणाची वाटली असती परंतु अखेरीस सर्व इस्टेट कायम राहते आणि एका कुटुम्बांतल्या कोणा एकाच्या तरी उपभोगास मिळते हें लक्ष्यांत घरिलें ह्मणजे ती बहुतजणास आवडेल असें आह्मी समजतों. हल्लीं जुनीं मोठमोठीं घराणीं अस्तंगत झालीं आहेत तेथें वांटणीचा कायदा नसता तर ती आज मितीस तशीच पुर्वी प्रमाणें कायम राहिली असती असें खात्रीनें सांगता येईल. शिवाय आमच्या लोकांत वडिलोपार्जित इस्टेटी विषयीं अति दृढ आसक्ति असते व तिचा तिळा एवढा भाग मिळाला तरी तो समसंतोषानें राखून ठेवण्या मध्यें आमचे लोक तत्पर असतात पण तोच आपला वाटा दुसऱ्या भाऊबंदाजवळ असूं देणें व त्याच्या मोबदल्यांत कांहीं रकम घेणें कोणास आवडत नाहीं. विद्वान इस्टेटीच्या अस्तित्वाकडे नजर देऊन वागणारे असे समजूतदार लोक थोडे सांपडतात.

आतां नवीन जो वाटणीचा कायदा पसार होणार आहे त्या वरून जेव्हां इस्टेटीचें स्वरूप व भागिदारांची संख्या या मुळें अगर अशाच कारणा मुळें तिचे विभाग करणें बरें नसून गैरसोयीचें दिसेल आणि त्यासाठीं इस्टेट विकून जी रकम येईल ती विभागली असतां हिस्सेदारांचा फायदा होईल तेव्हां निम्मा किंवा त्याहून अधीक इस्टेटीचे एक अथवा अनेक हिस्सेदार यांच्या म्हणण्या वरून कोर्टानें इस्टेट विकण्या विषयीं हुकूम द्यावा. हिस्सेदारा पैकीं जर कोणी विक्री करूं इच्छिणाराचे हिस्से विकत घेईल तर योग्य किंमतीला ते त्याला विकले जातील. अनेक हिस्सेदार विकत घेऊं इच्छितील तर जो योग्य किंमती पेक्षां अधीक रकम देईल त्याला ते वाटे विकले जातील. एखाद्या हिस्सेदाराच्या धनकोशी मालकी असून तो धनको त्याचा वांटा मागीत असेल तेव्हां देखील इतर हिस्सेदारांनी वाजवी किंमत देऊन कोर्ट मार्फत तो विकत घ्यावा. ज्या इस्टेटीची विक्री कोर्ट मार्फत होत जाईल तो वाटेल त्या हिस्सेदारानें लिलावांत विकत घ्यावी. वरील विक्री संबधानें कोर्टानें जे हुकूम दिले असतील त्या हुकूमनाम्या वर अपील करण्यास कायद्यानें सवड दिली आहे. हुकूमनाम्याची बजावणी करण्याविषयीं जे नियम आहेत तेच नियम वांटणींतील इस्टेटीच्या विक्री संबंधानें लागूं केले जातील.

या कायद्यानें प्रत्येक इस्टेटीची विक्री केलीच पाहिजे असें नाहीं. जर, कोणी हिस्सेदार ती विकत घेतील तर विक्री करण्याची जरूर राहिली नाहीं. शिवाय हिश्याची भानगड जर नकोशी असली तर लिलावांत जी मोठी रकम येईल ती ज्या हिस्सेदाराला स्वतंत्रपणें इस्टेट पाहिजे असेल त्याला तेवढीच रकम भरल्यानें मिळण्यासारखी आहे. या नव्या कायद्यानें एकेका घराण्यांत एकच चांगला पुरुष निपजला तरी देखील ज्या इस्टेटीच्या वांटण्या केल्या पासुन तोटा होईल ती इस्टेट त्याला निराळी विकत घेऊन स्वताच्या मालकीची करितां येईल. ह्मणजे जे केवळ इस्टेटीच्या नफ्याकडे न पाहतां व इतर हिस्सेदाराचें कल्याण बाजूस सारून वांटणी मागूं इच्छितील त्यांच्यासाठीं या कायद्यानें उत्तम व्यवस्था झाली. त्यांनीं आपल्या वांट्याची रास्त किंमत टरेल ती घेऊन स्वस्थ बसावें मग ती किंमत इतर हिस्सेदाराकडून कोर्टें देववो किंवा विक्रीदाराकडून जी रकम जमा येईल तिच्या हिस्सेशीं प्रमाणें मिळो. एकंदरीनें हा कायदा सांप्रतच्या स्थितीला मोठा अनुकूळ असून लोकांना आवडण्यासारखा आहे.

वारंवार जे अपराध करितात त्यांना त्यांच्या अपराधांचें स्वरूप व आवृती हीं पाहून कायद्यानें शिक्षा कायम केल्या आहेत तरी त्या पासून नाण्यासंबंधी व स्टांपासंबंधी तसेंच मालमत्ते संबंधी जे अपराध आहेत ते वारंवार केले तरी शिक्षा कडक असूनही ते अपराध दिवसेंदिवस वाढत आहेत. आणि असे अपराध करणारे इसम नेहमी उद्योगधंदा न करणारे, आळशी व उपाशी मरणारे असे असतात. क्रिमिनल प्रोसिजरमध्यें अशा भटक्या मारणाऱ्या लोकांपासून जामिन घेण्या बद्दल व जात मुचलके घेण्याबद्दल तजविजी आहेत तरी त्यांजवर जशी पोलिसांची पैरवी व देखरेख राहावी तशी राहत नाहीं व अधीक सक्ति करण्याविषयीं पोलीसास हुकूमही नाहीं. उत्तरोत्तर अपराध वाढत आहेत यावरून फौजदारी न्यायखात्याचें काम असावें तसें नाहीं. फौजदारी न्यायखात्यांत दोन उणिवा मोठ्या दिसून पडल्या. त्यांत पहिली गोष्ट ही कीं पोलीसांतील शिपाई, आफिसर वगैरे चांगले पगारदार नसल्यामुळें त्या खात्यांत चांगले चांगले विद्वान व चाणाक्ष लोक फार शिरत नाहींत. आणि दुसरी गोष्ट पोलीसांची देखरेख अपराध्यावर शिक्षा भोगून ते सुटे झाल्यानंतर चांगली राहत नाहीं जे सदोदीत अपराध करून कालक्षेप करितात त्यांजवर पोलीसांची करडी नजर न राहिल्यामुळें ते चटकन देशाटन करून आपल्या सफरींत अनेक अपराध करितात. अशा लोकांवर सक्त करडी देखरेख ठेवितां येईल अशा मतलबांचा कायदा पसार होत आहे आणि तो पसार झाला ह्मणजे मोठे फायदे होतील यांस संदेह नाहीं या शिवाय पोलीस खात्याची आवश्यक सुधारणा करण्या विषयीं आलिशान रेसिडेंट साहेबांनीं परवा वऱ्हाडांत असतांना अभिवचन दिलेंच आहे. तेव्हां आह्मी उमेद बाळगतो कीं वऱ्हाडचे जुडीशिअल कमिशनर मि. बुलक यांनीं गुदस्ताच्या पोलीस रिपोर्टावर अभिप्राय देतांना ज्या सुधारणा सूचविल्या आहेत त्या अमलांत आणण्या विषयीं साहेब मजकूर विशेष खटपट करतील.

आह्मास कळविण्यास मोठा आनंद वाटतो कीं, बरेच दिवस जी रेशमाची गिरणी पुण्यास चालण्याचें वाटत होतें ती गिरणी चालूं करण्याचा समारंभ आज दोन प्रहरीं पुण्यास होणार आहे असें धी पुना काटन एन्ड सिल्क- म्यान्यूफाक्चरिंग कंपनीचे डायरेक्टर्स कडून आलेल्या निमंत्रण पत्रिकेवरून समजतें. ईश्वर करो आणि हा स्वदेशी कारखाना चिरायू व वृद्धिंगत होवो.

मुंबई सरकार कडून तेथील मुनिन्सिपालिटी

## जाहिरात

स्थानापन्न होतो तेव्हां त्याप कर्ज रितां येण्यासाठीं सरटीफिकिट मि- न त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या हिरात.

८८९ चा आक्ट ७ कलम ४ प्रमाणें.

१ क्लास नं. १९ पैकीं मि. नंबर८/१८९३

बादास संतो सिव्हिल जडज्य सा- वाशीम यांचे कोर्टांत.

र रामचंद्र बापाचे नांव मोतिराम . बोरखेडा जाहगीर ता॥ वाशीम मि याने मयत

पण मारवाडी राहणार बोरखेडी ता॥ वाशीम जिल्हे वाशीम यांचें क करितां येण्या साठीं सरटीफिकि सदरहु अर्जदार यानें अर्ज कें- ांज करितां सदर्हु मयत मनुष्या- ळकतीवर किंवा तिचे कांहीं भा- का हक्क आहे ह्मणून ज्या मनु- अंसेल त्यास जाहिरातीचे व्दारें येतें आहे कीं त्यानीं ता० ९मा- न १८९३ इ० रोजीं सदर्हु अ ी होईल त्यावेळीं या कोर्टांत ह- आपआपले हक्का विषयीं लेखी खल करावी. आज ता. २१ मा सन १८९३ इ०

अंबादास संतो
सिविल ज्यडज्य
जिल्हे वाशीम.

## जाहिरात.

हो करणार इजकडून सर्व लोकां वर देण्यांत येते कीं तारीख इसवी रोजी केशव चिंतामण मी दत्तक घेतलें आहे. परंतु केशव चिंतामण परचुरे यांनीं र्तां विरुद्ध आणि अमर्यादुप- र अधिकाराचें वर्तन सुरू केले ंत आहे तो पर्यंत माझ्या अ वर व जंगम सर्व जिनगीवर कोणते ही प्रकारें हक्क नाहीं शार निल्हे यांचा लेख मज- ा करितां मशार निल्हेस कर्ज ा जिनगी गहाण अगर फ- क्षीस देण्याचा कोणत्या ही नाहीं हें सर्वांस जाहीर हो- विलें आहे. त्यास कोणी कर्ज . दिल्यास त्याजबद्दल आम्ही . मशारनिल्हेही माझ्या संम- दस्ताऐवज घरांतून काढून चा उलगडा करण्यास किंवा पांस अधिकार नाहीं व कोणी नयेत किंवा दस्ताऐवजाच नये. उलगडा केल्यास यास आम्हास कबूल नाहीं. ऐवज केशवरावाच्या नांवें त्या दस्ताऐवजावर मालकी मालक मी आहे. केशवराव ३-२-९३ इ०

( सही )

ई भ्रतार चिंतामण परचुरे राहणार अकोलें—निशाणी तुळशीची माळ.

---

### नोटीस.

चिरंजीव केशव चिंतामण परचुरे रहाणार आकोलें यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तारीख २१ माहे फेब्रुवारी सन १८८९ इसवी रोजीं मी तुह्मास दत्तक घेऊन लेखी दत्तपत्र केलें त्याप्रमाणें मी जिवंत आहे तों पर्यंत स्थावर जंगम जिनगीवर माझा हक्क अहे. सदरील जिनगीवर तुमचा कोणतेही प्रकारचा हक्कसंबंध पोंचत नाहीं. तसेंच माझी मुलगी सौभाग्यवती अंबुताई इजला मौजे डापकी परगणें अकोलें तालुके बाळापूर येथील सबंद एक शेत व दुसरें कजबे अकोलें येथील अर्धे शेत व यांतील अर्धे राहिलेले नारायण वा॥ लक्ष्मण भोगटे नोकर यांस दिलें आहे. त्यांचे हक्कास तुह्मी कोणतेही प्रकारें हरकत करूं नये. असे असतां तारीख २०।२।९३ इ० रोजीं मुलीचें नावें खात्याचा वर्ग करून देते वेळेस तुह्मी त्रागा करून मजला आणि माझा नोकर नारायण यास व रा० रामभाऊ रानडे यांस तुमचे शरिरास व घरास आग लावून नुकसान करीन व सर्व इस्टेट कोणास फरोक्त करीन अशी अनपायाची धमकी दिली. तसेंच ता. २१।२।९३ रोजीं घरांतून मजला न विचारतां दस्ताऐवजही तुह्मी घेऊन गेला आहा. याबद्दल कायद्या प्रमाणें तजवीज करण्यापूर्वी लेखी नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, तुह्मी आपल्या अधिकाराविरुद्ध वागत आहा. पुन्हा अशी दांडगाई करून धमकी द्याल किंवा मालमत्तेस नुकसान कराल तर कायद्याप्रमाणें तजवीज करणें भाग पडेल. माझे परवानगी वाचून शेतीचें कोणतेही कुळाकडून तुह्मी पैसा वसूल करूं नये. माझ्या संमती वाचून घरांतून जे कांहीं दस्ताऐवज तुह्मी नेले आहेत त्याचे पैसे वसूल करूं नये. किंवा दुसरे रितीनें त्याचा निकाल करूं नये. मालमत्तेच गहाण किंवा फरोक्तखत करूं नये व घरांत येऊन दांडगाई किंवा त्रागाही करू नये. जर तुह्मी याप्रमाणे कोणतेंही कृत्य कराल तर कायद्याच्या पेचांत याल. कळावें. तारीख २३।२।९३ इ.

( सही )

आनंदीबाई भ्रतार चिंतामण परचुरे यांच्या हातची निशाणी तुळशीची माळ.

---

### नोटीस

आमत्या वा॥ एकोजी कुणबी डापकी; दावल वा॥ हरी तेली, आकोला; नागो वा॥ लक्ष्मण कोष्ठी, आकोला; शिवराम वा॥ महादाजी कोष्ठी आकोला; शेखचांद वा॥ शेख तोळन आकोला; सखाराम वा॥ महादु धनगर डापकी; यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं केशव चिंतामण परचुरे यास मी दत्तक घेतलें आहे परंतु मी जीवंत आहे तो पर्यंत स्थावर जंगम जिनगीवर माझे दत्तक पुत्राचा कोणते ही प्रकारचा हक्क संबंध नाहीं. तारीख २०।२।९३ इसवी रोजीं मशारनिल्हे केशवराव यांनी वाईट रितीनें वागणूक सुरूं केली आहे व कांहीं दस्तऐवज ही मजला न विचारतां घरांतून काढून नेले आहेत करितां तुमचेकडेस प्रत्येकी जें शेत आहे त्या शेताचा पैसा मशारनिल्हे यांस तुह्मी देऊं नये व कोणतेही प्रकारचा व्यवहार संबंध ठेऊं नये. शेत लावून काढण्याचा किंवा पैसा वसूल करण्याचा कोणतेही प्रकारचा त्यास अधिकार नाहीं करितां ही नोटिस दिली आहे. सदरहु शेताचे पैसे मजपाशी दाखल करावेंत केशवराव यास द्याल तर मी मजरा देणार नाहीं. कळावे तारीख २३-२-९३ इ०

सही

आनंदाबाई भ्रतार चिंतामण परचुरे यांच्या हातची निशाणी तुळशीचीमाळ

---

### नोटीस

नोटीस बेशमी गणपतसा वल्द केसोसा जात सोनार राहणार मौजे निरूळ परगणें थुगांव तालुके उमरावती यांस

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येतें कीं मी तुम्हांस मौजे हातखेड परगणें थुगाव येथील माझे मालकीचे शेत तारीख ११-५-८३ रोजीं रुपये ५०० ताबे गाहाणखत करून दिलें नंतर तुमचे विश्वासावर मी त्यांचेंच तारीख २—१०-८४ रोजी खरीदखत रुपये १००० चें करून दिले. परंतु त्याचा पैसा एकही मिळला नाहीं. ताबेगाहानात शर्त अशी कीं मी लिहुन दिलेले शेताची स्वतःवाही पेरी करून जो वसूल देऊं त्याची पावती घेत जाऊ परंतु तसें तुम्ही ऐकीले नाहीं. तुमची रकम थोडी असून पिक ज्यास्त खात चालले म्हणून वारंवार मी पंचाईत करावी, तरी तुमच्या लक्षांत येईना, मी चांगलांच तुमचा पिछा केल्या वरून तुम्ही तारीख २३-७-९१ रोजीं माझे खरेदि मला बदलून दिले तरी मी तुम्हांस रजिष्टर होण्याचे आगोदरच सातसे ७०० रुपये आणून दिले होतें. त्याच्या वेगळाल्या रसिदा तीन ३ माझे जवळ होत्या. पुन्हा रजिष्टर केले त्या दिवशी नगदी दिले रुपये २०० येकून रुपये ९०० नउशे रुपयाची भरती केली तुम्ही चिल्हर रसिदा फाडून रुपये ७०० येक रसिद करून दिली. मला लिहीता वाचता येत नाहीं. तुम्ही काय घोटाळा केला ते समजत नाहीं तुम्ही रजीष्टर बदलुन देऊन साहा ६ वर्षांचा पट्टा कोणत्या आधारानें लिहून घेतला हे कळत नाहीं. सिवरामजी वल्द उदेभानजी याचा हवाला दाखऊन रजीष्टर केल्याचे भासते. व झालेल्या इसमाशी माझे कधीच कोणत्याही प्रकारचे देणें घेणें नाहीं. तुम्ही काय घोटाळा केला कळत नाहीं. तुमची रक्कम पाहू गेले असतां मुद्दल पाचसे ५०० ताबेगाहाना वरून त्यास रजिष्टर बदलुन वेण्याची तारीख २३-७-९१ पावेतों वर्षे ७ महिने २ दिवस १२ दिड रुपया शेकड्याचे मानाने येकंदर व्याज रुपये ६४८ येकंदर रुपये ११४८ पैकीं मी हातानें दिलेली रकम रुपये ९०० नऊशे बाकी देणे मजकडे रुपये २४८. पुढे माझे मालकीचे शेत सन १८८३ लगायत १८९९ आखेर साल पावेतो पिकें ९ त्यात दरसालच्या वागवणीच्या मानानें सरकारी सारा वजा जातां कायम ठराव रुपये ३०० चा आहे. अशा हिशेबा बद्दल मी आग्रह पुर्वक फार पंचाईती केल्या. मात्र तुम्ही कधींच पंच लोकां समक्ष कागज पत्र वेऊन आला नाहीं आतां ह्या नोटिसीनें असें कळविले जाते कीं माझे मालकी बदल दरसालचे उत्पन्न बदल रुपये ३०० त्यास ९ वर्षांबदल रुपये २७०० व्याज खाणें आम्हा लोकांत हराम लिहिले आहे. म्हणून ते येथे लिहीले नाहीं. तुमचे मागण्याची रकम रुपये २४८ तारीख १३-७-९१ पासून लगायत २३-२-९३ पावेतो माहे १९ व्याज रकम ७०॥। येकुन रुपये ३१८॥। पैकी माझे रुपये २७०० त्यातून ३१८॥। वजाजातां माझी बाकी कायम २३८१। तुम्हां कडून रिती प्रमाणे येणे आहे. ह्या रकमेच्या मानानें तुमसी मी पुष्कळ मागणे केलें. तुम्ही धोरण धरले नाहीं सांप्रत शेतावर मी कबजा करीत आहे. ही नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसांत माझे सर्व रकमेचा निकाल करून माझे हातची रसिद घ्यावी व ह्या नोटिसिचा खर्च ही तुम्हांस द्यावा लागेल. तुम्हांस योग्य वाटल्यास कोर्ट काम चालवावें. मी जबाव देण्यास सिद्ध आहे. म्हण खरी आहे आड बसे त्याचे आडवळ सुने. कळावें तारीख २३-२-९३ इ. दस्तुर जनार्दन गोपाळ शेट राहाणार कजबे थुगांव.

( सही )

सहीची निशाणी भोलाशा वल्द महेबुबशा फकीर राहणार टेंभुर्णे उर्फ लाढणापूर हाली मुक्काम मौजे हातखेड याच्या हातचा फारशी अक्षर ऐन केला असे.

---

### नोटीस

नोटीस बेशमी गणपतसा वा॥ केसोसा जात सोनार रहाणार मौजे निरूळ प्रगणें थुगांव ता० उमरावती यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मी ता० १८।५।८३ इ० रोजीं गणाजी वा॥ देवाजी माळी दुकान मौजे मिरजापूर याजला माझे मालकीची जमीन मौजे हातखेड येथील—ताबेगहाणखत रु० १०००चे करून दिलें. त्याचा तपशील माझेकडे त्यांचो खातेबाकीवरून देणें निघालें रु० ६६९ व रजिष्टरांत नगदी ३३१ मिळून रु० १०००. परंतु मला ३३१ ची रक्कम मिळाली नाहीं. नंतर तुह्मी ह्मटलें कीं, गणाजीची रक्कम तोडून शेत आह्मास पत्यानें द्यावें. माझा चुलत बंधु भोलाशा ह्यानें मला राजी करून तुमचा आमचा ठराव ७०० रु पर्यंत सात वर्षांत द्यावें. आह्मी गणाजीस रक्कम देऊन उरले रुपये तुह्मास देऊं. असे पक्के बोलणें झाल्यावर ता. १३।६।८३ रोजीं माझे बंधुच्या बोलण्यावरून तुमच्या विश्वासावर त्यांचेच रु. १२०० चे खरीदखत करून दिलें. ता० १९।६।८३ इ. रोजीं तुह्मी आह्मी मिळून गणाजी माळी पास रकम ६७९ देऊन रसीद घेतली व रजिष्टरही मी मागुन घेतले. ते रजिष्टर सालभर माझे जवळ होते. नंतर तुह्मी माझे पेथून मागून नेलें. गणाजीच्या घरून रजिष्टर घेतलें. त्या दिवशीं त्याच्या पाठीवर कांहींच लिहून घेतलें नव्हतें. तें रजिष्टर तुम्ही माझे येथून नेल्यावर कोणाच्या हातानें काय लिहिलें तें समजत नाहीं. परंतु आकबरखान रोहिला हातखेडकर यांचें म्हणण्यावरून सिद्ध होतें कीं, गणाजीस करून दिलेल्या रजिष्टरावर भरणा पावल्याचें लिहिलें परंतु लिहिणारे कोण हें समजत नाहीं. त्यावरून माझे मनांत जास्त शंका उत्पन्न झाली. तुमची रकम रुपये ७०० पैकीं गणाजीस दिले रु. ६७९. शिवाय रुपये तर तुम्ही रजिष्टर खर्चांतच दाबून बसलें. १८९० सालीं ठरावा प्रमाणें तुमची सालें पुरी झालीं सन १८९१ सालीं मी तुमचा पाठलाग केला. असतां तुह्मी मौजे हातखेड येथील मुसलमान लोकांची साह्यता घेऊन माल भरून नेला व मुसलमान लोकांची ( महजत )तयार करावी या बतीनें मे० रसूलखान रहाणार हातखेड याजला रुपये २०० तुह्मी देऊन माझे शेत खरीदी बदलून देऊं नये असा तुमच त्याचा ठराव आहे. ही गोष्ट जवळपासचे ४ चार पांच ५ गांवांत माहित आहे. ९२ च्या सालीं तसेंच केलें. आतां माझा पूर्ण आग्रह हाच कीं, माझा चुलत बंधु भोलाशा तो जवळ हुत असल्यामुळें त्याचे खरीदी ता० २३-७-९१ रोजीं बदडून दिलें. मी तसाच फिरत आहे हे तुह्मास योग्य नाहीं. इमान मात्र सोडू नका. तुह्मी बोलतां काय आणि करतां काय. ह्याचा नेम नाहीं. पंचाईती पुष्कळ झाल्या. अखेर पंचाईत पंचा समक्ष मौजे अनकवाडी प्रगणें थुगांव राघव यशवंत पांडे यांचे आंगणात. माझे शेताचें उत्पन्ना बद्दल सरकारी सारा वजा जातां बाकी कायम लागवड दरसाल रुपये ३००दोन वर्षांचे रु० ६०० सहाशें देऊन खरीदखत बदलून द्यावें. तुह्मी बदलून देतो ह्मणून कबूल केलें आणि रकमेस तुमचे आह्मी खाल्ले आमचे तुह्मी खाल्ले. असे ह्मणून समजाविले परंतु माझी समजूत झाली नाहीं. तो पंचाइतीचा दिवस रोज सोमवार ता० २ माहे जानेवारी सन १८९३ इ० त्या गोष्टीस आज सरासरी पावणे दोन महिने होत आले. तुह्मी एकही केलें नाहीं. आतां ही नोटीस पावल्या दिवसां पासून आठ दिवसाचे आंत रुपये ६०० मला देऊन माझे हातची रशीद घ्यावी व खरीदखत बदलून द्यावें. सांप्रत शेतावर माझा कबज आहे. तुह्मास योग्य वाटल्यास कोर्ट काम चालवावें. मी जबाब देण्यास सिद्ध आहे. ह्या नोटीशीचा खर्च तुह्मापासून भरून घेतला जाईल. कळावें तारीख २३-२-९३ इसवी दस्तूर जनार्दन गोपाळ शेट रहाणार थुगांव

( सही )

निशाणी ममदुशा वा॥ बनुशा फकीर राहणार मौजे टेंभूर्णे उर्फ लाढनापूर ता० इलिचपूर याचे हातची छडी केली असे.

अनकवाडी येथें हजर असलेले पंच.

१—मुकींदजी पाटील मौजे हातखेड.
१—राघव यशवंत कुळकर्णी हातखेडे व अनकवाडी
१—मानसिंग पाटील अनकवाडीकर
१—अहमद बिन अबदुल्ला जारव
१—जानुजी वा॥ नेमाजी पाटील.

घ्या सालीना १५००० रुपयांची देणगी मि-ळत असे. ती वाढविण्याविषयीं अर्ज होत आहे इतक्यांत मुंबई सरकारनें युनिव्हर्सिटी-स कळविलें कीं १८९१–९२ इ० सालीं पंधरा हजार रुपये मिळतील पण त्याच्या पुढील वर्षी फक्त दहाहजारच दिले जातील. आणि १८९३–९४ कारितां तर पांच ह-जारावरच मजल येऊन पोहचली. बहुतेक एक दोन वर्षांच्या मुदतीतच त्या देणगीला संक्षेप मिळेल असें वाटतें. आणि गेल्या पदवी दानाच्या समारंभाच्या वेळीं खुद्द गव्हरनर साहेबांनीं कळविलें कीं इतर सार्व-जनिक व लोक कल्याणाच्या गोष्टी युनिव्ह-रसिटी पेक्षां ही अत्यंत आवश्यक आहेत तेव्हां त्या संबंधाची जबाबदारि बजावतांना युनिव्हरसिटी कडे निराळा अधीक फंड देता येणार नाहीं. तेव्हां लोकांनीं आपल्या गर-जा आपल्याच पैशानें वर्गणी गोळा करून भागविल्या पाहिजेत. उच्च प्रतीच्या शिक्षणा विषयीं सरकारची ही आस्था पाहून नवल वाटेत. इतर राष्ट्रातून विद्यादाना कडे जो खर्च होतो त्याच्याशी तुलना केली म्हणजे आपल्या सरकारची हयगय नजरेस पडेल.

---

हिंदुस्थानांतील लेडी डफरीन फंडाची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत कलकत्यास भरली होती तिच्या हकिकती वरून उत्तरो-त्तर या संस्थेची भरभराट आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय. या फंडाचा उद्देश दोन प्रकारचा आहे. बायकांस वैद्यकी ज्ञान शिकावावयाचें आणि बायकासाठी स्वतंत्र बायकानीं चालविलेले दवाखाने स्थापावयाचे हे होत. हिंदुस्थाना संबंधानें कांहीं विलक्षण गैरसमज आहेत. सर्वजण बोलतात कीं स्त्रियांस आजारीपणांत औषध पाण्याचा उपचार चांगला होत नाहीं. आतां हें खरें कीं स्त्रियासाठीं स्वतंत्र दवाखाने नाहींत आणि वैद्यकी शिकलेल्या स्त्रिया नाहींत तरी या देशांतील अबला जनांचा कोणी वाली नाहीं असें नाहीं. 'लेडी डफरीन फंड' नको असें कोणीही ह्मणणार नाहीं परंतु जों-पर्यंत या देशांतील वैद्यकी शिकविण्याचा प्रय-त्न होणार नाहीं तोंपर्यंत वैद्यकी शिकणाऱ्या स्त्रिया फार विरळा निघतील. आणि नेटिव पद्धतीचीं औषधें ज्या दवाखान्यांतून मिळत नाहींत तेथें स्त्रिया फार करून जा-णार नाहींत. ज्या दवाखान्यावर पुरुष आ-हेत अशा ठिकाणीं हल्लीं किरकोळ दुखण्या साठीं स्त्रिया जाण्यास कांकूं करीत नाहींत. परंतु ज्या रोगा संबंधानें स्त्रियांची इस्पितळें जरूर पाहिजेत तेथें नेटिव वैद्यकी कर-णाऱ्या स्त्रिया असल्या शिवाय या देशाला मोठासा फायदा होणार नाहीं.

---

## The Berar Samachar

**MONDAY FEBRUARY, 27 1893.**

On Tuesday last was held the annual Convocation of the University of Bombay when Lord Harris as Chancellor presided. In his able and learned address the Chancellor first referred to the eminent gain which the University has obtained in elevating Mr. Justice Telang to the Vice-chancellorship. He expressed the general feeling of disappointment because Mr. Telang had felt himself physically not fit to deliver an address in this his first year of office. He appreciated the tone and spirit of the discussion which is going on in connection with the newly proposed degree in medicine. Lord Harris then turned to the eminent question of making the University a seat of learning as it ought to be. Till now the Indian Universities are pure examining bodies. Bombay is a first rate city in the physical world and her University should therefore claim the high dignity of a principal center in the world of letters. Lord Harris was most perspicuous and elequent when he adverted to the merits of a teaching University. We cannot do better than quote the stirring appeal in his very words: "For centuries past have earnest students from far and wide been attracted to those great University centers of thought and culture which from the means at their disposal have been able to dispense teaching as well as degrees; and what I would suggest to you is that the aim of this University should be a high one worthy of this grand city in which it rests; that it should aim at attracting scholars and students to it by the renown of the teaching which it imparts. It may be thought that this ideal is too high, but I say nothing is too high for Bombay to aspire to. When I see the wealth of stately edifices which Bomay so largely owes to the public spirit of her citizens: when I contemplate the great store of charitable aid which is dispensed to her suffering poor through the kindliness and thoughtfulness of her wealthy men I spurn the suggestion that if Bombay sets its mind to the endowmnet of its university to give it the means of teaching, the object will not be accomlished."

Here the Chancellor guardedly anticipated the criticism that would attend such utterances as these. The long and short of his reply to the criticism is that the Government has numerous and enormous responsibilities on their shoulders and in the presence of them the Government cannot see its way to endow the University with ample and sufficient funds. He denied the charge of shirking duties but in the spirit of fulfilling them he proceeded to observe—

'I am looking rather to the voluntary aid of those who having the means may be stirred up to take a sufficient pride and interest in the University of Bombay to help to endow it with a property adequate to enable it to understand teaching, while at the same time I think that towards such an endowment fund it would be a legitimate thing for Govt. to make a handsome contribution." The Chancellor concluded his remarks with a fitting advice to the students that were admitted to the several degrees. He told them that the life beyond is a yet unexplored book which they will have always to keep open and study day after day: one that they will never completely master but of which the more they can master the happier will be their lives, happy not in self-qualification but in the reward of contemplating the happiness they can spread around by the worthiness of their career.

---

The Jury notification of the Bengal Government is the great topic of the day. The wrichdrawal of the juri-system is a retrogade motion and speaks a sad want of appreciation of the public enlightenment and civilization. Thirty years' experience of its usefulness goes for nothing when a sudden freak of the local Government prohibits the admission of the people into the administration of criminal justice. The jury-question is referred to a Commission of Native and European gentlemen of great learning and position and the Secretary of State has adjourned the dicision of the problem pending the receipt of the report. Sir Thomas Munro the late Governor of Madras has written an elaborate and exhaustive minute on the trial of of criminal cases by jury in India. He is a staunch advocate of that system and his general remarks will evidently point out the line of action that a liberal and prudent Govt. should adopt. He observes as follows:—

"We can never expect to make our government in this country what it ought to be, without the cooperation of a public-spirited and intelligent people. A public spirit may be created in all nations, varying, of course, in degree according to the freedom of their institutions. In order to excite such a spirit in India, we must make the people eligible to all offices. In proportion as we do this, we may be sure that they will qualify themselves for them, that they will endeavour to outstrip their rivals and that they will seek distinction, not only in offices of profit and honour, but also by serving their countrymen in those of utility, such as members of panchayats or juries, from which they derive no reward.

The great object of our Government should be to extend the knowledge and to elevate the character of the people. No way is so likely to be successful as the bringing them into constant intercourse, and in a great degree associating them with ourselves in every deparrtment of public affairs. From this confidence they will gradually acquire new habits; they will perceive the advantages of the enlarged views of Europeans in all matters of government, and will in time seek to learn the knowledge which they have found to be so muh more useful than their own."

---

The Habitual Offenders Bill that is on the anvil of the imperial Legislative Council is certainly a wide measure to strengthen the hands of the police department. There is nothing objectionable in the bill itself but the operation of the act unless it be coupled with the necessay changes in the police force itself is likely to be oqpressive and tyrannical. The following quotation from the speech Honorable mover of the bill will indicate the two phases of the reform which are needed for every province in India:—

"The matter was referred to Local Governments and Administrations and, although it turned out that in, most of the provinces crime had not really reached the formidable dimensions which had been supposed, it was nevertheless admitted that the administration of *criminal justice was far less effective* than it should be in most parts of the country, and various causes were assigned to account for the shortcoming. Most of these causes have been dealt with, and as far as possible remedied, executively. Chief among them were defects in the police force itself. This has now been thoroughly overhauled in almost every province, and measures have been taken, involving considerable expenditure, to improve the personnel of the force generally, and more particularly to secure better and more trustworthy men as investigating officers.

"But another result of our enquiries, and that on which I desire to lay stress in connection with the Bill which I am about to introduce was to show very clearly that the improvement in communications which has been effected in recent years, chiefly by railways and the telegraph, has greatly facilited the depredations of professional criminals, and has increased the difficulty experienced by the police in the detection and prevention of certain classes of crime. This difficulty, we believe, arises mainly from the fact that there is no provision of law authorizing the police in this country to keep habitual criminals under surveillance, so as to control and watch over their movements; for, although some sort of police supervision over convicted and suspected persons is undoubtedly exercised in most parts of the country this is an irregular arrangement and rests on no legal basis."

---

सुटी—शिमग्याच्या सणा निमित्त साला-बाद प्रमाणें सुटी असल्या मुळें वऱ्हाडसम-चारचा तारीख ६ मार्च १८९३ चा अंक निघणार नाहीं.

---

## वऱ्हाड

रा. रा. वामन नारायण बापट एक्स्ट्रा असि० कमिशनर वर्ग ३, उमरावती यांस येत्या मार्चचे पहिले तारखे पासून एक वर्षा-ची फर्लो रजा मिळाली आहे.

रा. रा. वामन गणेश तहशीलदार जळ-गांव यांस येत्या मार्च पासून तीन महिन्यां-ची हक्काची रजा देण्यांत आली.

बुल्ढाण्यास मुनासिपाल कमिटी तारीख १७ फेब्रवारी पासून स्थापित झाली. आणि त्या कमिटीचे सर्व सभासद सरकार मार्फत नेमले जातील असें ठरलें.

इलिचपूर सिव्हिल स्टेशनला मुनासिपाल कमिटी स्थापित करण्याचा विचार असल्या विषयी गेल्या रेसिडेन्सी आरडर्स मध्यें जा-हिरात आहे. तेव्हां ज्या कोणाची हरकत असेल ती त्यानें आज पासून चार आठवड्यां-चे आंत रेसिडेंट साहेबाकडे दाखल करावी.

मि. फरुख हुसेन नायब तहशीलदार मे-हकर यांनीं कांहीं सरकारी प्रकरणा वरून आपल्या कामाचा राजिनामा दाखल केला अ-सें कळतें.

---

## अकोला बाजारभाव

हुंडी मुंबईची दर्शनी.... .... .... ९९॥।–
" १५ दिवसांच्या मुदतीची.... ९९॥=
सुवर्ण २५॥।.... .... रुपें .... १०८॥
मीठ....३॥।– .... आळशी मापी ११२
जवस वजनी ९८.... चणे ६२॥
गहूं काठे....९०............ बनशी....८६।
साखर.... ३॥ ...कराळे.... .... ४।=
उडीद....३।.... .... मुंग ३॥=
जवारी ५५....५७ ........सर्की....६
तूप....९॥ ... ............ तेल ६।=
कापूस....५५–५६............रुई ७५–७७

सव्याचे भाव ( इंग्रजी )

गहू वैशाख शुद्ध १९४९ ....... ६५॥।=
आळशी चैत्र "........"........ ९८
रुई फाल्गुन........."........ ६२
सर्की वैशाख नवे सालची"........ ....५।
जवारी.... वसंत........"........ ०

## वर्तमानसार.

निजाम सरकारांनीं आपल्या संस्थानचा कारभार कौन्सिल मार्फत चालविण्याच्या व्यवस्थे संबंधानें जो जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे त्याचा सारांशः—

"लोक सुखी व संतुष्ट असले ह्मणजे व सरकारी खजिन्यांत पुष्कळ शिलक पडली ह्मणजे राज्यव्यवस्था चांगली आहे असें समजावें परंतु या संस्थानचे हल्लींची व्यवस्था तशी नाहीं. या संबंधानें पूर्ण चौकशी करून आह्मी सर्व साधक बाधक गोष्टींचा विचार केला व शेवटीं आमचा असा विचार ठरला कीं, या देशांतील लोकांना स्वदेशाची पुष्कळ कळकळ वाटते आहे. तेव्हां त्यांना राज्यव्यवस्थेंत अधिक वाटा मिळणें रास्त आहे. तसेंच आजपर्यंत राज्यकारभाराची सर्व जबाबदारी फक्त मुख्य दिवाणावर होती, तीही कमी करणें न्याय आहे. प्रत्येक खात्याचे मुख्याधिकारी यांना आजपर्यंत द्यावेत तसे अधिकार दिले नव्हते व त्यांची राज्यव्यवस्थेंत मदत घ्यावी तशी घेतली जात नव्हती. याजकरितां यांचे मदतीचाही हा फायदा करून घेणें प्रशस्त आहे. या धोरणावर राज्यव्यवस्था सुधारण्यासाठीं एक प्रधानमंडळी नेमण्याविषयीं आह्मी दिवाणांस सुचविलें व त्याप्रमाणें त्यांनीं एक मंडळ नेमलें. त्या मंडळांत नबाब विकार उल उमराव बहादूर, न० मोहिसान उलमुल्क, न० इमादजंग, राफलयारजंग, मौलवी अफझूलहुसेन, व मि. डनलाप सा० हे अधिकारी आहेत. या सर्व अधिकाऱ्यांनीं एकत्र जमून राज्यव्यवस्था कोणत्या रितीनें सुधारावी याविषयीं विचार करून मंजुरी करितां तें प्रकरण आह्माकडे पाठविलें व त्याप्रमाणें आह्मी त्यांस मंजुरी दिली ती व्यवस्था येणेंप्रमाणें आहेः—

१. प्राईम मिनिस्टरनें आपलें काम कोणत्या रितीनें करावें या विषयींचा एक कायदा तयार करण्यांत येईल व त्यांत नमूद केल्या प्रमाणें कामें व अधिकार त्यांजकडे राहतील.

२. आजपर्यंत प्राईम मिनिष्टरवर सर्व कामाची फार मोठी जबाबदारी होती. एका एका मनुष्यावर इतकी जबाबदारी टाकली असतां त्याचे हातून तें काम चांगल्या रितीनें होणें अशक्य आहे. त्यांचे वरील हा बोजा कमी करणें हें त्यांना व संस्थानाला हितावह आहे. याज करितां या पुढें प्रत्येक खात्याचे अधिकाऱ्यावर त्या खात्याचे व्यवस्थेची जबाबदारी टाकण्यांत येईल. आज पावेतों कौन्सिल आफ स्टेट होतें, तें मोडून कोन्सलटेटिव हे कौन्सिल करण्यांत येईल. या कौंसिलांचे दिवाण हे अध्यक्ष रहातील. नबाब विकार उमराव हे उपाध्यक्ष राहतील व पेष्कार आणि जुडिशियल पोलिस व पब्लिकवर्कचे मिनिस्टर्स हे या कौन्सिलचे मेंबर राहतील. तसेंच प्राईम मिनिस्टरचे सेक्रेटरी कौन्सिलचे सेक्रेटरी होतील. ज्या कामांत कोणत्याही खात्याचे मुख्याधिकाऱ्याचें मत भिन्न पडेल तीं कामें कौन्सिलपुढें येतील व कौन्सिलचा ठराव अखेर निकालासाठीं आमचे (निजाम) कडे येत जाईल. कौन्सिलनें काम कोणत्या रितीनें करावयाचें याचा मसुदा करून तो लवकरच आमचेकडे पसंतीकरितां पाठवावा.

३ राना किसनप्रसाद यांना त्यांचे पूर्वजांचे जागीं ह्मणजे पेष्कारांचे जागीं नेमलें आहे व त्यांचे ताब्यांत रेग्युलर व इर्रेग्यूलर फौज राहील. त्यांनीं काम कोणत्या रीतीनें करावें याविषयीं लवकरच एक कायदा करण्यांत येईल.

४ मुलकी खातें नबाब विकार उलउमराव बहादर यांचेकडे सोपविलें आहे. यांचे कामाविषयींचा कायदाही लवकरच तयार होईल.

५ लष्करी खातें हें फार महत्वाचें खातें आहे. या खात्याचे मिनिस्टरला एक अनुभविक युरोपियन सेक्रेटरी देण्यांत येईल व त्याची निवड मिलिटरी मिनिष्टर सप्पद अमारुल्लाशहा यांचे कडून करण्यांत येईल. तसेंच हैद्राबादचे अनुभविक गृहस्थ जाईंट सेक्रेटरीचे जागीं नेमण्यांत येईल.

६. नबाब फकीरउल मुल्क यांना न्यायखात्याचे मुख्य अधिकारी नेमलें आहे. यांचे अधिकाराविषयींचा कायदा लवकरच तयार होईल.

७. नबाब इफकार उलमुलुक यांना पब्लिकवर्क्स खात्याचे मुख्य नेमलें आहे."

याखेरीज बाकींच्या बऱ्याच कामदारांच्या नेमणुका झाल्या असून त्यांनीं कोणतें काम कोणत्या रितीनें करावयाचें याचा ही खुलासा करण्यांत आला आहे. क० त०

कापूर व आळशीचे तेल कागदाला लावलें असतां तो पाण्यांत टाकला तरी भिजत नाहीं.

पारिसमध्यें भिंतीवर जाहिराती लावण्याचे एक यंत्र निघालें आहे तो पन्नास फूट उंचीवर सुद्धां जाहिराती चिकटवितें. शिडी व खळीचें भाडें यांची जरूर नाहीं.

विजापुरांत हिरे वगैरे काढण्याची एका इंग्रज गृहस्थाला सरकारानें परवानगी दिली आहे. मद्रास इलाख्यांत पत्रे पोंचविण्याच्या कामीं कबुतरांची योजना करून पाहिली.

पृथ्वी उत्पन्न होऊन ६५ पासून ७० कोट पर्यंत वर्षें झालीं असावीं असें एका विद्वान् तत्वज्ञाचें ह्मणणें आहे.

बंगाल्यांतील एका गृहस्थानें पाण्यावरून चालत जाण्याचे दुचाकी गाडीसारखें एक यंत्र तयार केलें आहे. त्याचा प्रयोग ही करून पाहिला.

केळीच्या पानापासून कागद तयार करण्याची युक्ति मेक्सिकोमध्यें एकानें काढली आहे.

न्यू साउथवेल्स आणि कुईन्सलंड या दोहोंमध्यें ५०० मैल लांब तारांचे कुंपण घातलें आहे. ही एक अद्भुत गोष्टच आहे.

दालचिनीची पूड भेगांत वगैरे टाकली असतां तांबड्या मुंग्या नाहिशा होतात. कर.

आमदाबाद सेशनकोर्टानें कोणत्याही कामांत मुखत्यार घेण्याचें बंद केलें आहे.

कुत्र्याच्या दंशावर कोंबड्याच्या विष्टेचा लेप करावा ह्मणजे पिसाळलेल्या कुत्र्याचे वीष उतरतें. म० मि०

येत्या पावसाळ्याच्या आधीं दोन महिने खूप व्यापार चालेल अशी अटकळ बांधून जी. आय. पी. रेलवेवर दुपदपुरी आणि खंडवा यांच्या दरम्यान नवीन २३ स्टेशनें सुरू करण्याचें ठरलें आहे.

स्वदेशी बटनांचा कारखाना....उंची पोळ झांप्या जवळ हा नूतन गारेच्या बटनांचा कारखाना स्थापन होऊन आज बरेच दिवस झालें आहेत. बटनें विलायतच्या पेक्षां कांकणभर जास्त सफाईची होत असून मजबूदार व टिकाऊ असतात. एक रुपया पासून पांच रुपये डझन किंमतीची बटनें तयार आहेत. हे गारेचे दगड नांदेड प्रांतांत मुबलक आहेत. गारेच्या दगडाच्या सोंगट्या, बुदबळे, टेबलवेलबुटी वगैरे फार नामी होतात. असो. स्वदेशी माल वापरणाऱ्या बांधवांनीं यास हातभार लावल्यास याची तेव्हांच प्रसिद्धी होणार आहे. व उत्पादकांस अत्यानंद होऊन स्वदेशाचें कल्याण होणार आहे.

खरें असल्यास मोठें आश्चर्य—"इंग्लिशमन" पत्राच्या कारखान्यामध्यें इंडिया सरकारची चार आण्याची पाती आहे. व सरकार रयतेचा पैसा सदर पत्रास मदत करण्या करितां खर्च करीत असते व त्या पत्रानें नेहमी आपल्या बाजूचे लेख लिहावे अशी सरकारची इच्छा आहे. हा चार आण्याचा हिस्सा सर वुइल्यम हंटर हे हिंदुस्थानामध्यें असतां त्यांच्या नांवानें होता व अजूनही तो त्यांच्याच नांवानें चालला आहे, असें कलकत्याचे बारिष्टर मि० बारो ह्यांनीं नुकतेंच एका मोठ्या भर सभेमध्यें सांगितलें. हें जर खरें असेल तर मोठेंच आश्चर्य ह्मणावयाचें. न्या. सु.

एक नवें अस्त्र— जपान सरकारच्या फौजेंतील एका शिपायानें एक नवी बंदुक तयार केली आहे. बारा फूट लांबीवर शत्रूचें सैन्य असेल तर ह्या बंदुकीच्या बारानें शत्रुच्या सैन्याच्या डोळ्यांत धूळ फेकून त्यास सहज आंधळे करितां येतें असें ह्मणतात.

बक्षीस—मि० किरबी यांणीं मीठ मोजण्याची एक तराजू केली आहे, ती मीठ मोजण्यास फार चांगली आहे असें ठरल्यावरून त्यांस ५५००० रुपये बक्षीस द्यावें अशी मंजुरी हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं दिली.

हिंदुस्थानचीबूड....हल्लीं एक शिलिंग २॥ पेन्स असा रुपयाचा भाव आहे. तरी फर्लोवर जाणाऱ्या युरोपियन नोकरांस फर्लोचा पगार १ शिलिंग ४॥ पेन्स प्रमाणें द्यावा असा स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं हिंदुस्थान सरकारास हुकूम केला आहे. स्टेट सेक्रेटरी हिंदुस्थानचा जो पगार खातात त्याचा हा नामी मोबदला ह्मणावयाचा.

गाई बैलाना आरशा—युरोपांतील थंड प्रदेशांत बर्फ अतिशय पडतें. बर्फावर ऊन पडलें ह्मणजे त्याच्या योगानें गुरांच्या डोळ्यांस अंधपणा येतो तो न यावा ह्मणून रशियांतील गाई बैलांच्या डोळ्यांस हिरव्या आरश्या लावण्याचा सपाटा उडाला आहे. ह्या हिरव्या आरशा लावल्या ह्मणजे गुरांच्या डोळ्यांस बिलकूल अंधपणा येत नाहीं. प्रथमच आरश्या लाविल्या ह्मणजे गुरें पुष्कळ धडपड करून त्या काढून टाकण्यासाठीं प्रयत्न करितात. पण एकदां त्यांस संवय झाली ह्मणजे माणसा प्रमाणेंच त्यांस त्या आवडूं लागतात. हजारो हजार गाई बैलांना आरश्या लावलेले कळप पाहिले ह्मणजे मोठी मौज दिसत असें तिकडे प्रवास करून आलेला एक गृहस्थ लिहितो. शु. सू.

लाहोर येथील वर्तमानपत्राच्या समजण्यांत आलें आहे कीं, नवें चमन व कंदहार यांच्या दरम्यान पाहरा ह्मणून एक ठिकाण असून त्याच्या आसपास आफगाणिस्थानच्या १९ पलटणा येऊन हजर झाल्या आहेत. या बरूक येथून हीरातच्या वाटनें आल्या आहेत. मागें सांगितल्याप्रमाणें अमिराचे दोघेही मुलगे गिझनीस येऊन दाखल झाले आहेत वझीरखां येथील अमिराचा एजंन्ट सरदार गुल्ममहमद खान या गेल्या २॥ महिन्यांपासून वझीरी लोकांस दरमहा २,००० रुपये प्रमाणें देत आहे. असें ही सांगतात.

चिनाहिल लोकांवर जाणारी एक इंग्रज टोळी व्हाइट फोर्ट या किल्ल्यावर जाऊन पोंचली व चिन लोक फरारी होत आहेत. पश्चिमेकडील बहुत्येक खेडीं स्वाधीन झालीं व व्यवस्था करण्याचें काम चालू आहे. दुसरी एक टोळी उत्तरेच्या आंगास फिरत आहे.

मथुरा येथें असलेला ७ वा रिसाला या आठड्यांत मुंबईस आगबोटींत बसून इजिप्तदेशांतल्या कामगिरीकरतां निघून जाईल. घोडे वगैरे मथुरेस ठेवून फक्त ४०० निवडक लोक जावयाचे.

"शेतकरी लोक हे देशाचा प्राण आहेत व व्यापार कलाकौशल्य यांची वृद्धी त्यांजवर अवलंबून असते. ते लोक ह्मणजे केवळ नेटिव संस्थानच्याचे नव्हे, तर ब्रिटिश राजाच्या सुद्धां अबादानीस व प्रबलतेस कारण आहेत. कारण शेतकरी लोक संतप्त असले तर लोक पैसा शेतकींत घालतात; पड जमीन लागवडीस येते; उत्पन्न वाढून देशाचा जमीनधारा वाढतो; आणि अशा रीतीनें एकंदर देशांतली संपत्तिही वाढते; आणि त्या बरोबर देशाचें प्राबल्य ही वाढतें— कारण संतृप्त शेतकरी व दयाभूत अंतःकरणाचे सावकार लोक त्यांना मदत देणारे, अशी जूट असल्यावर त्यां देशाकडे शत्रूच्यानें कधीं तरी पहावेल काय?" असें मुंबईचे गव्हरनर ह्मणतात.

शिकारपूर येथील एका मिठखात्याच्या इन्स्पेक्टराचा खून झाला. मिठाच्या महागाईचें हें चिन्ह नव्हे ना?

रशियाची फौज पश्चिमच्या आंगास जमा होतच आहे असें एका इंग्रज पत्राचा रशियांतला बातमीदार लिहितो व दुसऱ्या एका इंग्रज पत्राचा बर्लीनचा बातमीदार सांगतो कीं पश्चिम सरहद्दीवर रशियाची जी फौज जमा होत आहे त्यावरून लवकरच लढाई सुरू होणार अशी जर्मनीच्या राजधानींतल्या बऱ्या लोकांत बोलावा आहे, आणि जर्मनी आपली फौज वाढविण्याचा जो यत्न करीत आहे व त्या कामास हरकत आणण्यास कोणास अधिकार नाहीं असें जें ठरविण्यांत आलें त्याचें कारणही हेंच आहे.

युरोपांत लवकरच खचित लढाई सुरू होणार असें कित्येकांचें अनुमान असून तें आपल्या त्या अनुमानास समर्पक अशीं कारणें ही देत आहेत.

मांचेस्टरचे गिरणीवाले व मजूर यांचा अजून सल्ला झाला नाहीं. १,००,००० लोक आज काम सोडून बसले असून आणखीं लोक काम सोडण्याच्या पंथांत आहेत एकंदरीनें १८६२ ची स्थिती येण्याचा रंग आहे असें सांगतात. ठा० अ०

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.